# माणूस

१५ ऑगस्ट १९७३
एक रूपया

## चित्र वार्ता पुस्तक




१५ ऑगस्ट

# माणूस चित्र वार्ता पुस्तक

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहसंपादक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

दिनांक
१५ ऑगस्ट १९७३

किंमत
एक रुपया

अंक
तिसरा


मुखपृष्ठ : शहीद भगतसिंगचा निर्माता मनोजकुमार । चित्रकार : सुभाष अवचट


**ना. ग. गोरे**

## कॅपिटॉल बॉंब केसचे बापू साळवी

'हा बापू साळवी.' मला वाटते माधव लिमयेने बापूची ओळख मला करून दिली ती नाशिकच्या एका बाजूला असलेल्या पटवांच्या बंगल्यामधील फ्लॅटमध्ये. तेथे भूमिगतांचे नाशकातले केंद्र होते. मी मुंबईहून नाशकातील भूमिगत कार्याचा परिचय करून घेण्यासाठी गेलो असताना ही ओळख झाली. तीनच शब्दांनी झालेली ओळख. तीन साधे, अनलंकृत शब्द, ज्याची ओळख करून दिली त्या माणसासारखेच. मला देखील त्यापेक्षा अधिक शब्दांची गरज वाटली नाही. कारण कॅपिटॉल बॉंबकेसचे सगळे प्रकरण माझ्या कानावरून आधीच गेलेले होते. त्यात बापू साळवीने केवढे जोखमीचे काम केलेले होते त्याची मला कल्पना होती. मी बाबूराव चव्हाणांना मुंबईसच पाहिले होते. त्यांच्या निश्चयी काळ्याभोर नजरेने माझ्यावर छाप बसवली होती. अल्लड वाटणारा भाल बायाळ माझ्या परिचयाचा झाला होता. शिरूभाऊ लिमये, तर अगोदर पासून जीवश्च-कंठश्च मित्रापैकी होते. पाहिला नव्हता फक्त बापू साळवी. तो आज माझ्या समोर उभा होता.


ओळख झाल्यावर तो किंचित हसला आणि बाजूला सरला. त्याच्या देहयष्टीत काहीच




असामान्य नव्हते. साधा सुधा दहाजणा– सारखा दिसणारा तो तरुण होता. स्थूल नव्हे पण जरासा आडव्या आंगलटीचा वाटला. चेहरा गोरा गोबरा. रुंद कपाळपट्टी खालचे किंचित तांबुस काळे डोळे, स्निग्ध शांत. बोलणे इतके मोजके की अबोलपणाकडेच झुकणारे. चर्चा, वादविवाद, घटपटात रस नाही. पुढे पुढे करणे तर मुळीच नाही. तुम्ही काम काय ते ठरवा, मला सांगा, मी ते करीन, अशी एकंदर रोखठोक वृत्ती. आपण जे काही केले त्याबद्दल जी काही शासनशिक्षा होईल ती भोगली पाहिजे, न कुरकुरता सहन केली पाहिजे हे समजून त्याप्रमाणे वागण्याची तयारी. मला नाशिकला भेटलेला बापू साळवी हा असा होता.

मी नाशिकला दोन तीन दिवसच होतो. नंतर मला बापू भेटला, म्हणजे दुरून दिसला, तो येरवड्याच्या तुरुंगात कॅपिटॉल बाँब केसच्या खटल्यातील प्रमुख आरोपी म्हणून. त्यावेळी तो सेपरेटमध्ये असावा असे वाटते. येरवडा तुरुंगातल्या चिंचेच्या झाडाखाली उभा असलेला बापू पटवांच्या बंगल्यात दृष्टीस पडलेल्या साळवी पेक्षा जरा-सुद्धा निराळा नव्हता. जरा आडव्या अंगलटीचा, गोऱ्या गोबऱ्या रंगाचा, तांबुस काळ्या स्निग्ध शांत डोळ्यांचा, ओठावर किंचित स्मित उमटलेला. बापूच्या चेहऱ्यावर ते हसू काय म्हणून ? त्याला काय फाशी गेटाजवळून जाताना कधी मनोमन वाटत नसेल की हा मृत्युचा जबडा मला आत सामावून घेण्यासाठी केव्हा तरी उघडणार आहे म्हणून. भाल वायाळच्या अचाट हुलकावणीमुळे कॅपिटॉल बाँब केसला जे अकल्पित वळण मिळाले ते त्याला थोडेच अपेक्षित होते. मग मृत्यु दर दिवशी जवळ सरकताना दिसत असूनही बापूच्या ओठावरचे हसू मावळत नव्हते हे कसे ? का त्याने हा मुखवटा कायमचा वापरायचे ठरवले होते ? की रात्री एकांती त्याचे डोळे ओले होत होते पण जनांती तो हे दुसरे रूप धारण करीत होता ? मृत्यू समोर दिसला की काळ्या पाषाणाच्या छातीची माणसे घळाघळा पाझरलेली भी पाहिलेली आहेत. मग बापू अडिग कसा राहात होता ? बापूचे जीवन विषयक तत्त्वज्ञान कोणते होते ? तो ब्रह्मसत्य जगन्मिथ्यावाला होता ? आत्मा अमर आहे असे मानणारा होता ? ऐन तारुण्यात देशासाठी बलिदान करणाऱ्याला स्वर्गसुख मिळते असे मानणारा होता की या जन्मी अपुऱ्या राहिलेल्या आकांक्षा पुढील जन्मी सफल संपूर्ण होतील अशी त्याची विचारधारणा होती ? क्षणसत्तावादी म्हणजे एक्झिस्टन्शिअलिस्ट तर तो नसेल ? पण हे माझ्या प्रश्नांचे चक्र फिरू लागल्यावर मला असेही वाटले की हे प्रश्न जर आपण बापूला विचारले तर तो परत एकदा तसाच थोडासा हसेल आणि तेथून उठून दुसरीकडे जाता जाता म्हणेल, ‘ तुम्ही हे काय विचारता ते मला कळत नाही. मी आहे हा असा आहे. ’

बापू, बाबूराव चव्हाण, शिरूभाऊ सगळेच त्या खटल्यातून सुटले. नंतर तुरुंगामधून यथावकाश सुटले. पुढे ते ४२ च्या लढ्यात आमच्याबरोबर होते. त्यांची राजकीय संघटना बांधण्याच्या उद्योगाला आम्ही लागलो. माणसाला स्वस्थ बसू द्यावयाचे नाही, सुटे चालू द्यावयाचे नाही हाच जणू आमचा उद्योग. त्यावेळी मला कोणीतरी सांगितले की बापूला आता राजकारणात रस वाटत नाही. तो ४२ च्या लढ्यातील क्रांतिवीरांच्या उदोउदोचा काळ होता. सिंहापासून उंदरापर्यंतचे सगळे बेचाळीसवाले क्रांतिकारक म्हणून मिरवीत होते. पण त्या मिरवणुकीत बापूने भाग घेतला नाही. त्याच्या गाठीभेटीसुद्धा विरळ होत चालल्या. आणि एक दिवस मी बापूला पाहिला पूनमच्या कौउंटरवर. मी विचारले, ‘ काय बापू, कसं काय ?’ बापू किंचित हसला आणि म्हणाला. ‘ छान चाललंय् ! कॉफी घेणार ?’ नाशिकच्या बंगल्यावर पाहिलेला, येरवड्याच्या तुरुंगामध्ये चिंचेच्या झाडाखाली दिसलेला बापू, कॅपिटॉल बाँब केसमधला प्रमुख आरोपी बापू आज याक्षणी पूनमच्या काउंटरवर काम करीत होता. स्थूल नाही पण थोडा आडव्या अंगलटीचा, गोऱ्यागोबऱ्या तोंडाचा, तांबूस काळ्या डोळ्यांचा तेच किंचित स्मित ओठाच्या कोपऱ्यात रेंगाळत असलेला बापू. कोणत्याही तत्वज्ञानाचा बडीवार न सांगता जीवनाशी क्रीडा करणारा बापू. बापू, तू आहेस तसाच राहा. तुझ्यापर्यंत पोचायला मला तरी निदान बराचवेळ लागणार आहे.




बापूसाहेबांनी साठी ओलांडली म्हणून गेल्या आठवड्यात पुण्याला त्यांचा सत्कार करण्यात आला.



# अशी ही मुंबई... अशी ही मुंबई... अशी ही मुंबई...

छाया : मोहन नावेलकर




सोने ५०० रुपये तोळा.
म्हणजे भाव
फक्त २०० रुपयांनीच वाढला.
तरी या सुवर्णनगरीत
मागणी वाढतेच आहे.

आणि मटण
फक्त एक रुपयानी
स्वस्त झाले
तर कोण हा आनंद !

डावीकडे आहे ती उभी मुंबई
उजवीकडे आहे ती आडवी मुबई.
याच्या जोडीलाच आता अनेक कोटी रुपये खर्चून
जुळी मुबई उभी राहणार आहे.
ही जुळी मुबई
**पूर्ण उभी असणार**
का उभी-आडवी असणार ?




# अशी ही मुंबई... अशी ही मुंबई... अशी ही मुंबई...



आज १५ ऑगस्ट १९७३.
देश स्वतंत्र होऊन
सव्वीस वर्षे पूर्ण झाली. स्वातंत्र्याचे
रौप्य महोत्सवी वर्ष
मोठ्या थाटामाटात
साजरे झाले. सभा-संमेलनातून
गरिबी-बेकारी वर्षभरात हटवण्याच्या
घोषणा झाल्या.
अश्वासनांची खैरात झाली.
पण..........
गरीब आहे तिथेच राहिला.
क्वचित दोन पावलं
मागेच सरकला.
आज या
भल्या मोठ्या देशाच्या
व्यापारी राजधानीकडे
—मुंबईकडे
सहज नजर टाकली
तर ही दोन चित्रे दिसतात.
विश्वास बसू शकत नाही
इतकी भिन्न.
इतकी टोकाची
परस्परांशी कुठे कसलंच नातं
न सांगणारी.

# अशी
# ही
# मुंबई . . .




या कबुतरांना
काय कल्पना
बाहेरच्या परिस्थितीची.
कारण ती बसली आहेत
ताजमहालच्या गच्चीवर.
यातल्या एखाद्या कबुतराला विचारलंत
तर तेही सहज सांगेल
की या महालात
रोज किती पार्ट्या
झडतात आणि
रोज किती काळ्या-पांढऱ्या पैशाची
उलाढाल होते.

आणि यांना मात्र अटक
का ? यांनी पोटापुरते
जेवण मागितले म्हणून



अशी
ही
मुंबई . . .



या जनतेचे
म्हणणे तरी
काय आहे ?

संप, बंद, मोर्चा, धरपकड या गोष्टीतही
सामान्य माणसाला थ्रिल वाटत नाही
इतक्या त्या गोष्टी सरावाच्या झाल्या आहेत.
रोज कुठला ना कुठला मोर्चा
कसल्या ना कसल्या मागणीसाठी
येतच असतो असं त्याचं म्हणणं.
यातून काहीही निष्पन्न होत नाही
या ठाम निश्चयाला तो आता आला आहे.
पाच-पन्नासांचा मोर्चा
आणि शे-दोनशे पोलिस हे गणितही
तसं ठरून गेलेलं.
त्यामुळे पुढे काय होणार त्याचीही उत्सुकता नाही.
अशा परिस्थितीत
या सर्व गोष्टी विसरून
आपलं आहे तेच जीवन
त्यानं मनोमन पत्करलं आहे.

# आम्ही महाराष्ट्रात येत आहोत...

**मुक्काम : बेळगाव**

बेळगाव आदी सीमा भागात प्राथमिक, माध्यमिक स्तरावर कानडी हा एक अत्यावश्यक विषय करण्यात आला आणि या सीमाभागात चिडीची प्रचंड लाट उठली. 'कानडीचे हे सक्तीकरण आम्ही सहन करणार नाही ' हा विद्यार्थ्यांचा वज्रनिश्चय ठरला. त्यातून विद्यार्थ्यांनी कृती करावयाचे ठरवले. युवकांच्या विविध संघटना एकत्र आल्या. त्यातून युवक महामंडळाची स्थापना



पोलिसांनी किती निर्घृणपणे बेळगावला लाठीमार केला त्याचा हा पुरावा. या स्त्रीच्या मांडीवरील वळ स्पष्ट दिसतो.



शिवाजीनगर (बेळगाव) विभागातील हा तरुण पोलिसांच्या लाठीमाराने घायाळ झाला आहे. त्याला दहा ठिकाणी जखमा झाल्या आहेत.



या मुलाला रक्ताच्या उलटचा होईपर्यंत मारले.

झाली. सभा, मोर्चे, पत्रके यांचा महापूर आला. चळवळ प्रथमपासून शांत व सनदशीर रहावी असा विद्यार्थी नेत्यांनी प्रयत्न केला. दृष्ट लागावी इतकी चळवळ शांतपणे चालली होती.
ता. २३ जुलै उजाडला. महाराष्ट्र एकीकरण समितीने आज हरताळाचा आदेश दिला होता. डिव्हिजनल कमिशनर याच्या कचेरीवर मोर्चा संघटित करण्यात आला होता. अपेक्षेपेक्षा अधिक साद विद्यार्थी व नागरिकांनी दिली. २५ हजाराचा मोर्चा निघाला. हे अक्षरश: प्रचंड निदर्शन होते. अतिशय शांतपणे चाललेल्या निदर्शकांवर सरदार्स हायस्कूल या सरकारी शाळेतून दगडांचा मारा झाला आणि डिव्हिजनल कमिशनराच्या आवारातच लाठीमार सुरू झाला. राज्य राखीव पोलीस, सशस्त्र पोलीस व नागरी पोलीस यांनी गुराना बडवावे असे निदर्शकाना बडवले. अनेकाची डोकी फुटली. हातपाय तुटले. पोटावर, मांड्यावर जेथे मिळेल तेथे मारले. काहीना तर रक्त ओकेपर्यंत मारले. एका मुलाला कंबरेखाली नाजूक जागेवर मार बसला. तो कळवळला.
डिव्हिजनल कमिशनराची भेट घेण्यात आली. त्यांनी मराठी बोर्ड लावण्यात येतील असे आश्वासन दिले. कानडीची सक्ती होणार नाही असेही सांगितले. मोर्चाला निर्णय समजावून सांगण्यात आला. इकडे संचारबंदी लागू करण्यात आली. परतणाऱ्या निदर्शकावर लाठीमार सुरू करण्यात आला. गल्लीबोळात शिरून झोडपणे सुरू.
१७ वर्षाच्या रफिक हुदळीकरला छातीवर इतके मारण्यात आले की, त्याला रक्ताच्या उलट्या सुरू झाल्या. अशी मारहाण सुरू असताना चोऱ्याही सुरू. पोलीस पैसे, सोन्याच्या चेन्स, घड्याळे पळवू लागले. मारपीट करावयाची निदर्शक आडवे पडले की वस्तू पळवावयाचे. कायदा व न्याय याचे पालन करणारे त्याचीच हत्या करीत होते. लोकांच्या जीविताचे संरक्षणदार लोकजीविताचे मारेकरी ठरले होते. हे सूड उगवणे आहे, हे स्पष्ट दिसत होते. यात योजनाबद्धता होती, असा दाट संशय येतो. चळवळ या मार्गाने दडपून टाकावी, पाशवी मारहाणीने भीतीचे वातावरण निर्माण करावयाचे, हे सूत्र असावे असे दिसते. मुलाना का मारता म्हणून विचारावयास गेलेल्या श्री. बळवतराव सायनाक या आमदाराला पोलिसांनी झोडपले. त्यात त्यांचा हात मोडला. त्याला प्लॅस्टर घालावे लागले. पोलिसांनी केवळ शहरातच मारझोड केली असे नव्हे, टिळकवाडी आदी विभागातूनही अनेकजण जखमी झाले. गोधळी गल्लीत लोकांची दारे मोडून पोलीस आत शिरले. घराची कौले काढून पोलीस आत आले आणि दिसतील त्याना झोडपणे सुरू. आई-बहिणी यांना गलिच्छ शिव्या दिल्या. शिवाजीराजाचा उद्धार पदोपदी सुरू होता. ब्रिटिश राजवटीतही अधिक माणुसकी दाखवली जात होती. येथे तर पादाक्रांत केलेल्या प्रदेशावर ज्या पद्धतीची राजवट चालते त्याचे प्रत्यंतर आले.
जे ता. २३ ला तेच ता. २४ ला सुरू. टिळकवाडी येथील रजपूत बधू मराठी शाळेत शिरून शिक्षकांना झोडपले. अनगोळमध्ये मुले लेझीम खेळत होती तेथे जाऊन त्याना बडवले. सायकलवरून जाणाऱ्यांना रस्त्यात अडवून झोडपले. अपराध नसतानाही पदोपदी झोडपणे चालू होते.
अनेक विद्यार्थ्यांना पोलीस कस्टडीत नेऊन मारण्यात आले. त्याना पाणी दिले नाही. जेवण नाही. मुलांची नावे विचारीत असताना वडिलाचे नाव विचारण्याऐवजी 'तुम्हाला कोणी काढले' असे नीचपणे प्रश्न विचारले जात होते. पायावर मारण्याऐवजी ढुंगणावर मारत. 'पायावर काय मारावयाचे म्हणून मऊ मऊ जागेवर मारत' हा अमानुष प्रकार सतत चालू होता. या सर्व प्रकारात 'सूड' दिसत होता. जनतेची चळवळ नामशेष करावयाचे धोरण स्पष्ट दिसत होते. या सर्व मारहाणीत निदान स्त्रिया तरी सुटतील असे वाटले होते. पण छे ! त्यांनाही मारण्यात आले. मांडीवर बेदम मारण्यात आले. अंगा-खांद्यावर, माडीवर, पायावर, छातीवर-पाठीवर वळ दिसत आहेत. वृद्ध स्त्रियाही यातून वाचल्या नाहीत.
निदान तीनशे तरी निदर्शक जखमी झाले. ४० जबर जखमी झाले आहेत. यात बेळगाव नगरपालिकेच्या माजी अध्यक्षा डॉ. इंदिरा खाडे याही सामील आहेत.
आज बेळगाव पोलीस राज्य चालू आहे: ठिकठिकाणी शस्त्रधारी पोलीस गस्त घालताना दिसतात. अंकित प्रदेशावरच्या राजवटीचे स्वरूप आहे. पोलिसांच्या गाड्या ठिकठिकाणी उभ्या असलेल्या दिसतात. दहशतीचे वातावरण आहे. पण जनतेच्या अंत:करणात भीती नाही. या जुलमी राजवटीला बेळगावची जनता पुरून उरली आहे. त्यांचा निर्धार पक्का आहे. 'आता महाराष्ट्रात सामील झाल्याशिवाय गप्प बसावयाचे नाही.' बेळगावातील तरुण मंडळी या लढ्यात अग्रेसर होती. मराठी विद्यार्थी १९ हजार आहेत तर कानडी फक्त ९ हजार. बेळगावातील सारे वातावरण मराठी आहे. मराठीचे खच्चीकरण सतत चालू आहे. तरीही ताठ मानेने मराठी माणूस उभा आहे. त्याची जिद्द अफाट आहे. त्याची आकांक्षा दुर्दम्य आहे आणि सर्वस्वाचे अर्पण करण्याची त्याची तयारी आहे. मोडेन पण झुकणार नाही हा बाणा आहे. म्हणून गेली १७ वर्षे पिसाटाचे राज्य सहन करूनही चळवळ जिवंत आहे. ती जिवंत राहणार आहे यात संशय नाही.
महाराष्ट्रातील जनतेकडून त्यांच्या काही अपेक्षा आहेत. ते म्हणतात, 'आम्ही महाराष्ट्रात येतो आहोत. आम्हाला हात द्या. आमच्या वेदनेत सहभागी व्हा. आम्हाला विसरू नका. आम्ही मराठी आहोत. महाराष्ट्रीय आहोत. आम्हाला साथ द्या. आम्हाला उपेक्षेने वागवू नका. आमच्या विद्यार्थ्यांच्यावर कानडीची सक्ती होत आहे. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी आम्हाला मदत केली पाहिजे. सभा घ्या. आमचे दुखणे समजावून घ्या. प्रसंग पडला की आमच्यासाठी धावून या. आज साऱ्या महाराष्ट्रात चीड निर्माण झाली पाहिजे. सभा घ्या. मोर्चे काढा-हरताळ पाडा. महाराष्ट्र सरकारवर हा प्रश्न सोडवण्यासाठी दडपण आणा. आज त्याची अत्यंत गरज आहे.'
—महाराष्ट्र बेळगावच्या सीमा बांधवांच्या हाकेला साद देणार ना !

**—वासु देशपांडे**

# संदेश


देशातील अन्नटंचाईला 'तोंड' देण्यासाठी सतत उपास करा !


एकवेळ सोन्याची बिस्किटे मिळतील. पण खाण्याच्या बिस्किटांच नाव काढू नका !


साडेबारा टक्के दर कमी झाले तरी बटाटेवड्याचा आकार मोठा झाला हे एक नवलच!
भारी नोटा रद्द करणार नाहीत.
भारी नोटा रद्दी करणार आहेत म्हणे.
तेल नाही.
गूळ नाही.
साखर नाही.
मैदा नाही.
गहू नाही.
तांदूळ नाही.
पेट्रोल नाही.
रवा नाही.
लोणी नाही.
गॅस नाही.
वीज नाही.
काही नाही.
बेकारी आहे.
लाच लुचपत आहे.
टंचाई आहे.
महागाई आहे.
काळापैसा भरपूर आहे.
लाथाळी आहे.
सत्ताप्रेम आहे.
लांडी लबाडी खूपच आहे.
श्यामजोशी

# कमला नेहरू

## एक विस्मृत जीवन

नेहरू कुटुंबाबद्दल बरंच लिहिलं गेलं आहे, पण त्यामध्ये कमला नेहरूंबद्दल फारच थोडं आहे. नेहरूंच्या भव्य व्यक्तिमत्वापुढे हे छोटंसं, नाजुक पण अंतर्यामी कणखर असलेलं व्यक्तिमत्व लपून राहिलं. स्वतः नेहरूंनादेखील त्या व्यक्तिमत्वाची खरीखुरी जाणीव झाली होती किंवा नाही कुणास ठाऊक.

सदानंद नाईक

काही व्यक्ती अशा असतात की त्यांच्या गुणांची पारख त्यांच्या हयातीत जगाला करता येत नाही. त्यांच्या ठिकाणी काही विशेष आहे याची पुसटशी कल्पनाही जगाला नसते. अशा व्यक्तीचे चरित्र कळल्यावर मात्र मनाला चुटपूट लागते. कमला नेहरू केवळ पंडित जवाहरलाल नेहरूंची पत्नी म्हणून ओळखल्या जातात. या स्त्रीच्या ठिकाणी काही वेगळया गुणांचे वास्तव्य होते. स्वातंत्र्यलढयात, स्त्री स्वातंत्र्यासाठी या स्त्रीने खस्ता खाल्ल्या याची जाणीव जवळ जवळ कुणालाच नाही. नेहरू कुटुंबा-बद्दल आजपर्यंत बरच लिहिलं गेलं आहे. पण त्यामध्ये कमला नेहरूंबद्दल फार थोडं आहे. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या राजकीय कर्तृत्वाला वाव देणाऱ्या त्यांच्या धर्मपत्नीला समजून घेण्याचा व इतरांना समजावून सांगण्याचा प्रयत्न आतापर्यंत झाला नाही असेच म्हणावे लागेल. नेहरूंच्या भव्य व्यक्तिमत्वापुढे हे छोटसं, नाजुक पण अंतर्यामी कणखर निश्चयी असलेल व्यक्तिमत्व लपून राहिलं. स्वतः नेहरूंना देखील त्या व्यक्तिमत्वाची खरीखुरी जाणीव झाली होती किंवा नाही कुणास ठाऊक. श्रीमती प्रमिला कल्हान याच्या 'कमला नेहरू' (चरित्र) या पुस्तकामुळे ही उणीव दूर झाली आहे.

एका स्त्रीची जीवनकहाणी एका स्त्रीने सागितली असल्यामुळे स्त्रीस्वभावाला समजून घेतल गेलं आहे. पुरुष आणि स्त्री या दोहोंच्या स्वभावामध्ये काही मूलभूत फरक आहे. एकाच समाजात ती दोघं रहात असली तरी सामाजिक बंधने दोघांना सारखी नसतात. त्यामुळे पुरुषाच्या कर्तृत्वाला ज्या गतीने वाव मिळतो त्या गतीने स्त्रीच्या कर्तृत्वाला वाव मिळत नाही. स्त्री मागेच रहाते. तीस चाळीस वर्षापूर्वी तरी निदान अशी स्थिती होती.

इंग्लडमध्ये शिकत असलेल्या आपल्या लाडक्या लेकासाठी पंडित मोतीलाल नेहरू मुली पहात होते. एका लग्नसमारंभात त्यांच्या एका नातेवाईकाचे लक्ष जवाहरमुल अटलांच्या (दत्तक घराण्यातील आडनाव कौल) १२ वर्षांच्या कन्येकडे – कमला कडे गेले. मोतीलाल नेहरूंनी आपल्या मुलाला – जवाहरलालला पत्र लिहिलं –'ही मुलगी इतकी देखणी आहे की माझ्या आढळात तरी अशी दुसरी मुलगी आली नाही. तिचे नाक, डोळे, चेहरा रेखीव आहे. शिवाय ती अत्यंत बुद्धीमान वाटते.' पंडित जवाहरलाल यांचा आपल्या वडिलावर विश्वास होताच. फक्त 'मुलीच वय लहान आहे. एवढया लहान वयात तिच्याशी लग्न करणे योग्य वाटत नाही. आणखी पाच-सहा वर्षांनी पाहू' असे त्यानी वडिलाना कळवले. जवाहरलाल शिक्षण पूर्ण झाल्यानंतर भारतात आले. आणि ८ फेब्रुवारी १९१६ रोजी दिल्लीत मोठया थाटामाटात कमला व जवाहरलाल यांचे लग्न झाले.

सनातनी सस्कारात वाढलेली कमला पंडित जवाहरलाल नेहरूंची पत्नी झाल्या-नंतर पाश्चिमात्य सस्कार असलेल्या अगदी



जवाहर
आणि
कमला
विवाहप्रसंगी

वेगळ्याच वातावरणात आली. वयाच्या १७ व्या वर्षी अशा वेगळ्या वातावरणाशी जुळवून घेताना कमलाजींच्या मनाची फारच ओढाताण झाली. पंडित जवाहरलालना पैशासाठी वडिलांवर अवलंबून रहाणं आवडत नव्हतं. कमलाजींनाही अर्थातच आवडत नव्हतं. पंडितजी काँग्रेसचे कार्यवाह होते. कार्यवाहांना काहीतरी मानधन मिळावं असा प्रस्ताव आला त्याचे त्यांनी स्वागत केले. त्यामागे, वडिलांवर अवलंबून राह्यला नको हाच त्यांचा हेतू होता. पंडित मोतीलाल नेहरूंना ते मानवलं नाही. जनतेचा पैसा अशाप्रकारे खर्च होणे योग्य नाही असे मत त्यांनी मांडले. कमलाजी साधे कपडे वापरू लागल्या, दागिने वापरायचे तर त्यांनी जवळ जवळ सोडून दिले. नंतर गांधीजींच्या सल्ल्यावरून त्या संपूर्ण खादी वापरू लागल्या.

अलाहाबादमधील 'आनंदभवनावर' मोतीलालजींनी दुसरा मजला बांधला. जवाहर व कमला त्या सर्व सोयींनी सज्ज घरात रहात होती. कमला नाजुक होती. डोकेदुखीचा आजार कायमचाच होता. मोतीलालजी कमलाच्या तब्येतीकडे जातीने लक्ष देत असत. तिथेंच दिनांक १९ नोव्हेंबर १९१७ रोजी कमलाजींना कन्या रत्नाचा लाभ झाला. जवाहरलालजींच्या आईला – स्वरूपराणींना–आपल्या एकुलत्या एका मुलाला पहिला मुलगा झाला नाही म्हणून दुःख झाले. पण मोतीलालजींनी तिला दिलासा दिला, 'ही नात हजारो नातवांपेक्षा जास्त कीर्तिवान होईल.' ती नात म्हणजे 'इंदिराजी.'

इंदिराच्या जन्मानंतर कमलाजींची तब्येत खालावत जाऊ लागली. हवापालट औषधोपचार होत होते. पंडित मोतीलाल सर्व गोष्टींकडे लक्ष देत होते. जवाहरलालजी दिवसेंदिवस राजकारणात ओढले जात होते. त्यांचे कमलाकडे दुर्लक्ष होऊ लागले. आपल्या राजकारणांतील एक 'साथी' होण्याचं सामर्थ्य कमलाच्या ठिकाणी आहे याची जाणीव देखील नेहरूंना त्यावेळी झाली नाही. पुढे आपल्या आत्मचरित्रात ते एके ठिकाणी म्हणतात. "या नाजुक संवेदनाशील मुलीचं मन एखाद्या फुलासारखं हळुहळू उमलत आहे, त्याला हळुवार स्पर्शाची आवश्यकता आहे याची मला जाणीवच झाली नाही. आम्ही एकमेकांकडे आकर्षिले गेलो होतो. आमचं चांगलं चाललं होतं. तरी आम्ही

भिन्न भिन्न वातावरणात वाढलेले होतो त्यामुळे एकमेकांना समजून घेऊन जुळवून घेण्याची आवश्यकता होती. आमच्यात कांही कुरबुरी होत होत्या."

यावरून सुरुवातीच्या काळात कमला नेहरूंच्या मनाची किती ओढाताण झाली असेल याची कल्पना येते.

१९२४ च्या शेवटास कमलाजींना अपुऱ्या दिवसांचा मुलगा झाला. आनंद आणण्या-ऐवजी कुटुंबाला दुःखात लोटून तो दोन दिवसानंतर इहलोक सोडून गेला. कमला नेहरूंचा आजार वाढला व त्याचे निदान टी. बी. असे करण्यात आले. पुढल्याच वर्षात त्यांना स्वीत्झर्लंडला पाठविण्यात आले. जवाहरलालजी व इंदिरा त्यांच्याबरोबर होते. त्या ठिकाणी चिकित्सालयात त्या उर्दू व इंग्रजी शिकल्या. भारतीय स्त्रीला बंधनातून मुक्त करण्याविषयीचे विचार सतत त्यांच्या डोक्यात येत होते. भारतात परत गेल्यावर त्यासाठी कार्य करण्याचे त्यांनी ठरविले. तब्येतीत सुधारणा झाली. पंडित मोतीलाल नेहरू आपल्या सुनेला आणण्यासाठी युरोपात गेले. येताना त्यांनी सर्व कुटुंबासह बर्लीन व पॅरीसला भेट दिली. त्या ठिकाणी रशियन क्रांतीच्या दहाव्या वाढदिवसानिमित्त रशियाला भेट देण्याचे निमंत्रण त्यांना मिळाले. रशियातील इतर काही गोष्टीबरोबरच तुरुंग व्यवस्थेमुळे कमलाजी प्रभावित झाल्या. तिथल्या तुरुंगाच्या दरवाजांना कुलूपे नव्हती. कैदी स्वैर हिंडत फिरत होते. काही वाद्ये वाजवीत होते, काही वाचत होते, कांही रेडिओ ऐकत होते; अशा प्रकारचे वातावरण पाहून त्या प्रभावित झाल्या. उपासमार नष्ट करण्याची तेथील लोकांची जिद्द पाहून जवाहर व कमलाजी प्रभावित झाले.

१९२७ च्या डिसेंबरात जवाहर, कमला, इंदिरा, कृष्णा मद्रास येथील कॉंग्रेसच्या अधिवेशनास वेळेवर उपस्थित रहाण्यासाठी भारतात परत आले. जवाहरलालजी राजकीय चळवळीत अधिकाधिक लक्ष घालीत होते. कमलाजींच्या तब्येतीच्या तक्रारी वाढत होत्या. देशात १९२८–२९ साली राजकीय वातावरण तंग होते. तब्येत ठीक नसतानाही कमला नेहरू राजकारणात सक्रीय भाग घेत होत्या. नेहरूंना मदत करत होत्या. त्या शांत, अबोल स्वभावाच्या असल्यातरी निश्चयी होत्या. आपल्या देशासाठी आपले आयुष्य वेचण्याचा निश्चय त्यांनी केला होता. आनंद भवनात स्त्रियांच्या बैठका होऊ लागल्या. आजुबाजूच्या भागातील स्त्रियांना भेटून पडदा टाकून देऊन संघटित होण्याचं आवाहन त्या करू लागल्या. लाहोर अधिवेशनांत जवाहरलालजींचा 'संपूर्ण स्वराज्या'चा प्रस्ताव पास झाला. कमला ऐकत होत्या. १९१९ साली झालेल्या जालियनवाला बाग कत्तलीच्या स्मृती दिनी म्हणजे ६ एप्रिल रोजी गांधीजींनी मिठाचा दांडी सत्याग्रह केला. जवाहरलालना १४ एप्रिलला अटक झाली. आणि कमलाजींच्या आयुष्यात प्रत्यक्ष राजकीय पर्व सुरू झालं.

सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू झाली. स्त्रियांनी विदेशी वस्तूंच्या पिकेटिंग करण्यास सुरुवात केली. आजारी कमलाजी त्यात अग्रभागी असत. निदर्शने करणाऱ्या स्त्रियांवर लाठीहल्ला होत असे. अशाच एका पिकेटींगच्या वेळी कमलाजींना चक्कर आली. त्यावेळी अलाहाबादच्या एका तरुण विद्यार्थ्याने–फिरोज गांधीने–त्यांना मदत केली. त्याने पाणी पाजले आणि पंख्याने वारा घातला.

जवाहरलालना तुरुंगात डांबण्यात आले होते. देशात सर्वत्र जवाहरलालजींच्या अटकेविरुद्ध निषेध सभा होत होत्या. ज्या भाषणासाठी जवाहरलालना अटक झाली होती, तेच भाषण कमलाजी एका सभेत वाचून दाखवीत होत्या. कमलाजींना अर्थातच अटक करण्यात आली. तारीख होती १ जानेवारी १९३१.

त्या दिवशी आपल्या कन्येला तुरुंगातून लिहिलेल्या पत्रात जवाहरलाल म्हणतात– 'मी तुझा व तुझ्या आईचाच विचार करीत होतो. आईला अटक झाली असल्याची बातमी सकाळी कळली. मला खात्री आहे, तिला खूप आनंद झाला असेल व समाधान वाटले असेल. मला मिळालेली ही नववर्षाची आनंददायक भेट आहे.'

कमलाजी व नेहरू दोघेही वेगवेगळ्या तुरुंगात होते. लखनौ मध्यवर्ती तुरुंगातून जवाहरलालना लिहिलेल्या एका पत्रात त्या म्हणतात– 'बराचसा वेळ मी वाचनात घालवते. तुरुंगात बरीच माणसे असतात. त्या वेगवेगळ्या माणसांना समजून घेण्यास चांगली संधी तुरुंगात मिळते. या ठिकाणी चरखे आहेत. पण ते चालवायला जड आहेत. मी घरून एक मागविला आहे. तो तुरुंगात आला आहे असे मला कळले. पण मला अद्याप मिळालेला नाही. तुरुंगाच्या अधिकाऱ्यांना धास्ती वाटत असावी की, त्या चरख्यात काहीतरी स्फोटक द्रव्य ठासून भरलेले असणार. त्यांच्या अकलेचे दिवाळे वाजले असावे. येथील खाणे बरे आहे.



लक्ष्मण आत्माराम पाळशेतकर ॲण्ड सन्स
दादर मधील जुनी सुविख्यात पेढी
म. चि. केळकर रोड, देना बँके जवळ, दादर, मुंबई २८.
सोन्याचांदीचे व अस्सल कल्चर्ड मोत्याचे आधुनिक
अलंकार, तसेंच प्रहांचे खात्रीलायक खडे व

तुरुंगात असेपर्यंत ताकद कमवायची व बाहेर पडल्यानतर अधिक जोमाने लढा द्यायचा असा मी निश्चय केला आहे.

**मोतीलालजींचा मृत्यू**

कमलाजीना दोन महिन्यांची शिक्षा ठोठावण्यात आली. पण पडित मोतीलाल नेहरू बरेच आजारी असल्याने त्याना २६ दिवसानतर सोडून देण्यात आले ६ फेब्रुवारी १९३१ रोजी मोतीलालजीचा मृत्यू झाला. १९३१ ते १९३४ या काळात पाच-सहा महिन्याचा काळ सोडल्यास जवाहरलालजी तुरुगातच होते. कमलाजी बाहेर होत्या. त्यानी स्वराजभवनात एक रुग्णालय सुरू केले. एका वर्षात जवळजवळ ५८,००० रोग्यावर औषधोपचार करण्यात आले. स्त्री-सभा किंवा स्त्री सेविका संघाची स्थापना करण्यात आली. कस्तुरबा आणि कमलाजी सभासभातून बोलत होत्या. दारूच्या दुकानां-समोर निदर्शने होत होती. या १९३१ ते १९३४ या काळात कमलाजीची तब्येत पुन्हा ढासळू लागली. मनाला शाती मिळावी म्हणून कमलाजी अध्यात्माकडे वळल्या. त्यानी बेलूर मठाच्या स्वामी शिवानदाकडून दीक्षा घेतली. त्याच्या आजारपणातील पुढच्या काळात रामकृष्ण व विवेकानदांच्या शिकवणुकीचा फार मोठा प्रभाव त्याच्यावर पडलेला आढळतो.

मे १९३५ साली कमलाजीना पुन्हा युरोपमध्ये औषधोपचारासाठी पाठविण्यात आले. यावेळी त्याच्याबरोबर इदिरा व त्याचे एक चुलतभाऊ- डॉ. मदन अटल हे होते. नेहरुजी त्यावेळी तुरुगात होते. कमलाजीची तब्येत फार बिघडल्याची बातमी आली म्हणून त्याची ४ सप्टेंबरला सुटका करण्यात आली. जवाहरलाल पत्नीला भेटण्यासाठी युरोपला रवाना झाले कमलाजीची तब्येत थोडीशी सुधारली. १९३६ च्या फेब्रुवारीच्या दरम्यान जवाहरलालजीची भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून दुसऱ्यादा निवड झाल्याची बातमी त्याना कळली. एप्रिलमध्ये भरणाऱ्या काँग्रेसच्या अधिवेशनाला भारतात परत जाण्याचे जवाहरलालनी ठरविले. २८ फेब्रुवारीचे तिकीटही काढण्यात आले. कमलाजीची तब्येत पुन्हा ढासळली. जवाहर-लालनी आपले जाणे पुढे ढकलावे असा सल्ला डॉक्टरानी दिला. परतु जायला तर हवेच होते. ते टाळता येणे शक्य नव्हते. कमलाजी २८ फेब्रुवारी १९३६ रोजी हा इहलोक सोडून गेल्या.

अशी ही कमलाजीची जीवन कहाणी श्रीमती कल्हान यांनी सोप्या, सहज इग्रजी भाषेत सागितली आहे. पुस्तकाच्या शेवटी शेवटी इदिराजींची मुलाखत छापलेली आहे त्यामुळे एक वेगळीच रगत आली आहे. त्यातील काही प्रश्नोत्तरे उद्बोधक आहेत.

**प्रश्न :** जवाहरलाल नेहरूच्यावर कमला-जीचा काय प्रभाव होता ?

**इंदिरा गांधी :** ती भावनाशील होती. कुठलीही गोष्ट तिला जाणवली की तिच्याशी ती उत्कटतेने समरस व्हायची. माझे वडील जेव्हा प्रथम राजकारणात उतरले तेव्हा घरातून त्यांना विरोध झाला. त्यानी त्यात स्वत.ला एवढे गुतवून घेऊ नये असे घरातल्यांना वाटत होते. त्यावेळी माझ्या आईने त्याना (वडिलाना) पाठिंबा दिला.

**प्रश्न :** आपल्याला शालेय शिक्षण मिळाल नाही म्हणून काही उणीवा आपल्यात राहिल्या आहेत असे त्याना वाटत होते का ?

**इंदिरा गाधी :** अगदी थोड्याना (स्त्रियाना) त्या काळी शालेय शिक्षण मिळत असे. ती ज्यावेळी आनद भवनात प्रथम आली त्यावेळी आपल्याला इग्रजी येत नाही याबद्दल थोडीशी खंत तिला वाटली असणार. त्याकाळी आमच्या घरात इग्रजीचा प्रभाव होता त्यामुळे तिची किती कुचबणा झाली असेल याची कल्पना करता येईल.

**प्रश्न :** त्या रशियाला गेल्या त्यानंतर रशियाबद्दल त्याचे काय मत झाले ?

**इंदिरा गांधी :** तिला स्त्रियांच्याबाबत जास्त आत्मीयता होती. रशियात स्त्रिया अधिक स्वतंत्र होत्या. शिवाय मुलासाठी ज काही कार्य केले जात होते त्यानेही ती प्रभावीत झाली होती.

**प्रश्न :** स्वरूपराणी आणि कमलाजी याचे एकमेकींशी सबध कसे होते ?

**इंदिरा गांधी :** माझ्या आजीला वाटत होते की माझ्या आईने माझ्या वडिलाना त्याच्या काही कल्पनामध्ये प्रोत्साहन द्यायला नको होते.

❋ ❋ ❋

**[ विकास प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या श्रीमती कल्हान यांच्या 'कमला नेहरूचे चरित्र ' या पुस्तकाचा परिचय ]**


## पायोनिअर रेडिओ क्राफ्टर्स • फेमस रेडिओ कंपनी • एस. ट्रायो इलेक्ट्रॉनिक्स

मालक : जी. आर. देशपांडे

अधिकृत विक्रेते :
रेडिओ : मर्फी, जी. ई. सी.
पंखे : जी. ई. सी.
रेफ्रिजरेटर : केल्व्हीनेटर

अधिकृत विक्रेते :
रेडिओ : टेलिफंकन, मर्फी
रेफ्रिजरेटर : गोदरेज, जेम
टेलिव्हिजन : टेलिव्हिस्टा

अधिकृत विक्रेते :
रेडिओ : टेलिरॅड; स्टँडर्ड; एच. एम. व्ही.
रेफ्रिजरेटर : आल्वीन; टेलिव्हिजन : टेलिरॅड
मिक्सर : रिको.

पत्ता : मेयर बिल्डिंग; दादर स्टेशनासमोर,
(वेस्टर्न रेल्वे) मुंबई २८; फोन : ४५८०३५

# डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या कथा

**बाबूराव बागूल**

---

## तीर्थरूप



मुलगा शाळेतून आला असेल. काळजीने वाट बघत असेल. रेल्वेचा पास संपलाय तो काढायला सकाळी त्याने पैसे मागितले होते. उद्या पास काढला नाही तर शाळेत कसं जाता येईल ?... आणि मग...

सुभेदारांना पुढची कल्पना सहन झाली नाही. त्यांचे पाय उचलले गेले. ते रस्ता पार करण्यासाठी वळले. रस्त्यावर आले. लालबागच्या घोड्याची ट्राम येत होती. ते चटकन रूळ ओलांडून पुढे झाले. आणि त्याच वेळी त्यांचे हात खिशात गेले. खिशात पैसे होते. सुभेदारांना बरे वाटले. त्यातून पासाला पैसे देता येतील. बरेच दिवस भिवा पुस्तक घ्यायला पैसे मागतोय. ते घ्यायला दिले की भिवा खूष होईल. अभ्यास करण्याबद्दल सांगितलेला उपदेश ऐकेल.

सुभेदारांच्या डोळ्यांपुढे त्यांचे बोलणे एकचित्ताने ऐकणाऱ्या भिवाचा वाटोळा, फुगीर गालाचा, प्रफुल्ल डोळ्यांचा चेहरा आला आणि त्यांना आनंद झाला. ते भराभर पाय उचलून रस्त्याच्या कडेला गेले. चालू लागले. आणि त्यांच्या डोक्यात पुनः आपल्या लाडक्या लेकाचे विचार सुरू झाले.

भिवा एवढी पुस्तकं का वाचतो ? नको म्हटलं तरी ऐकत नाही का ?... या मागे काही भगवंताचा हेतू आहे ? असेल ? आहेच... तसे सुभेदाराचे भाविक मन व्याकूळ झाले. श्रद्धेने भरून येऊ लागले. तसतशी पावले धिमी होऊ लागली. आस्वाद घेताना मन जसे स्थिर शांत होते तसे त्यांचे व्याकूळ झालेले मन शांत होवू लागले.

निवांत मनाने सुभेदार वस्तीत शिरले तेव्हा अंधार झालेला होता. तो अंधार पाहून सुभेदारांना पुन्हा भिवाची आठवण झाली. त्यांना वाटले, शाळेतून आल्या आल्या भिवाने त्याच्या बायला विचारले असेल, बाबा कुठं गेलेत ?... आपण तिला अन त्यालाही सांगितले आहे की, आपण बाईकडे पैसे आणायला जातो. आपण त्याला हे सांगून चूकच केली. त्याला आपली गरीबी कळायला नको. तो मग पैशाबद्दल विचार करू लागेल. पैसे मिळविण्याची त्याला इच्छा

होईल. शाळेबद्दल वा ज्ञानाबद्दल त्याला अप्रिती वाटू लागेल. असे झाले. म्हणजे तो शिकणार नाही. नोकरीच्या मागे लागेल. आपले चुकलेच. ही चूक कधी होवू दिली नाही पाहिजे. तसे सुभेदार कष्टी होवू लागले. तशी त्याना काल रात्री भिवाने केलेल्या मारामारीची आठवण झाली. मार खाल्लेली सर्व पोरे भिवाचेच नाव सागत होती. एवढ्या पोरांना एकट्या भिवाने मारले कसे ? असे आपण विचारले तसे सर्व लगोटीवाले बिथरले. तावातावाने भाडू लागले. अगदी हमरीतुमरीवर आले. शिवीगाळ करू लागले.

सुभेदाराना ते शिव्याशाप, तो राग संताप पाहून वाईट वाटू लागले. त्यांच्या मनात प्रश्नामागून प्रश्न उठू लागले. भिवा असा वागतो का ? एवढा सतापतो का ? एवढ्या पोरांना तो मारतो कसा ?

असे प्रश्न मनात येत असताना त्याना भिवाने दिलेले उत्तर आठवू लागले... तो भाडणाचे कारण सांगताना म्हणाला होता, ते आपल्याला धोतरे भट ब्राह्मण म्हणतात. चिडवतात. आपण मिलटरीवाले ब्राह्मणाच्या पोटचे असे ते म्हणतात. मी त्याना विचारले, चागले लोक धोतर का नेसतात ? धोतर चागले की, कुल्ले दाखवणारी लगोटी चागली ? तर पोर म्हणतात, धोतरे ब्राह्मण नेसतात म्हणून वाईट. लगोटी चागली.

सुभेदाराना हे आठवताच भिवाचे कौतुक वाटले. पण त्याच वेळी त्याच्या मनात आले, हा अधार दूर कसा होणार ? या लोकाना त्याचे दुःखही कळत नाही, दैन्यही समजत नाही. असे का व्हावे ? हे अज्ञान कोण देते ? देव ? गेल्या जन्माचे पाप ? पाप बुद्धिभ्रष्ट करते ?... गेल्या जन्माच्या पापामुळेच महाराच्या पोटी माझा जन्म झाला. मी पाप केले ? कोणते ?... अन माझ्या भिवानेही... नाय. नाय...

सुभेदार तरारून आले. विचार करू लागले. तशी त्याना महाड शाळेची एक बैठक आठवू लागली. वलनकरबुवाने तिथे भाषण केले होते. ते उपदेश करीत असताना त्यानी ज्योतीराव फुल्याचे नाव घेवून सागितले की, देवाचा यात दोष नाही. हे ब्राह्मणाचे कसब आहे. त्यानी ही पोथीपुराणे रचली आणि जनता वेडीवाकडी केली. खरे आहे ?... खरे आहे ?...

सुभेदार चाळीच्या जवळ आले. चाळीच्या पलीकडे असलेल्या उघड्या खाचरातून पोराचा आरडाओरडा ऐकू येत होता तो ऐकून भिवा तिथे असावा असे वाटून ते थाबले. भिवाला पाहू लागले. पण तो ओळखू येत नव्हता. अधारामुळे सर्वच पोरे सारखीच दिसत होती. नेमकी ओळखू येत नव्हती. भिवाचा आवाजही ऐकू येत नव्हता. कदाचित कालच्या मारामारीमुळे, कालच्या उपदेशामुळे तो बाहेर पडला नसेल. अभ्यासाला बसला असावा. त्याच्या जबाबदारीची जाणीव त्याला झाली असेल. असे मनात येताच त्याना आनद झाला. अभ्यास करीत बसलेला भिवा बघावा म्हणून ते पटकन पाय उचलून निघाले. तो आता दररोज सध्याकाळी पुजेपर्यंत अभ्यास करीत बसणार, प्रथम क्रमाकाने पास होत जाणार ही कल्पना त्यांना उत्सुकता आणि आनद देवून गेली.

अत्यंत उत्सुकतेने ते खोलीपुढे आले. त्यानी डोकावून पाहिले. ओठावर शाबासकीचे शब्द, डोळचात आनद आणि कौतुक गोळा होऊन आले होते. पण खोलीत भिवा नव्हता. अभ्यास करीत नव्हता. त्याचे दप्तर नेहमीप्रमाणे एका कोपऱ्यात फेकून दिलेले होते. ते तसेच अस्ताव्यस्त पडलेले होते. खोलीत काळासावळा, उदासवाणा उजेड होता. चुलीतला जाळ निरुत्साने जळत होता. अन पोरसवदा सूनबाई चुलीपुढे आदबशीरपणे बसलेली होती. हे पाहून सुभेदारांचा विरस झाला. डोळ्यातील आनद मावळून गेला. ओठावरली शाबासकी खाली सरकली आणि तिथे काळजी आली. भिवा अजून घरात आलेला नव्हता. पोरांमध्ये नव्हता. मग गेला कुठे...?

'सूनबाई...' सुभेदारांनी पायरीवर पाय ठेवताच सुनेला हाक मारली. सासऱ्याच्या हाकेतील तीव्रतेने, वेदनेने सासऱ्याच्या व्यक्तिमत्वाने, सात्विकतेने दबून गेलेली लक्ष्मीबाई घाबरून गेली. तिने डोक्यावरला पदर कपाळावर ओढला. अग आवरून घेतले. तसे तिचे प्राणही एकवटून आले.

'भिवा घरात आहे ?'

तिने नकारार्थी मान हलविली.

'काही सागून गेलाय ? केव्हा गेलाय ? परत येवून बुकं घेऊन गेलाय ?...' लक्ष्मी पार घाबरून गेली होती. तिचे केवळ माना हलवून उत्तरे देणे पाहून त्याना राग आला. पण तो गिळून ते म्हणाले,

'लेकरा, मला एवढं घाबरू नको. सासरा म्हणजे बाप. तुझे काम चालू दे. अधार झालाय तरी तुझा दीर घरात नाही म्हणून विचारले. बोलाव. अशान जीव कोंडतो. त्रास होतो.

सासऱ्याचा प्रेमळ आवाज ऐकून तिला बरे वाटले. कोडलेले मन मोकळे झाले. ती अधिक चुलीकडे सरकली.

सुभेदार आत आले अन तिचे ते चुलीला बिलगून बसणे पाहून त्यांना हसू आले. तसा त्यांच्या मनात विचार आला मोठमोठ्या जाडजूड पुरुषांना आणि तोडभाड बायकाना न घाबरणारा भिवा या गरीब लाजाळू मुलीला काय दाद देतो. आणि लगेच त्यांना मुलाचे कौतुक वाटू लागले. तसा त्याच्या मनावरला ताण कमी झाला. कोपऱ्यात अस्ताव्यस्त पडलेले दप्तर आणि खुटीवर व्यवस्थित ठेवलेली टोपी पाहून त्यांना हसू आले.

दिराने कोपऱ्यात फेकून दिलेले दप्तर आपण उचलून ठेवायला पाहिजे होते. त्यांना दप्तर पायदळी पडलेले आवडत नाही. ते रागावतील रागावले असतील. दप्तर उचलून ठेवावे म्हणून भय वाटत होते तशी लक्ष्मी उठू लागली. तसे सुभेदार म्हणाले,

'उठू नको लेकरा, बस बस. तुझे चालू दे. तुझा दीर दिसला नाही म्हणून. कुठ गेलाय ? काही सागून गेलाय ?...' सुभेदाराना हे प्रश्न विचारता विचारताच वाटले,

ती बापडी काय उत्तर देणार ? तो काय तिला सांगून जाणार. अन गेला तरी ती काय सागणार ? सुभेदार वैतागल्यासारखे झाले. आतून त्याना मुलाचे कौतुकही वाटत होते. लक्ष्मीने डोक्यावरला पदर कपाळावर ओढून घेताना सासऱ्याला ओझरते पाहून घेतले. पायातले पायतान तसेच पायात होते. डोक्यावरला फेटा खुंटीवर ठेवलेला नव्हता. ते कोपऱ्यात बघत उभे होते. प्रथम त्यांच्या चेहऱ्यावर कौतुकाचे भाव उमटले होते. नंतर काळजीची बारीकशी छटा. सुनबाईने चटकन मान खाली घातली. नजर चुलीकडे वळली. चुलीत तालसुरात लाकडे जळत होती. तालात अग्नीज्वाला आणि

धूर बाहेर येत होता. आणि कानावर सासऱ्याचा चिंताजड शब्द आला होता. – भिवा दिवसेनदिवस भारी हूड होत चाललाय.'

सूनबाईने वर मान केली नाही. सुभेदार उभेच होते. विचार करीत होते. भिवा असा वंडखोर का झालाय? खुशाल अनाड्यां-बरोबर मारामाऱ्या करतोय. भांडतोय. का? सुभेदारांनी मिलटरीत असताना मराठी इंग्रजी वाचले होते. पण त्यांना भिवाच्या वागण्याचे कारण कळून येत नव्हते. ते स्वतःला विचारीत होते. डबक चाळीत राहायला आल्यामुळे तो असा वागतोय? की शाळेमध्ये त्याला जाच आहे? जाच असणार कसला? तो हुषार आहे. पास होतो. रोज उठून शाळेत जातो. घरी येतो. तब्येत ठीक आहे. खूप असतो. कधी अबोल होतो. गंभीर होतो. व्याकूळ दिसतो. का...? आईची आठवण येत असेल...आईवर त्याचं फार प्रेम होतं; आहे. म्हणून त्याच्या सावत्र आईचा तो द्वेष करतो. भिवाने असे वागावे काय...?

पण तो असं का वागतो? का भांडतो? का चिडतो? का मारामाऱ्या करतो? कारण काय असावे?...

कोणी दहा-पाच पोरांनी मारले. हाणले...त्यात काही भलेबुरे झाले...?

सुभेदार चटका बसावा तसे या कुशंकेने थरारले. बावरले. त्यांचे डोळे अस्वस्थ झाले. व्यवस्थित ठेवलेली खुंटीवरली टोपी आणि फेकून दिलेले, अस्ताव्यस्त पडलेले दप्तर त्यांची भीती वाढवू लागले. त्यांनी बावरून सभोवार पाहिले. बाहेरचा अंधार दारात येऊन उभा राहिला होता. तो आत येऊ पहात होता. पण चुलीत जाळ होता. चुलीजवळ दिवा होता.

'लक्ष्मी...'

लक्ष्मीबाईने मान उचलून सासऱ्याकडे बघण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण भयाच्या दडपणाने दबलेली तिची मान वर झाली नाही. तसा अधिक तीव्र आवाज आला,

'तो बाहेर गेला तवा घरात कोण व्हतं...ही नव्हती? बयो नव्हती? त्याला न्यायला कोण कोण पोरं आली व्हती?'

सासऱ्याच्या तीव्र आवाजातील भडीमाराने लक्ष्मीबाई भेदरून गेली होती. तिची वाचा लोळागोळा होऊन गेली होती. काय झाले, काय नाही हे तिला कळत नव्हते.

'लक्ष्मी...'

'जी...' मोठ्या प्रयत्नाने लक्ष्मीबाईच्या तोंडातून गुदमरलेला आवाज निघाला.

'त्याला न्यायला कोणी आलं व्हतं?

आता लक्ष्मीला आठवले. तिचा दीर दप्तरातून पुस्तकं घेऊन मुकाट्याने बाहेर पडला होता. तिने काहीतरी विचारले होते. त्याला ते ऐकूही आले नव्हते. तो मुकाट्यानेच बाहेर गेला होता.

'बुकं नेली...'

'कोणी?...सुभेदार उत्तर देणार नाही हे जाणून दप्तराकडे पाहू लागले. दप्तरातून पुस्तके काढलेली होती.

'अभ्यासाला गेला वाटतं?' त्याला रस्त्यावरच्या दिव्याखाली बसून वाचणे आवडते, असे तो म्हणाल्याचे त्यांना आठवले. तसे त्यांनी पायातील पायताण काढले. कोपऱ्याकडे गेले. दप्तर व्यवस्थित करून उचलून ठेवले. तसे लक्ष्मीबाईला वाटले, ते आता हातपाय धुयाला पाणी मागतील. ती उठली. पाणी घेऊ लागली. तसे सुभेदार म्हणाले,

'आता नको. मी त्याला घेऊन येतो. मी नसताना आला तर त्याला सांग, मी आलोय. त्याला हातपाय धुयाला पाणी द्या... सासूला, बयेला पुजेची तयारी करायला सांग...बोला...?'

आणि सुभेदार भिवाला शोधून आणायला बाहेर पडले. बाहेर अंधार पडला होता आणि त्या अंधाराचा भेद करीत आजूबाजूच्या गिरण्यांच्या भोंग्याचा आवाज उसळत होता. उसळत होता. ❦

# अभ्यास



सांज झालेली होती. वातावरणात व्याकूळता होती. ती अंतःकरणात शिरत होती. त्यामुळे आधिच निरस, उदास झालेले मन अधिक उदास, निरस झाले होते. बेचैनसे वाटत होते. दुःखासारख आत काहीतरी ठसठसत होते. त्याला नेमके काय होतंय ते कळत नव्हते. आईची आठवण झालीय का? ती झाली नव्हती. पण ती झाली म्हणजे जसे होते तसेच वाटत होते.

तो डबक चाळीतून बाहेर आला. काल बाबांनी दम देऊन आणले तिकडे जावेसे वाटत होते. मोकळे मोकळे वाटते. पण बाबा रागावले होते. हे आठवताच डबक चाळीजवळल्या मैदानाकडे जावेसे वाटू लागले. तिथे लहानमोठी लंगोटीवाली पोरे खेळत होती. त्यांची उसळणारी बोंब आकर्षून घेत होती. वाटत होते, जावे. खूप खेळावे, वागडावे, अगदी दंगल उडवून द्यावी.

पण का कोण जाणे पाय तिकडे वळत नव्हते. मन तिकडे पळत नव्हते. तो फक्त थांबला, बघत राहिला आणि शिवाचा आवाज ऐकून त्याला दोन दिवसांपूर्वी पोरांच्या मारामारीनंतर मोठ्यांच्या झालेल्या शिवीगाळीची आठवण झाली. तसे त्याने तोंड फिरविले.

पाय चालू लागले. मनात विचार येऊ लागले...धोतर नेसणे वाईट ? तुमान, पाटलोण वापरणे वाईट ? मग साहेब लोक, मोठमोठे लोक, शाळा कॉलेजात जाणारी लहानमोठी मुले लंगोटी का नेसत नाहीत ?...मूर्ख...

त्याला चीड आली. घरी जावेसे वाटू लागले. घरी जाऊन करायचे काय ? अभ्यास ? तो तर शाळेतून घरी येतायेताच केला. मग बाबाबरोबर पूजा ? त्यावरून तर ही पोरे चिडवतात, भट्ट, ब्राह्मण, धोतरे...भट्ट ब्राह्मण तर दिसायला चागले दिसतात, गोरे असतात, स्वच्छ दिसतात श्रीमत असतात. त्यांना काय नाव ठेवायचे ? त्यांना कशाबद्दल हिणवायचे ? चांगल्याला वाईट म्हणणे चूक ! चूक की बरोबर ? बरोबर कस ? भिवाचा गोंधळ होऊ लागला. तो अस्वस्थ मनाने चालू लागला. मनात प्रश्न उठत होते. पण उत्तरे सापडत नव्हती. अन बेचैनी वाढत होती. अशा मन.स्थितीतच तो काही पाऊले गेला आणि एकाएकी त्याला त्याच्या वडिलाशी झालेला सवाद आठवला. पोरानी त्याला, त्याच्या वडिलाना 'धोतरे' भट म्हणून चिडवले होते.

'बाबा, पोर मला ब्राह्मण्या असं चिडवतात. तुम्हाला पण तसच म्हणतात. ब्राह्मण वाईट असतात ?'

'असं.'

'हो. पण ब्राह्मण वाईट असतात ?' त्याला आठवले, बाबा भितीकडे बघत विचार करीत होते. बराच वेळाने ते त्याच्याकडे बघत म्हणाले, 'हो...' बाबाचे उत्तर त्याला समाधानकारक वाटले नव्हते. पण ते खोटे बोलतील असेही त्याला वाटले नव्हते. आताही त्याला बाबानी दिलेले उत्तर पटत नव्हते. म्हणून त्याने विचारले होते,

'कसे ? गोरे असतात. स्वच्छ दिसतात. काही पोर तर हुशारही असतात '

'जाऊ दे मग.'

'सागा ना...वळंगकर म्हणतात, जातीभेद त्यांनी केला. ज्योतीबा तेच सागतात.'

'ज्योतीराव ?'

'फुले. पुण्याचे.'

'जाती भेद म्हणजे काय ?'

'एक महार, एक मांग, एक ब्राह्मण, एक वाणी.

'म्हणजे एक तिकीट देतो. एक तिकीट घेतो. एक गाडी चालवतो. एक गार्ड असतो. एक रेल्वेत हॉटेल चालवतो. एक झाडू मारतो... अस ?'

'अस नाही.' वडिलाना बोलायला अवघड जात होते. मिलिटरीच्या गोष्टी सांगताना, भजनं, गाणी म्हणताना ते जसे छान दिसतात, बोलतात तसे बोलता येत नव्हते.

'मग ?'

'जाती जन्मावर असतात.'

'म्हणजे ?'

'तू माझा मुलगा, म्हणून तू महार.'

'मग झाले ? बाबा, चित्या मला महारडा म्हणत असतो. मी जवळ गेलो तर चिडतो. दूर व्हायला सागतो. महार कसे असतात... अगाला तलवारी बांधतात की–शेण लावतात ?...तो चित्या म्हणतो, आम्ही महाराला शिवायचं नसतं...'

हे ऐकताना वडील दु खी झाले होते. विचार करीत होते, काही बोलले नव्हते. झोपताना ते गहिवरून गेले होते. रडव्या आवाजाने बोलत होते. अभ्यास करायला, खूप शिकायला सागत होते. कुरवाळीत होते.

भिवाला त्या रात्रीची वडिलाची व्याकुळता, रडवेला आवाज ऐकून आता वाईट वाटले. त्याच्या मनात आले, आपण अभ्यास केला पाहिजे. शिकले पाहिजे. पण मुल कुठं शिकून देतात. ही पोर सायबा बाम्हण्या अस चिडवतात आणि ती शाळेतील पोरं महारडा म्हणून दूर ठेवतात. आपण आहोत कोण ? चित्या लेकाचा हलकट आहे. सुडक्या चागला आहे...पण मी कोण ?...

भिवा गोंधळून गेला. मी कोण याचे उत्तर त्याला सापडत नव्हते. शक्यही नव्हते. तो वैतागला थावला. तसे त्याचे डोळे पटकन् मैदानाकडे धावले. पोराचा खेळ रंगात आला होता. धावपळ कळसाला पोहोचली होती. प्रेमाने चिंब भिजलेली शिवी अधूनमधून उसळून लकाकून जात होती. तिला उत्तर म्हणून कधी फवारून येणाऱ्या लाटेप्रमाणे हास्य उसळत होते. अथवा तशाच आनंदाने शिवीला शिवी कडाडून कवटाळीत होती. मजा होती, मस्ती होती, गती होती. ती पाहून भिवाच्या अंत.करणातून जोरदार उर्मी उसळत होती. शरीराला मैदानाकडे झोकीत होती. पण तो उभाच होता. तटस्थ होता. बघत होता. दोनएक दिवसापूर्वीचे भाडण, शिवीगाळ, रागाने आणि दारुने कठोर झालेले चेहरे, वडिलाचा सताप आणि रात्री अथरुणावर अग टाकताना केलेला उपदेश त्याला पुढे जाऊ देत नव्हता. त्याला मधुरशी चीडच आलेली होती. रागच आलेला होता.

मलाकडे जाता येत नाही, इच्छा असूनही मिसळता येत नाही... ही मुले शाळेतील मुलांसारखी का होत नाहीत म्हणजे किती मजा येईल ती मुले या मुलासारखी का होत नाहीत...माझे कोण ? ही की ती...

त्याला या आणि त्या मुलाचे दोष आठवू लागले तसे त्याचे मन दु खाने, त्राग्याने ठसठसू लागले. त्याला वाटले, नको ही मुल...नको ती मुलं...पुस्तक वाचू. तसे त्याला बगलेत दाबून धरलेल्या पुस्तकाचे स्मरण झाले. पासाचे पैसे खर्चून त्याने दोन-तीन पुस्तके घेतली होती. बगलेत नेपोलियनचे चरित्र होते. त्याला ते फार आवडले होते. त्याने लगबगीने पुस्तक उघडले. अधार असल्यामुळे त्याला मजकूर वाचता आला नाही. तसा तो पलीकडे असलेल्या रस्त्याकडेच्या दिव्याखाली जावे म्हणून निघाला. पाय उचलून चालू लागला.

समोरचे आकाश निळे कोवळे दिसत होते. अलीकडे काळसर हिरवी झाडांची गर्दी दिसत होती. त्यातली काही ताडामाडाची झाडे वर गेलेली होती. त्यांचे शेंडे काळे दिसत होते. पलीकडे एक धुराडे आकाशात गेले होते. त्यातून हळूहळू धूर निघत होता. तो वळणावळणाने वर जाताना दिसत होता आणि पुढे दिसेनासा होत होता.

'कुठे जात असेल हा धूर ?' वर जाणाऱ्या व नाहीशा होणाऱ्या धुराकडे बघत असतानाच त्याच्या मनात सवाल येत होते, 'कुठे ? स्वर्गात ! स्वर्गात गेला तर काळा धुरकटलेला, ओगळवाणा होणार नाही ? स्वर्गातील देवांच्या नाकातोडात जाऊन त्याना खोकल्याच्या

पृष्ठ ४२ वर

जसजशा साक्षी होत गेल्या तसतसं डॉक्टरच्या भोवती असलेलं बुद्धिमत्तेचं, कर्तृत्वाचं, यशाचं वलय विरू लागलं. डॉक्टरना बघायला कोर्टात गर्दी वाढू लागली. वृत्तपत्रे साक्षीदारांच्या फोटोसकट बातम्या छापू लागली. ती जखम कसली होती ? मिसेस रक्स्टन आणि मेरी आहेत तरी कुठे ? आणि इकडे कोर्टात सरकारी वकीलांनी आता हुकुमाचा एक्का बाहेर काढला. . . .मिसेस हॅंपशायर.


---

लंडनमधील एक खळबळजनक खूनखटला

सादरकर्ते : ॲड. माधव कानिटकर

---

# दैव जाणिले कुणी?



या होत्या सौ. हॅंपशायर ! सरकारी वकिलानी काळजीपूर्वक त्यांची तपासणी सुरू केली.

'मिसेस हॅंपशायर आरोपीला ओळखता ?'

'हो ! मी त्याची पेशट होते'

'सप्टेंबर महिन्यात कधी त्याची तुमची गाठ पडली होती ?'

'हो १५ सप्टेंबरला. त्या दिवशी रविवार होता. सघ्याकाळी ४॥ वाजता डॉक्टर माझ्याकडे गाडी घेऊन आले होते !'

'काय बोलणं झालं ?'

'ते मला म्हणाले जरा घरात आवराआवर आणि साफसूफ करायचीय, मदत करता का ? माझा हात कापलाय, मला एकटचाला ते काम जमणार नाही.'

'तुम्ही हात कशानी कापला विचारलंत ?'

'हो. ते म्हणाले फळाचा डबा उघडताना हात कापला गेला'

'मिसेस रवश्टनबद्दल काही तुम्ही चौकशी केलीत ?'

'केली. डॉक्टर मला म्हणाले ती ब्लॅकपूलला गेली !'

'...आणि मेरी ?'

'मी विचारल. कारण मेरी असताना माझी मदत कशाला हा मला प्रश्नच पडला होता.'

'काय म्हणाले डॉक्टर ?'

'ती आज रजेवर आहे'

'मग तुम्ही केलीत का डॉक्टरना मदत ?'

'केली तर ! त्यांच्याच मोटारनी गेले'

'तिथे काय पाह्यलत ?'

'जिन्यावरचं कारपेट काढून टाकलेल होतं. हॉलमधे जिन्याच्या खालच्या पायरीपासून वरपर्यंत पेंढयाचे पुजके पडले होते. मी प्रथम मेरीच्या खोलीत गेले, नतर बाथरूममधे गेले.'

'कशी होती बाथरूम ?'

'एकदम घाणेरडी. भिंतीवर वरपर्यंत घाणेरडे पिवळे डाग. न ग-खाली पण एक मोठा डाग होता. डॉक्टरनी गिझर चालू केला. मला म्हणाले 'लवकर साफ कर ! पाणी लागेल तेवढ वापर, उद्या सकाळी घराची सजावट करण्याकरता माणसं येणार आहेत.'

'पुढे ?'

'मला एवढ सागून डॉक्टर बाहेर गेले. मी बाथरूम स्वच्छ केली. जिन्यावर पेंढा अशा तऱ्हेने पडला होता की जणु कुणी तरी पेंढयाची गसडीच वर घेऊन गेला असावा आणि नेताना तो पडला असावा.'

'वरती आणखी काय पाह्यलत ?'

'वरच्या दोन खोल्या बद होत्या बाकीच्या उघडया होत्या. त्या दोन खोल्याना बाहेरून कुलुपं लावली होती. मी किल्ल्या शोधल्या पण मला मिळाल्या नाहीत.'

'वरच्या हॉलमधे आणखी काय काय होत ?'

'गुडाळून ठेवलेली कारपेटस आणि काढून फेकून दिलेला सूट !'

'कारपेट आणि सूट रक्ताने माखलेले होते ?'

'जिन्यावरचा पेंढा साफ केल्यावर कुठे नेऊन टाकलात ?'

'घराच्या मागच्या परसात'

'तिथे काय होतं ?'

'एक रक्ताने थबथबलेला शर्ट आणि रक्तात भिजलेले मोठे टॉवेल्स !'

'टॉवेल्स कसे होते ?'

'अर्धवट जळलेले होते !'

'घरात किंवा आवारात कुठे फळाचा डबा दिसला फोडलेला ?'

'छे : ! डबा-बिबा काही दिसला नाही'

'हे काम किती वेळ चाललं ?'

'सघ्याकाळी ७॥ पर्यंत. मी डॉक्टराकडे आहे अस समजल्यावरून 'हे' तिथे आले आणि त्यानी मला कामात मदत केली.'

'त्यांनी काय केल ?'

'मी औषध मारून बाथरूम पुन्हा घासली आणि माझ्या मिस्टरानी जिन्याच्या पायऱ्या घासल्या. सगळीकडे रक्ताचे डाग होते'

'पुढे काय झाल ?'

'डॉक्टर त्याच्या मुलाना घेऊन आले. आम्हाला म्हणाले तुम्ही दोघ खाली जा. मला मुलाचे कपडे घ्यायचेत ती आज मिसेस अँडरसनकडे रात्रभर राहतील.'

त्यानतर डॉक्टर आम्हाला म्हणाले 'हा सूट आणि ही कारपेटस यांचा मला काही उपयोग नाही. तुम्हाला पायजे तर तुम्ही घेऊन जा आणि वापरा !'

'मग तुम्ही काय केलत ?'

'डॉक्टर, त्याच्यावर रक्ताचे डाग आहेत त्याच काय करायच ?' अस विचारल त्यावर डॉक्टर म्हणाले,

'रक्ताचे डाग काय ? भरपूर पाणी टाकून धुवा म्हणजे जातील !'

'पण एवढ रक्त आल कस ?'

'माझा हात कापला तेव्हा रक्त साडलं'

'तुम्ही ती कारपेटस आणि सूट घरी नेलीत ?'

'नेली अनेक बादल्या पाणी ओतलं तेव्हा रक्ताचे डाग कमी झाले.'

'डॉक्टर पुन्हा कधी आले ?'

'दुसऱ्या दिवशी सकाळी. त्यांनी त्यांचा सूट बघायला मागितला आणि मला कात्री आण म्हणून सागितलं'

'कशासाठी ?'

'खिशाच्या आतल्या बाजूनी टेलरच नाव आणि डॉक्टराचं नाव असलेली लहानशी कापडाची पट्टी होती ती त्यानी फाडली आणि म्हणाले जाळून टाक !'

'.. आणि तुम्ही ती जाळली ?'

'...डॉक्टरानी मला तसा आग्रह केला !'

'का केला ?'

'ते मला म्हणाले 'तुम्ही गरीब माणसं ! एवढा भारी किंमतीचा सूट तुझा नवरा कसा वापरतो या शंकेने जर कुणी तो तपासला तर उगाच माझ नाव सापडायला नको !'

१६ तारखेला सकाळी दोन ऑपरेशन्स करायच्येत तू सकाळी लवकर ये म्हणजे मला मदत होईल. अस सांगून ते निघून गेले'

'एरव्ही त्याना ऑपरेशनच्यावेळी कोण मदत करायची ?'

'मिसेस स्मिथ !'

'तिची चौकशी केलीत ?'

'हो ! डॉक्टर म्हणाले ती रजेवर आहे'.

'ठरल्याप्रमाणे मी १६ तारखेला सकाळी गेले. वरच्या दोन्ही खोल्या अजून बंदच होत्या मी त्याना विचारलं, 'डॉक्टर जेवता

कुठे ? एक तर तुमची तब्येत ठीक नाही. हात दुखतोय. मिसेसना आणा घरी ' तेव्हा ते म्हणाले, ' नको ! मी फोन करून हॉटेलमधून जेवण मागवीन. सुट्टीत मजा करण्याकरता ती गेल्येय. उगाच तिला कशाला त्रास द्यायचा ?'

वहिनी आता आहेत कुठे असं मी त्याना त्यावर पुन्हा विचारले. ते म्हणाले, ' स्कॉटलंडवरून ती ब्लॅकपूलला गेली आणि तिथून लडनला गेली असेल. ' मला शका आली. मी म्हटलं ' डॉक्टर तुम्ही खोटं बोलताय ' तेव्हा अत्यंत निराशेने ते उद्गारले ' माझ्या इतका दु खी मनुष्य जगात कुणी नसेल. बायको असून फायदा काय ? तिचे बाहेर अनैतिक सबध आहेत आत्ताच मुलं टाकून दुसऱ्या कुणाबरोबर तरी गेली बघ ! कुठे गेली कुणास ठाऊक ? येईल का नाही ही पण मला शंकाच आहे. पण मला अब्रू आहे ना ? ती लडनला नाहीतर स्कॉटलंडला गेल्येय अस सांगूनच दिवस काढतोय मी ! ' त्यानतर हताश होऊन ते मटकन खुर्चीत बसले आणि ढसढसा रडले.

दुपारी डॉक्टराचे बरेच पेशटस येऊन गेले. त्याना सौ. हॅम्पशायरने वाटेला लावले. डॉक्टर त्याच्याशी बोलण्याच्या मनःस्थितीत नव्हते. सध्याकाळी भगी आला. तो आल्याबरोबर डॉक्टर म्हणाले, ' घराच्या अगणात जळके टॉवेल आणि कार्पेटस आहेत, ती तिथून हटवून फेकून दे. '

' भंग्याने ती जाळली ?'

' नाही. तो जाळू शकला नाही. कारण ते सर्व कपडे रक्ताने भिजले होते आणि बाजूलाच पेट्रोलचा डबा उपडा होऊन पडला होता. त्याला झाकण नव्हते. ते सर्व पाहून मी सध्याकाळी घरी गेले.

त्यानंतर दोन बहिणीची साक्ष झाली. दोघीनी हे कायम केलं की, ' डॉक्टरांच्या घराजवळच आमच घर आहे. १६ सप्टेंबर १९३५ ला आम्ही रात्री सिनेमा बघून घरी आलो. रात्री १२॥–१ पर्यंत आम्ही जागेच होतो. रात्री अचानक आमच्या बेडरूमवर उजेड पडला. उत्सुकतेने आम्ही पाहिलं, डॉक्टर रक्स्टन डब्यातून पेट्रोल ओतून कपडे जाळीत होता. पण ते पेटत नव्हते. त्यावेळी घाणेरडा वास येत होता.'

नतरच्या एका साक्षीत समजलेली माहिती अशी–

बुधवार तारीख १८ सप्टेबर १९३५ ला डॉक्टरांच्या स्त्री-नोकर मिसेस ऑक्सले आणि मिसेस स्मिथ कामावर आल्या. मिसेस ऑक्सले सरळ वर गेली. तिला डॉक्टरने स्वयंपाकघरात बद केले. घाईघाईत त्याने बद केलेल्या खोल्या उघडल्या. बऱ्याच वेळा त्याने जिन्याची चढउतार केल्याचा आवाज आला. गॅरेजमधून मोटार काढून त्याने पोर्चमधे आणली. त्याचा आवाज तिने ऐकला. मोटारमधे काही ' सामान ' फेकल्याचा आवाज आला. जाण्यापूर्वी त्याने मिसेस ऑक्सलेला कडी उघडून मोकळे केले. तेवढ्यात मिसेस स्मिथ वर गेली. दोन खोल्या उघड्या होत्या. आतमधे रक्ताची थारोळी आणि घाणेरडा वास ! जाता जाता डॉक्टर सागून गेले, ' मी ३ वाजेपर्यंत नाही आलो तर पेशटना मला सध्याकाळी भेटायला सागा. '

२४ सप्टेबरला तो खुद्द सॉलिसिटर रॉबर्ट एडमडसनला वाटेत भेटला, आरोपी मला असंच म्हणाला की, ' मिसेस रक्स्टन लडनला गेली आहे. '

नंतर वकीलानी विचारले, ' तिचा आणि तुमचा ' तसा ' काही सबध होता हे खरं काय ?'

' छे: ! छे: ! अहो ' तस ' काहीच नव्हत. ती आणि मी मनमोकळेपणाने बोलायचो. पण आम्ही दोघच फक्त कुठेही कधीही गेलो नव्हतो. '

' तुमच्यामुळे त्या नवरा-बायकोत भाडणं होत होती हे तुम्हाला ठाऊक होतं ना ?'

' मिसेस रक्स्टनकडून कळलं होतं. पण आम्हा दोघाना तो त्याच्या खास भारतीय वृत्तीचा भाग वाटला. नुसत बोलून ' तस काही ' व्हायला लागल तर सुंदर विवाहित स्त्रीला नवरा सोडून इतर कुणाशी बोलायलाच नको ! '

आता शेवटचा महत्त्वाचा त्रयस्थ साक्षीदार पुढे आले ते डॉक्टर प्राध्यापक जॉन ग्लेस्टर. दोघेही वकील सरसावून बसले. आताच दोघाची खरी कमाल होती.

जर डॉक्टर प्राध्यापकमजकूर आपल्या साक्षीत पुलाखाली मिळालेली ती दोन प्रेत दोन स्त्रियाचीच होती आणि त्या दोन स्त्रिया म्हणजे सौ. रक्स्टन आणि कुमारी मेरी राजर्सन याच होत, असे सिद्ध करू शकले असते तर तो हा या खटल्यातला कळस होता. कोर्टातली उत्सुकता शिगेला पोचली. प्राध्यापक साक्ष देऊ लागले. लोक कानात प्राण आणून ऐकत होते.

' तारीख १ ऑक्टोबर १९३५ ला मी आणि माझे मित्र प्राध्यापक डॉ गिल्वर्ट मिलर, पोलिसाच्या शवागारात गेलो. तिथे मानवी शरिराच्या दोन प्रेताचे तुकडेतुकडे वेगवेगळ्या गठ्ठयात बाधलेले आढळले. ते दोन देह आम्ही एडिनबर्ग युनिव्हर्सिटीच्या अॅनोटॉमी डिपार्टमेंटला हलवले. तिथे आम्ही इनव्हेस्टीगेशन सुरू केल. दोन्ही कवटयाचे फोटो काढले हा फोटो बघा ! याला आम्ही हेडिंग दिल, कवटी नबर १ ! सन्माननीय न्यायमूर्ती, नुसता फोटो बघूनच तुम्हाला कळेल की, आतला मासल भाग दिसायला लागेपर्यंत चामडी सोललेली आहे. डोळे फोडून टाकलेत, चेहऱ्यावरची चामडी सोलली आहे, नाक कापून टाकल आहे, कान-ओठ कापले आहेत. या मागे हे भयकर कृत्य करणाराचे दोन हेतू असावेत. एक तर मृताच्या चेहऱ्याची ओळख पटू नये किंवा गळा दाबून खून केल्यानतर गुदमरून मेल्याची चिन्हे चेहऱ्याच्या याच भागावर उमटतात म्हणून. आता कवटी नंबर २ चा फोटो पहा. (केवळ न्यायमूर्तींनीच नव्हे तर ज्युरीतल्या लोकानीसुद्धा हे अगावर शहारे आणणारे फोटो नीऽऽट पाहिले ) आता हे बाकीचे फोटो पहा प्रत्येक कवटीखाली दोन-दोन हात, दोन-दोन पाय ठेवून परत फोटो काढले. कवटी नबर १ चं प्रेत उचीला ५ फुटाहून २–३ इच जास्त आहे तर दुसर प्रेत उचीला ४ फूट ११ इच आहे. इझाबेला रक्स्टनची उची ५ फूट ५ इच होती तर तरुण सुकुमार मेरीची उची ५ फूट होती. त्याच्या पायामधे मोजे त्यामुळे दोन दोन पाय चटकन बाजूला काढून लावून बघता आले.

आता ह्या कवटयाचे फोटो मी मृत व्यक्तीच्या एनलार्ज केलेल्या चेहऱ्याच्या निगेटीव्हजवर ठेवतो. बघा किती ततोतत चेहेरे जुळतात ते. '

...इथे बचावाच्या वकिलानी जोरदार कायदेशीर हरकत घेतली. ' सन्माननीय न्यायमूर्ती, काय चाललंय हे ? हा पुरावा दाखल होऊ शकत नाही. एव्हिडन्स अॅक्टच्या कुठल्या कलमाखाली हा पुरावा

होऊ शकेल ? जिवत व्यक्तीच्या जुन्या फोटोच्या एन्लार्ज केलेल्या फोटोच्या निगेटीव्हवर प्रेताचा फोटो ठेवून सागायचे हा तोच आहे ! माझी हरकत आहे या पुराव्याला...'

त्याना शात करीत न्यायमूर्ती म्हणाले, तुम्ही शांत व्हा हो वकीलसाहेब . तो पुरावा मी रेकॉर्डवर घेत नाही. '

वकीलसाहेबांची उलटतपासणी पुढे सुरू झाली आता ते चागलेच गरम झाले होते.

' डॉक्टर ! हे तुमचे कवटी नबर १ आणि कवटी नंबर ह्याच्या तुम्ही जुळवलेल्या प्रेताचे फोटो पहा. दोन माड्याच्यात लिंग दिसतय का ?'

आता रुमालानी घाम पुसत डॉक्टर म्हणाले, ' नाही ! '

' मग कशावरून सागता ती दोन्ही प्रेत बायकाची होती म्हणून. '

' ते मी सांगू शकणार नाही. माझे मित्र प्राध्यापक मिलर सांगतील. ते स्त्रियाचे तज्ज्ञ आहेत ! '

प्राध्यापक डॉक्टर .मिलर बॉक्समध्ये आले. त्यानी साक्षीत सागितल की ' त्या हाडामासाच्या मिश्रणात ३ स्तन कापून टाकलेले सापडले. पुरुषापेक्षा बाईच्या स्तनाची बोडी मोठी असते. एवढंच नव्हे त्या बोडीखालचा भाग फुगीर, नाजूक आणि मऊ असतो बोडीखालच्या चामडीत रक्त वाहिन्या जास्त असतात. '

बचावाचे वकील परत उभे राह्यले.

' प्रोफेसर साहेब ! दोन बायका म्हणजे ४ स्तन मिळाले पाह्यजेत. तुम्हाला किती मिळाले ?

' फक्त तीनच ! '

*' आता असं बघा काही वेळा तरुण स्त्रीचा स्तन खुरटलेला असतो* आणि पुरुषाचा मोठा असतो. '

' सहसा तस नसत. पण काही स्त्री-पुरुषाच्या बाबतीत तशी शक्यता असते ! '

' कशावरून सांगता दोन्ही स्त्रियाच होत्या म्हणून ?'

' कशावरून ? कवटीचं मास काढून .मी केसाची मूळं तपासली, इतक्या आतपर्यंत बायकाच्याच केसाची मूळ जातात. पुरुषांची नव्हे. दुसर म्हणजे हा एनलार्ज फोटो बघा. सौ. रक्स्टनचा आहे तो. त्यात त्यानी डोक्यावरून पुढच्या बाजूने कपाळाच्या जरा वरून कानापर्यंत मोत्याचा दागिना घातला आहे. तो त्या मासात सापडला तो त्या एक नबर कवटीला बरोबर बसतो. दोन नबरला मोठा होतो ! '

आता फिंगर प्रिंट एक्सपर्ट. त्यांनी सागितलं मासांच्या गोळयात मिळालेल्या तोडलेल्या हाताच्या बोटांची कातडी मी कापून काढली आणि त्याचे ठसे घेतले. ते ठसे डॉक्टर रक्स्टनच्या घरातल्या सौ. रक्स्टनच्या कपाटाच्या ठशाशी जुळतात. तसेच मेरीचे पण जुळतात.

पंच आले ! त्यानी ज्या चादरीत हाडामासाचे गोळे पुलाखाली टाकले ती चादर आणि सार्जंट स्लोननी घरी धाड घालून मिळवलेली डॉ. रक्स्टनची दुसरी तशीच चादर *ओळखली. दुसऱ्या पंचानी* २ डाल्टन स्वेकर, या डॉक्टराच्या बगल्या पाठीमागे सापडलेल्या पंचनाम्यात जमा केलेल्या जळलेले टॉवेल, रक्तानी माखलेली कार्पेट, पेट्रोलचा टीनचा डबा आणि डॉक्टरांचा शर्ट या वस्तू ओळखल्या.

...शेवटी सार्जंट स्लोननी तपास कसा केला याची साद्यत माहिती दिली आणि सरकारी वकिलानी केस क्लोज केली. संध्याकाळ होत आली. न्यायमूर्तींसकट सगळ्यांच्याच मनावर त्या दोन स्त्रियांच्या शरिराची झालेली शाब्दिक विटबना आणि त्यांच्या तशा मृत्युची भीषण कल्पना याचं विचित्र सावट आलं होत. ' आर्ग्युमेंटस उद्या ! ' असा मोघम हुकूम देऊन न्यायमूर्ती सिंगलटन न्यायासनावरून उठले. काय होणार ? काय होणार ? असा भीषण प्रश्न स्वत.च्या मनाला विचारीत कडेकोट पोलीस बदोबस्तात आरोपी पोलीस व्हॅनमधे चढला आणि जशी काही स्वत लाच फाशी लागणार आहे या आविर्भावात काय होणार ? याची गभीर चर्चा करीत लोक कोर्टाबाहेर पडले प्रत्येकाचा एक विचार मात्र पक्का ठरला की ' उद्या यायलाच पाह्यजे. उद्या दोघेही वकील ज्ञानाची आणि वक्तृत्वाची कमाल करणार.

■

...दुसऱ्या दिवशी कोर्टात खेचाखेच सुरू झाली. बदोबस्ताच्या पोलीस अधिकाऱ्याना लोकाना शिस्त लावताना नाकी नऊ आले ! कोर्टाचे काम पुढे चालू झाले. न्यायमूर्ती सिंगलटन यानी बचावाच्या वकिलाना विचारले, ' तुम्हाला कुणी बचाव पक्षातर्फे साक्षीदार तपासायचाय ?'

निराशेने नकारार्थी मान हलवीत वकिलसाहेब म्हणाले, ' नाही ' त्याचं बरोबर होत केस डेंजरस होती. बचावाचा साक्षीदार काही भलतच उत्तर देईल तर आरोपी आलाय त्यापेक्षा जास्त लफड्यात येईल.

...न्यायमूर्ती सिंगलटननी आरोपीला पिंजऱ्यात बोलावले आणि अस्खलीत इग्रजीत प्रश्नोत्तरं सुरू झाली.

' डॉक्टर ! तुमच्याविरुद्ध आलेला पुरावा तुम्ही ऐकलात ?'

' होय ! '

' तुम्हाला तो समजला ?'

आरोपी विषण्ण हसला. म्हणाला, ' समजला मी M. B. B. S. आहे ! '

' डॉक्टराची साक्ष तुम्ही डॉक्टर म्हणूनच ऐकलीत ना ?

' हो ! '

' काही सांगायचंय त्याबद्दल ?'

' ती तर्कावर आधारलेली आहे ! '

' तुमच्या घरातल्या कर्पेटवर, तुमच्या शर्टावर, टॉवेलवर खूप रक्त पडलं होतं अस साक्षीदार म्हणतात '

' माझं बोट कापल होतं म्हणून ते रक्त पडलं. '

' सौ. अँडरसन, सौ. हॅम्पशायर, सौ. व्हाईटसाईड, सौ. एलिझाबेथ सॉलीसिटर रॉबर्ट यांना तुमच्या पत्नीबद्दल तुम्ही योग्य पत्ता दिला नाहीत, त्यात विसगती आहे अस ते सगळे म्हणतात, तुम्हाला काय म्हणायचंय ?'

*' माझ्या पत्नीचा व्यभिचार मला लपवायचा होता. म्हणून मला तसं सांगावं लागलं ! '*

' पत्नीच्या व्यभिचाराचा काही पुरावा आहे ?'

' सॉलिसिटर रॉबर्ट बरोबर ती जास्त सबंध ठेवून होती. आता देखील मला न सागताच ती कुणावरोबर तरी कुठेतरी गेलेली आहे ! '

' बर ! या तुमच्या मेरीच्या नाहीशा होण्याबाबतीत तुम्ही काही

चौकशी केलीत का ?'

'नाही !'

'का नाही केलीत ?'

'मला वाटत ती माझ्या बायकोबरोबरच गेलेली असावी '

...बचावाच्या वकीलांनी कुणालाही समजणार नाही अशा तऱ्हेने आरोपीला खूण केली 'जास्ती बोलू नको !'

'आणखी काही सागायचय ?'

'काही नाही !'

न्यायमूर्ती सिंगलटन यानी सरकारी वकिलाकडे पहात म्हटले 'यस ?' कारण ज्यावेळी आरोपी बचावासाठी साक्षीदार तपासत नाही तेव्हा प्रथम भाषण करण्याचा मान सरकारी वकिलाचा असतो. सरकारतर्फे भाषण कस करतात याचा उत्तम नमुना होता तो. कुठेही आक्रस्ताळेपणा नाही. बिनोद, उपहास, उपरोध ? काही नाही ! फक्त मुद्याची सुसगत जोडणी.

'सन्मानीय न्यायमूर्ती आणि ज्युरीमधल्या सभ्य गृहस्थानो ! सगळा पुरावा ऐकल्यानतर सगळ चित्र आता स्पष्ट दिसतंय्. आरोपीची पत्नी—मी तिला त्याची पत्नीच म्हणतो कारण त्यांना दोघाना ३ मुल झाली. समाजात ती दोघ पति-पत्नी म्हणूनच वावरत होती. स्वत: आरोपी तिचा उल्लेख पत्नी म्हणूनच करत होता आणि आत्ता देखील केलान. त्याच स्टेटमेंट बघा तर अशी ही त्याची पत्नी. सॉलिसिटर रॉबर्ट एडमडसनला लागू आहे अशी त्याला शका—फक्त शका आली. तिच्या व्यभिचाराचा पुरावा काय ? तर ती त्याच्याशी बोलते. १३ सप्टेंबर १९३५ लाच सशय पिशाच्चानी आणि मत्सराने पछाडलेल्या या सैतानानी तिलाच नाहीशी करायची ठरवली. सकाळी आपली नोकर मिसेस एलिझाबेथला २-३दिवस कामावर येऊ नको म्हणून सागतो. बाकीच्याना रजा देतो. रात्री आपल्या पत्नीचा खून करतो. तो मेरीनी पाह्यला असणार म्हणून तिचा पण खून करून १४ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर या दोन दिवसात त्याच्या प्रेताचे तुकडे तुकडे करतो—कसे तर अगदी सर्जनच करू शकेल असे. आणि आरोपी सर्जन आहे ! एखाद्या खाटकाला सुद्धा बोकडाचे तुकडे करताना वाईट वाटत असेल. याला वाटल नाही कारण मत्सर त्या पातळीवर गेलेला. सौ. अँडरसन, सौ. हॅम्पशायर, सौ. व्हाईटसाईड, याना डबा उघडताना बोट कापल म्हणून सांगतो. बोट कापून शर्ट, कार्पेट, टॉवेल आणि सूट हे कपडे रक्तानी माखतात ? त्याच बोट कापलं नाही. रक्ताच्या उपस्थितीच कारण देता यावे यासाठी त्यानी ते स्वत:च कापून घेतलं. ते कपडे त्यानी जाळून टाकण्याचा प्रयत्न केला असा पुरावा आहे. मोलकरणीच्या नवऱ्याला दिलेल्या सुटाचं आतल याच्या नावाच लेबल हा त्याच्या पत्नीला जाळून टाकायला भाग पडतो. पत्नीची चौकशी केलीच कुणी तर कधी ती लंडनला, कधी स्कॉटलडला, कधी ब्लॅकपूलला गेल्ये अशा विसगत थापा मारतो. एवढ्यावर भागल नाही. प्रत्येकवेळी मेरी पण तिच्याबरोबरच गेल्ये अस तो आर्जवून सागतो. कारण याला ठाऊक आहे, त्या दोघीही आता या जगात नाहीत. खरोखरच त्यानी दोघीना एकदम घालवले. पुलाखाली त्याची प्रेत मिळाली तेव्हा त्याबरोबरच पेंढा मिळाला. आणि त्याच्या मुलाचा स्वेटर सापडला जो मेरीच्या आईनी अचूक ओळखला. तर सौ. हॅम्पशायरनी हे कायम केल की त्याच्या घरात जिन्यावर पेंढाच पडला होता. तो देखील १४ सप्टेंबर १९३५ ला. डॉक्टरांची साक्ष यांनी डॉक्टर म्हणूनच ऐकली असं तो स्वत: म्हणतो पण पुढे म्हणतो 'ती तर्कावर आधारलेली आहे !' युवर ऑनर ! कायदा हा विषयच असा आहे की त्याचा सगळ्या शास्त्राशी सबंध येतोच. फौजदारी कायद्यात तर्कशास्त्र नाही असं याला कुणी सागितलं ? काही सशयातीत पुराव्यावरून विशिष्ट गोष्टी घडल्या असल्याच पाहिजेत. यालाच तर्कशास्त्र म्हणतात ना ? फौजदारी कायदा आणि राजकारण, कायदा आणि वैद्यकीय ज्ञान, कायदा आणि साहित्य, कायदा आणि नितिमत्ता, याचा अन्योन्य सबध आहे. आरोपीनी स्वत च लिहिलेल 'माझ्या हालचाली हे चोपड—मी चोपडंच म्हणतो त्याला' ते बघा ! १४ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर या काळात त्याच्या 'हालचाली (My Movements !) बघा. त्यात इतकी विसगती आणि अपराधी मनाचा आविष्कार आहे की हे खून ह्यानीच केले हे सागायला कायदेतज्ञाची जरूरच नाही. दोन स्त्रियाचा गळा दाबून खून करून नतर स्वत च्या रहात्या वास्तूत त्यांचे तुकडे तुकडे करून ते कुठेतरी फेकून देणाऱ्या या निर्लज्ज नराधमाला नाही मानवी जीवाविषयी आदर, ना दया ! पत्नी म्हणजे काय ? आपल्या आयुष्यात तिच स्थान किती महत्त्वाचे आहे, हे हा समजू शकत नाही. का आपली बायको म्हणजे आपल्या म्हणण्याप्रमाणे वागत नाही म्हणून केव्हाही तुकडे करून टाकण्याची चीज ? युवर ऑनर ! त्या दोन स्त्रियाच्या देहाचे हाल त्यांची शारीरिक आणि शाब्दिक विटबना बघा. काय यातना भोगल्या असतील त्यानी ? जिच्याशी यानं पत्नीचं नात जोडल, जिच्यापासून याला मुलं झाली, जी वस्तुत: निष्पाप होती अशा पत्नीचा आणि तिच्या एकनिष्ठ सेविकेचा यानी स्वत.च्या स्वार्थासाठी खून केला. मेल्यानतर तरी शत्रूच्या प्रेताला आपण वदन करतो. ह्यानी मेल्यानतर—नव्हे मारल्यानतर—दोन स्त्रियाचे डोळे फोडले, नाक कापली, दात पाडले, कातडी सोलली; हात पाय तोडले आणि साध्या वर्तमानपत्राच्या कागदात आणि चादरीत ती हाड आणि मास कसही एकत्र करून नाल्यात फेकून दिल. काय माणूस आहे का कोण आहे ? जो दुसऱ्याला दया दाखवत नाही त्याला न्यायदेवतेने दया दाखवता कामा नये. या स्वार्थी, माथेफिरू, आणि नीच माणसाला मरेपर्यंत फाशीची शिक्षा द्यावी अशी मी नम्र विनती करतो.'

...सरकारी वकीलाच्या भाषणाचा परिणाम चागलाच झाला. केस ऐकायला आलेले लोक आरोपी डॉक्टर रक्स्टनकडे एक तिरस्करणीय व्यक्ती म्हणूनच पाहू लागले. खुद्द डॉक्टर रक्स्टनच्या डोळ्यात पाणी तरळल. का रडला असेल तो ? खून केले होते म्हणून का निर्दोषी असून सरकारी वकील त्याना वाटेल ते बोलले म्हणून ? बघू या बचावाचे वकील काय म्हणता ते !

'...सन्माननीय न्यायमूर्ती आणि ज्युरीमधल्या सभ्य गृहस्थांनो—आत्ताच माझ्या विद्वान वकीलमित्रांच एकतर्फी उत्तम भाषण तुम्ही ऐकलत. ते एकतर्फी होत हे सांगायला माझी जरूर नाही. पण न्याय आणि सत्य फक्त एकाच बाजूनी नसतं. उथळ विचारानी भरलेल आणि शब्दबबाळ भाषण हे नेहमीच उत्तम वाटत. म्हणून तर फडतूस माणस नुसत्या बोलण्याच्या ताकदीवर नेते बनतात आणि लाखालाखाच्या सभा घेतात. आपण त्यातले नाही. आपल्याला सत्य आणि

न्याय बघायचाय. आरोपीविरुद्ध सरकारतर्फे सादर केलेला तथाकथित पुरावा म्हणजे कल्पना विलासावर आधारलेला पुराव्याचा पोकळ डोंगर आहे! (an imaginative reconstruction, unsupported by the evidence!)

सरकारी वकील म्हणतात फौजदारी कायद्यात सगळी शास्त्रं येतात. ही नुसती वकिली व्यवसायातली अनाठायी आत्मप्रौढी आहे. कायद्याचा बहुसंख्य शास्त्राशी जवळचा सबंध येतो हे मी पण कबूल करीन. पण तो सबध म्हणजे त्या क्षेत्रातलं ज्ञान नव्हे. तस नसत तर उत्तम डॉक्टर होण्यासाठी एम. बी. बी. एस. होण्याची जरूर नव्हती. फक्त एल. एल. बी. व्हायच! उत्तम संपादक? एल. एल. बी! उत्तम इंजिनिअर? एल. एल. बी.! उत्तम प्राध्यापक? एल. एल. बी.! खुनाची केस संशयातीतरीत्या सिद्ध करण्याकरीता फक्त एकच गोष्ट सिद्ध करावी लागते ती म्हणजे 'आरोपी आणि आरोपीनीच अमुक व्यक्तीचा अमूक दिवशी सशयातीतरित्या खून केला!' हे मी तुम्हाला फक्त कायद्याचा तज्ज्ञ म्हणूनच सागतोय. सरकारी वकीलां-सारख तर्कशास्त्राच्या आधाराने नव्हे. पुराव्याचा तर्काशी काहीही सबध नाही. 'अमुक झालं म्हणजे तमुक झालं असलच पाह्यजे,' 'कदाचित असही असेल असं आपल्याला समजायला हरकत नाही' ह्या वाक्याना कवडीची किंमत नाही. झाल का नाही झाल? झाल असल्यास पुरावा काय? एवढंच आपल्याला पाह्यच असत. आणि म्हणून मी नम्रपणे सागतो की 'तर्क' ही अजब चीज तुमच्या मना-वर बिंबवली गेली असेल तर ती तुम्ही विसरली पाह्यजे आता गमत बघा. सरकारच्या म्हणण्याप्रमाणे त्या दोघींचा खून झाला तो १३ सप्टेंबर १९३५ ला मध्यरात्री. साक्ष द्यायला सगळ्या किंवा सगळे पुढे सरसावले ते मार्च १९३६ मधे. आपला असा अनुभव आहे आणि तो खरा आहे की, लहान सहान गोष्टींचं विस्मरण आपल्याला लगेच होत. एकतर आपल आपल्याला स्मरत नाही. तशात कोण मला काय सहज बोलला, मी त्याला किती वाजता, कुठे, केव्हा, कुठल्या दिवशी भेटलो हे तुम्हाला देखील आत्ता एकदम, अचानक विचारल्यावर सागता येणार नाही. या खटल्यातल्या साक्षी बघा. एकतर सगळ्या व्यक्ती सामान्य आहेत–त्यातल्या बहुसख्य बायका आहेत. असामान्य बुद्धिमत्तेचा साक्षीदार एकही नाही आणि अस असून आरोपी त्याना कुठल्या दिवशी, किती वाजता, कुठे, कुठल्या वेळी भेटला, काय बोलला, हे सहा महिन्यानी न आठवता, इतक्या अचूक सागतात की त्यातून निष्कर्ष हेच निघतील की ती अती मानवी स्मरणशक्ती माणसं आहेत किंवा डॉक्टर रक्स्टननी खून केलाय हे त्याना समजलं होत आणि याचाच अर्थ असा की, ती तशी नसतील तर 'तसच सागा' हे त्याना समजावल गेलं असल पाह्यजे. सरकार पक्षाला ते अशक्य नाही. म्हणूनच त्या साक्षी सशयास्पद आहेत.

...दुसरा महत्वाचा मुद्दा की जो खर म्हणजे माझ्या पहिल्या मुद्याच अधिक विवरण करील तो हा की ती दोन प्रेत सापडली तीच मुळी २९ सप्टेंबर १९३५ ला! आणि सौ. स्मिथ, सौ. ऑक्सले, सौ. हॅम्पशायर, सौ. एलिझाबेथ या स्त्री नोकर अवघ्या २-३ दिव-साच्या रजेनतर कामावर रुजू झाल्या. असं पुरावा दाखवतो–आणि त्याची स्टेटमेंटस् सार्जंट स्लोननी रेकॉर्ड केली ती १ ऑक्टोबर १९३५ नतर. या मधल्या १५-१६ दिवसात त्याच घरात त्या वावरत होत्या. पण एकीलाही 'रक्तानी थबथबलेली कार्पेटस! सूट, शर्ट, बाथरूममधे रक्ताचे डाग, जिन्यावरचा पेंढा ह्या महत्वाच्या गोष्टी दिसल्याच नाहीत. पण कोर्टात मात्र फाटाफट त्या सागतात १४-१५-१६ सप्टेंबरला आम्ही ते पाह्यल. त्यानी कुजबुज केली नाही सतत १६-१६ दिवस ते पाहून! त्याना कसली शका आली नाही. मानवी स्वभाव असा असतो. ह्या विसगतीची सुसंगती सरकार स्पष्ट करू शकल नाही. म्हणूनच त्या साक्षी टाकाऊ आहेत.

...पुढे बघा. तर्क काय? तर ती दोन प्रेतं जेव्हा आणि जिथे सापडली तिथे पेंढा पडला होता. म्हणजे एवढ्या मोठ्या लँकेस्टर शहरात पेंढा ही मौल्यवान चीज फक्त दोनच ठिकाणी होती. बाकी कुठे नव्हताच. मग म्हशीच्या तबेल्यात–शहरात येणाऱ्या पार्सलात काय सोन, चादी भरली होती? तिथे 'डेली हॅरॉल्ड आणि सडे ग्राफीक' ह्या दोन दैनिकांचे कागदात मास सापडल. आणि डॉक्टर ही दोन दैनिक नियमित घेतात. म्हणून डॉक्टरानी खून केला असावा. काय तर्क! अहो लँकेस्टर शहरात ही दोन दैनिकं नियमित वाचणारी माणस हजारोनी आहेत आणि रद्दीची खरेदी-विक्री काय १३ सप्टेंबर १९३५ ते १ ऑक्टोबर १९३५ या १२–१३ दिवस बद होती? तिथे एका मुलाचा स्वेटर सापडला तो म्हणे मृत मेरी रॉजर्सनच्या आईने पोलीस स्टेशनला ओळखला. तिच वाक्य काय आहे काय म्हण-तात सार्जंट स्लोन? तर ती अस म्हणाली, 'असाच स्वेटर डॉक्ट-रांच्या मुलाला घालून मेरी त्याला घेऊन आमच्याकडे आणीत असे!' असाच– शब्द बघा असाच! असाच म्हणजे 'हाच' नव्हे! 'तसे' स्वेटर बाजारात पुष्कळ मिळतात.

आता मेडिकल एव्हीडन्सकडे वळतो. ती दोन प्रेतं सापडली त्या-बरोबरच स्त्रियाच्या स्तनाच्या बोंड्या सापडल्या! त्या बोंड्या सौ. रक्स्टन आणि स्वर्गीय मेरी रॉजर्सन याच्या स्तनांच्याच असाव्यात हे धरून चालायच! काय तर्क! वाऽरे डॉक्टर मिलर. डोक्यावर केस नाहीत, चामडी नाही. शरिराचे तुकडे जोडायचे. त्यांची लाबी मोजा-यची आणि मग सांगायचं की सौ. रक्स्टन अदाजे बरोबर इतक्याच उच होत्या! अदाजे आणि बरोबर? काय हे? आणि वादापुरत धरून चालू की ती दोन प्रेतं त्याच दोघांची होती तरी देखील सर-कारची केस सिद्ध होत नाही. कारण दोन आहेत पहिल हे की ज्या सेकदांना अनेकदा, अनेक लोकाना आरोपी डॉ. रक्स्टन असं वाक्य बोलला की 'मिसेस रक्स्टन आणि मेरी कुठे तरी गेल्येत!' त्या क्षणाला ही केस सपली. बाहेर गेल्यानतर त्याना कुणी मारल्या याला घरी असलेला, अनेकजण पहात असलेला डॉक्टर रक्स्टन जबाबदार' कसा?' मी असं म्हणतो याला देखील कारणं आहेत. कशी होती तथाकथित सौ. रक्स्टन? तिच्या बहिणीच्याच शब्दात ऐका. डॉ. रक्स्टन अधिक रुबाबदार, हुशार, श्रीमत आणि धद्यात यशस्वी होता म्हणून पहिल्या नवऱ्याला सोडून ती आरोपीबरोबर तशीच राह्यली. सॉलीसीटर रॉबर्ट हा पण तसाच रुबाबदार, श्रीमत, धद्यात यशस्वी, हुशार आहे. म्हणून पतीच्या इच्छेविरुद्ध– लक्षात घ्या युवर ऑनर! आणि ज्युरीतल्या सभ्य गृहस्थानो! –पतीच्या इच्छेविरुद्ध– त्याच्याकडे जात-येत राह्यली, त्याच्याशी गप्पा मारत राह्यली– एवढच नव्हे तर त्याच्या बरोबर ट्रीपला गेली आणि ती पण एकटी! माझे वकील मित्र माझ्याशी इंडियन कल्चरवर बोलले. अधिकार नस-

ताना ! मी इंडियात जाऊन आलोय. ' असे पती देवची ललनाना !' आणि ' कशी त्या त्यजू पदाला !' हे तिथलं कल्चर आहे. ३–४ तासाच्या प्रवासाला जर पती-किंवा-पत्नी निघाली तर V. T. स्टेशन-वर एकमेकाना मिठ्या मारून एकमेकांची प्रदीर्घ चुंबन घेण्याची त्याची पद्धत नाही. अशा वातावरणात लहानपणापासून आरोपी वाढला ! ते वाईट आहे काय ? दुसरं अस की सौ. रक्शटन आणि सॉलिसिटर रॉबर्ट नुसते मनमोकळेपणानी बोलायचे, त्याचं तसं काही नव्हतं हे सरकार पक्ष म्हणतो. तुम्हाला अशा किती केसेस दाखवू की पुढे सरळ-सरळ किंवा छुपा व्याभिचार करणारे विवाहित स्त्री किंवा पुरुष यानी त्या ' प्रकरणाला सुरूवात केली ती एकमेकांशी ' मन-मोकळे ' पणानी बोलूनच ! ' मनमोकळेपणानी !' काय शब्द आहे हो ! पतीशी ' मनमोकळेपणानी ' बोलता येत नाही ? किंवा त्याला एखादी गोष्ट किंवा त्या गोष्टीवरून निर्माण होणारी भाडणं ही पत्निला टाळता येत नाहीत काय ? का भारतात कुठल्याही स्त्रीला– म्हणजे विवाहित स्त्रीला– आपल्या पतीपेक्षा जास्त रुबाबदार श्रीमत हुशार आणि यशस्वी माणस भेटतच नाहीत ? सरकारी वकील म्हणतात की My Movements ही आरोपीनी लिहीलेली पुस्तिका म्हणजे चोपडं आहे. कशाला झाले ते सरकारी वकील, ते चुकून सर-कारी वकील झाले. खरं म्हणजे त्यानी तर्कशास्त्राचे प्राध्यापक व्हायचे. शोभले असते. My Movements या पुस्तिकेत भारतीय संसाराच खर चित्र उमटलय. ते वाचण्यासारखच आहे. तो काय म्हणतो ते पहा ' We are the kind of people who could neither live with each other, nor live without each other !' अशी केविलवाणी अवस्था असते भारतीय श्रीमंत पतीची. आणि त्याची राणी ? ती धंदे करायला मोकळी. सौ. रक्शटन तशीच होती आणि कु. मेरी देखील तशीच. लग्नापूर्वीच तिला दिवस होते– म्हणून तर ती मिसेस रक्शटन बरोबर गेली. श्रीमंतांच्या लेकी, सुना आणि बायका यांना त्यांच्या व्यभिचारी रहाणीमुळे कुणीतरी कुठेतरी मारून टाकल्याची उदाहरणं अनेक आहेत. अशा सगळ्याच केसेस कोर्टापुढे येत नाहीत. कारण अनेक श्रीमत सत्तेवर असतात. म्हणून काय सत्य लपून राहातं ? आणि एखादं प्रकरण कोर्टापुढे आलंच तर जबाबदार कोण ? तर पती ! सरकारला खोटा पुरावा जमा करता येतो. सत्तेपुढे शहाणपण चालत नसत पण न्याय देवतेचा अंकुश सत्तेवर असलाच पाहिजे. नाहीतर एक दिवस असा येईल की सत्तापिपासु राज्यकर्ते आपण सागू तसा निकाल न्यायमूर्तींना द्यायला भाग पाडतील !

—आता शेवटचा मुद्दा मांडतो. ' सौ. रक्स्टनचा खून होताना, कुमारी मेरिनी पाह्यल म्हणून तिला पण डॉक्टरनी मारली.' असं सरकारी वकील म्हणतात. याला पुरावा शून्य ! आधार ? तर्क ! मरण इतकं सोप असत काय ? खाटिकखान्यातला मागचा बोकड-सुद्धा पुढचा बोकड कापताना दिसला की मागे मागे सरकतो ! कु. मेरी सौ. रक्स्टनचा गळा दाबून किंवा कसाही खून होताना किंचा-ळत नाही ! ओरडत नाही ! पळून जायचा प्रयत्न करत नाही. शांतपणे खोलीत जाते जसं काही तिला मरायचंच होतं ! डॉ. रक्स्टनला १४ सप्टेंबर ला मध्यरात्री कपडे जाळताना आम्ही पाह्यलं अशी साक्ष द्यायला दोन बहिणी कोर्टात हजर. डॉक्टरांच्या घराच्या बाजूला फक्त एकच घर आहे ? अनेक आहेत पण १३ सप्टेंबरला मध्यरात्री डॉक्टरांच्या घरात तुम्ही दिवा पाह्यला का ? कुणाच्या किंचाळण्याचा आवाज ऐकला ? कमीत कमी कुणीतरी कशाचे तरी तुकडे करीत असल्यासारख्या कापा-कापीचा आवाज ? याची चौकशी किंवा तपास सार्जंट स्लोननी केला ? नाही ! कारण तर्क ! आणि तो देखील काय तर हे खून ह्यांनीच केले असले पाह्यजे. ती दोन दुर्दैवी प्रेतं २९ सप्टेंबर १९३५ ला ! युवर ऑनर लक्षात घ्या २९ सप्टेंबर १९३५ ला ! एडिनबर्ग रोडच्या पुलाखाली नदीच्या वहात्या पाण्यात दगडाला अडकलेली सापडली. म्हणजे कमीत कमी १४–१५ दिवस ती वहात वहात येत होती ! म्हणजेच ती कुणीतरी कुठेतरी टाकली असली पाहिजेत. मधल्या काळात डॉक्टर कुठे कुठे गेले ? ते My Movements या त्यांच्या पुस्तिकेत आहे आणि त्याला खुद्द सार्जंट स्लोनचा पाठिंबा आहे ! मधल्या काळात ती प्रेतं कुणालाच दिसली नाहीत ? आणि म्हणून म्हणतो युवर ऑनर की तर्कावर आधारलेला काल्पनिक पुरावा फेकून देऊन न्यायाच्या हितासाठी काहीही पुरावा नसलेल्या या खुनांच्या आरोपा-तून एका नामवंत, बुद्धीमान, कर्तृत्वसंपन्न आणि निष्पाप डॉक्टरची निर्दोष मुक्तता व्हावी.

...बचावाचे वकील खाली बसले तेव्हा खटला ऐकायला आलेल्या लोकांच मत बदललं, तिरस्काराची जागा आरोपीबद्दलच्या सहानु-भूतीनी घेतली. खुद्द सरकारी वकील त्यांच्या मदतनिसांना म्हणाले, ' पाह्यलंत ? सरकारी नोकरी करायची नसली तर बचावाचं भाषण कस करायचं ते त्याच्यापासून शिका !'

...न्यायमूर्ती सिंगलटन मात्र शांत होते. त्यांनी खटल्याचा आढावा घ्यायला (समिंग अप) सुरुवात केली. ज्यूरीना उद्देशून ते म्हणाले,

' ज्युरीमधल्या सभ्य गृहस्थानो ! सुरुवातीलाच आपणाला सांगून टाकतो, की दोन्ही वकील उत्तम बोललेले आहेत ! त्या बोलण्याचा परिणाम सामान्य माणसांवर चटकन होणारच. यालाच म्हणतात वक्तृत्व. पण पुरावा म्हणजे मात्र वक्तृत्व नव्हे. साक्षीदार तुम्ही प्रत्यक्ष पाह्यलेत. ते काय बोलले ? काय घटना घडल्या असतील ? बचावाचे वकील अॅडव्होकेट बर्केट बोलले त्यात खूप तथ्य आहे. तर्क म्हणजे पुरावा नव्हे. पण सरकारी वकील बोलले त्यातही तथ्य आहे. तुम्हाला याचा विचार करायचाय की जर वस्तुस्थितीजन्य पुरावा (Circumstantial evidence) हा इतका सबळ आहे की त्यावरून तर्क करता येईल आणि तो अचूक असेल तर त्याचाही विचार तुम्ही केला पाहिजे. माझ्या म्हणण्याचा हेतू असा की वकिलांची शब्दबबाळ भाषण विसरा पण त्यांनी मांडलेले मुद्दे मात्र लक्षात घ्या. डॉक्टर – म्हणजे साक्षीदार डॉक्टर आणि फिंगरप्रिंट एक्सपर्ट हे त्या त्या विषयातले तज्ञ आहेत हेही विसरू नका. बचावाच्या वकीलांनी उलट तपासणीत काय प्रश्न विचारले. ते त्याच्या बचावाशी सुसंगत होते की विसंगत ? आरोपीला बचावाचे साक्षीदार आणण्याची संधी मी दिली होती का नव्हती ? या गोष्टीचा विचार काळजीपूर्वक करून तुम्ही तुमचं मत मला सांगायचय की ' आरोपी दोषी आहे की निर्दोषी ?' बाकी खून म्हणजे काय ? वकील एखाद्या प्रश्नाला का हरकत घेतात ? पुरावा कायदेशीररीत्या काय दाखवतो. त्याची कारणं काय ? हे कायद्याचे किचकट प्रश्न मी बघेन आणि माझा



**पुढे काय होणार हे त्याला ठाऊक नव्हतं, तुम्हालाही कळणार नाही आणि खरं म्हणजे मलाही कळणार नाही.**

निकाल मी देईनच. तुमचा आणि माझा निर्णय एक आला तर ठीक ! पण समजा नाही आला तरी तुमचा निकाल माझ्यावर बंधनकारक नाही. कारण तुम्ही कायदा न जाणणारी माणसं आहात. ह्याचा अर्थ तुम्ही तुच्छ आहात असं नव्हे कारण कायदा असंच म्हणतो की, पुरावा नेहमी असा असावा की, तो ऐकल्यानंतर सर्व सामान्य सभ्य माणसाचं मन एखादी गोष्ट घडली असेल किंवा नसेल असं बहुमताने वाटेल ! तुमच्या करता खास खोली आहे. तिकडे तुम्ही जाऊन आपसात विचार विनिमय करू शकता. तुमच्यापैकी कुणावरही कसलंही बंधन नाही. फक्त प्रत्येक मत महत्वाचं आहे. कारण ते मला मार्गदर्शक ठरणारं आहे, मदत करणारं आहे. मधल्या काळात मी माझ्या चेंबरमधे बसून माझा निकाल काय आहे, याबद्दल विचार करतो.

.. एवढं बोलून न्यायमूर्ती सिंगलटन न्यायासनावरून उठले. कोर्टात कुजबुज वाढली. सरकारी आणि बचावाचे वकील यांनी एकमेकांचे दिलखुलास आणि मन:पूर्वक अभिनंदन केले. दोघांनी आपापलं काम चोख केलं होतं ! पोलिसांची धांदल उडाली. कडक बंदोबस्तात ज्युरी त्यांच्या चेंबरमधे जाऊन लंब वर्तुळ शिसवी लाकडाच्या टेबलाभोवती मांडलेल्या ९ सुशोभित आलिशान खुर्च्यांवर विराजमान झाले. काचा लावलेले दरवाजे पोलिसांनी धडाधड बंद केलं आणि आरोपी डॉ. रक्स्टन ? डाव्या हाताचा अंगठा हनुवटीखाली टेकवून आणि डावा पंजा डाव्या गालावर ठेवून अनंतात बघत विचार करत बसला होता की, 'काय होणार ? काय होणार ?'

...ज्युरीतली सभ्य माणसं आपसात काय चर्चा करीत होती ते ऐकायला येत नव्हतं. पण काचेतून दिसत होतं. न्यूज रिळं बघताना पडद्यावरचा मनुष्य काय बोलतोय ते समजू नये, फक्त हातवारे आणि चेहऱ्यावरचे भाव तेवढे दिसावेत तसं ते दृश्य लोक उत्सुकतेनं पहात होते.

असे दोन तास गेले.

...त्यानंतर प्रमुख ज्युरींनी आतून काचेचा दरवाजा ठोठावला. बंदोबस्ताच्या शिपायाने तो अदबीने उघडला आणि सलाम ठोकून त्याने विचारलं,

'काय साहेब ?'

'सन्माननीय न्यायमूर्तींना सांगा की, आमचा निर्णय ठरला !'

...ज्युरींचा तो निरोप टाकोटाक न्यायमूर्तींना कळवला गेला. ९ ज्युरी इतमामात कोर्टात त्यांना दिलेल्या खास खुर्च्यांत येऊन बसले. न्यायासनावरून न्यायमूर्तींनी त्यांना पुन्हा एकदा विचारले,

'तुमचा निकाल ठरला?'
'यस्, युवर ऑनर!'
'कसा आहे? एक मताने की बहुमताने?'
'एक मताने!'
'काय आहे?'
'आरोपी दोषी आहे?'

कोर्टात खळबळ माजली! वृत्तपत्राचे वार्ताहर सरसावून बसले, आता न्यायमूर्ती काय म्हणतात ते पहायच!

...आणि न्यायमूर्ती सिंगलटन यांनी ओपन कोर्टात निकालपत्र सांगायला सुरुवात केली! सरकारची केस काय आहे? साक्षीदार मला कसे दिसले? त्यानी काय सागितल? त्यात सुसगती कशी आणि कुठे आहे? दोन्ही वकिलानी काय काय हरकती घेतल्या? त्या ग्राह्य किंवा अग्राह्य का मानल्या? बचाव कसा होता? उलट तपासणीत बचाव सुचवला गेला होता का? दोन्ही वकिलानी आपापल्या भाषणात कोणकोणते मुद्दे उपस्थित केले? त्यावर कायदा काय म्हणतो? याची चिकित्सा करता करता हा हा म्हणता न्यायमूर्ती ज्यूरीच्या मताशी सहमत झाले. न्यायमूर्ती सिंगलटन आपल्या निकालपत्रात म्हणतात,

'या खटल्यात सरकारी पक्षाने तर त्यांची केस साक्षीदारामार्फत सिद्ध केलीच पण त्याहीपेक्षा जास्त चागली सिद्ध केली ती बचावपक्षाने–खुद्द आरोपीनेच! आरोपीला बचाव पक्षातर्फे साक्षीदार आणण्याची मी पूर्ण संधी दिली होती. पण तो एकही साक्षीदार आणू शकला नाही. दुसरा कुठलाही डॉक्टर बचावातर्फे साक्षीदार म्हणून आणून 'ती प्रेतं' स्त्रियाची नव्हती हे तो सिद्ध करू शकला नाही. प्रश्न असे उपस्थित होतात की, सौ. रक्स्टन आणि कुमारी मेरी गेल्या तरी कुठे? आरोपीने त्यांचा ठावठिकाणा शोधून काढण्याचे काय प्रयत्न केले? आरोपी याचे स्पष्टीकरण देऊ शकला नाही. बचावाचे भाषण उत्तम झाले. पण सरकारच्या साक्षीदाराना त्या भाषणातल्या बचावाच्या मुद्द्याना अनुलक्षून एकही प्रश्न उलटतपासणीत विचारला गेला नव्हता किंवा सरकार पक्षाच्या साक्षीदारांना तस सुचवलदेखील गेल नाही! आरोपीच्या घरात रक्ताने माखलेली कार्पेटस्, रक्ताने भरलेला सूट, जिन्यातला पेंढा, रक्ताळलेला शर्ट आणि बाथरूममध्ये रक्ताचे डाग याला पुरावा आहे पण या गोष्टी तिथे का आल्या ह्याचे स्पष्टीकरण आरोपी देऊ शकला नाही–स्पष्टीकरण काय तर माझा हात कापला हे! की जे अगदीच हास्यास्पद आहे. नुसत बोट कापून कपडे रक्ताने ओले होत नसतात! My Movements या पुस्तिकेतल्या आरोपीच्या हालचाली विसगत आणि म्हणूनच संशयास्पद आहेत! सौ. अँडरसन, सौ. स्मिथ, सौ. हॅम्पशायर या स्त्री-नोकर! या आरोपीविरुद्ध उगाचच खोट बोलतील अस मला वाटत नाही. कारण त्या खोट बोलतात असं आरोपी स्वतः म्हणत नाही! मेरी रॉजर्सनचा ब्लाऊज पुलाखालच्या प्रेतांवरोबर मिळाला, की जो तिच्या आईने पोलिसासमोर तावडतोब ओळखला आणि का ओळखला याचे स्पष्टीकरण दिलं ही घटना फार बोलकी आहे. आरोपीने मिसेस नेल्सलना लिहिलेल पत्र, मिसेच ट्रेचच्या घरी मिसेस नेल्सनबरोबर झालेलं आरोपीच भांडण, त्यानी पोलिसाकडे केलेली तक्रार. मिसेस रक्स्टनबरोबर त्यांची झालेली भाडणं आणि कॉन्स्टेबलसमोर त्यानी बायकोला दिलेली धमकी, दोन्ही प्रेताची काटछाट ज्या पद्धतीने करण्यात आली त्यावरून हे करणारा इसम सर्जनच असला पाहिजे, हे अॅनॅटोमीच्या प्राध्यापकाच मत आणि सौ. नेल्सन–मृत सौ. रक्स्टनची मोठी बहीण–हिच्या डोळ्यात उभे राहिलेले अश्रू या गोष्टी मी कशा विसरू? तर्कशास्त्र म्हणजे कायदा किंवा पुरावा नव्हे हे एकदम मान्य. पण परिस्थितीजन्य पुरावा जर का इतका सबळ असेल, त्यात जर का सुसंगती असेल तर त्यावरून अमुक एक गोष्ट घडलीच असेल हा तर्क कायदेशीर ठरतो!

...एकूण पुराव्याचा साकल्यानी काळजीपूर्वक विचार करता माझं असच मत आहे की आरोपी डॉ. रक्स्टन सशयातीत रित्या दोषी आहे. या खटल्यात सॉर्जंट स्लॉन यानी ज्या तडफेनी आणि तत्परतेनी तपास करून प्रवड पुरावा गोळा केला त्याबद्दल पोलीस खात्याला मी धन्यवाद देतो! ऑर्डर!

'सौ. रक्स्टन आणि कुमारी मेरी रॉजर्सन याचा १३ सप्टेंबर १९३५ ला मध्यरात्री निर्घृण खून केल्याबद्दल आरोपी डॉक्टर ब्युक रक्स्टन याला मी मरेपर्यंत फाशी शिक्षा फर्मावितो!'

...शिक्षा ऐकून आरोपी डॉ. रक्स्टनने आरोपीच्या पिंजऱ्यावर दोन्ही हाताचे पजे रोवून निराशेने मान हलवली त्याच्या डोळ्यात पाणी होत. हातपाय थरथरत होते!

...डॉ. रक्स्टनचे फाशीच्या शिक्षेविरूद्ध केलेले अपील वरच्या कोर्टानी फेटाळले कारण त्यात काही तथ्यच नव्हतं.

...१२ मे १९३६ ला सकाळी डॉक्टर रक्स्टन फाशीच्या तख्तावर उभा राहिला आणि अत्यंत विकल मनःस्थितीत फासावर लटकला!

...आणि तिकडे बचावाचे नामवत वकील अॅडव्होकेट बर्केट आपल्या ऑफिसमध्ये प्रामाणिकपणे दुःखाने विचार करीत बसले होते.

'अरे! अरे! काय झाल हे? प्रक्षुब्ध मनाच्या अवस्थेत माणसानी हत्या केली तर त्याला फाशी देऊ नये असा कायदा येतोय. पण तो पास होण्यापूर्वीच या खटल्याचा निकाल झाला! काय नशीब असतं एकेकाच. कोण कुठला भारतीय डॉक्टर! हुशार, कर्तृत्वसपन्न, उच्च शिक्षणासाठी इंग्लडला येतो काय आणि त्याच होत काय!'


बाहेर शाळेत जाणारी मुल म्हणत होती!

Red stains on the carpet, red stains on the knief.
For Dr. Buck Ruxton has murdered his wife.
The maid servent saw it and threatened to tell.
So Dr. Buck Ruxton he killed her as well!

त्या अनुभवी वकीलानी दुःखातिरेकाने त्याना पाहिले आणि त्याच्या मनात विचार आला 'मुलानो! तो तुमच्या वयाचा असताना पुढे काय होणार आहे हे त्याला ठाऊक नव्हतं, तुम्हालाही ते कळणार नाही आणि खरं म्हणजे मलाही कळणार नाही. कारण? "दैव जाणिले कुणी?"

## समाप्त

**[मायकेल हार्डवीक यांच्या 'डॉक्टर्स ऑन ट्रायल' या पुस्तकातील 'डॉक्टर रक्स्टन' या खटल्याचा स्वैर अनुवाद.]**



Prof. Bali

# NOW IT CAN BE TOLD

**पंचवीस वर्षांपूर्वी गाजलेल्या एका दुर्मिळ पुस्तकाचा अनुवाद**

**( हप्ता तिसरा )**

## ६ : पार्श्वभूमीचे सिंहावलोकन

१९४६ च्या निवडणुकी काँग्रेस व मुस्लिमलीग यांनी कशा जिकल्या या प्रश्नांच्या खोल पाण्यात शिरण्याचे हे स्थळ नव्हे. त्या कामी काँग्रेसने आय. एन. ए. च्या चळवळीचा किती कौशल्याने उपयोग करुन घेतला व मुस्लिमलीगने मुसलमानांच्या तोवर पूर्णपणे चेतलेल्या धर्म भावनांचा कसा व किती लाभ घेतला हे सर्वांस ठाऊकच आहे. तथापी एक गोष्ट स्पष्ट होती– मुस्लिमलीगला हिंदुस्थानातील यच्चयावत् मुस्लिम समाजाचा पूर्ण पाठिंबा होता. राष्ट्रीय मुसलमानांचा पूर्ण बोजवारा उडाला होता. काँग्रेसला साऱ्या हिंदुसमाजाचा पाठिंबा असून हिंदुमहासभा व इतर पक्ष राजकीय क्षेत्रात कोठेच दिसत नव्हते. निवडणुकीच्या या परिणामाचा ब्रिटिश सरकारने सहाजीकपणे असा अर्थ केला की भारताच्या भवितव्यासंबंधी करावयाच्या राजकीय वाटाघाटीमध्ये काँग्रेस आणि लीग हे अनुक्रमे हिंदु व मुसलमानांचे अधिकृत प्रतिनिधी समजले पाहिजेत. आणि ते योग्यच होते. या समाजांच्या वतीने बोलण्याचा अधिकार इतर कोणी व्यक्ती अथवा पक्ष दाखवीत असला तरी निवडणुकीने त्यास वस्तुस्थितीचा आधार दिलेला नव्हता. पंजाबात मात्र अकाली दलाने शिखांच्या बहुसंख्य जागा हस्तगत करण्यात निर्विवाद यश मिळविले होते. त्यामुळे वाटाघाटींची वेळ आली तेव्हा सरकारकडून काँग्रेस,



**पण भूक वाढतच होती**

मुस्लिमलीग व शिखांचे एकमेव पुढारी मास्टर तारासिंग यांनाच बोलावण्यात येऊन हिंदुमहासभेला पूर्णपणे वगळण्यात आले.

भारताच्या रंगभूमीवर ब्रिटिश पंचांसमोर आता मल्लयुद्धाचा आखाडा उघडला. तिन्ही पक्षांनी निवडणुकीच्या वेळी आपआपल्या मतदारांना स्पष्ट अभिवचने दिली होती. पहिला पक्ष अखंड हिंदुस्थानास, दुसऱ्या देशाची फाळणी करून स्वतंत्र पाकिस्तान निर्माण करण्यास तर तिसरा पक्ष पूर्वेस यमुनेपासून पश्चिमेस चिनावपर्यंत, शिखांसाठी खलिस्थान बनविण्यास बांधला गेला होता. अर्थातच या साऱ्या मागण्या परस्परविरोधी होत्या. परस्परांशी उघड उघड विरोधी असलेल्या ह्या तिन्ही विचारसरणींचा इंग्रज सरकार कशा प्रकारे समन्वय करते व आपले पुढारी दिलेला शब्द कशा प्रकारे पाळतात हे जाणण्यास या तिन्ही पक्षाचे मतदार फार उत्सुक झाले होते. या मतदारांना, प्रत्येक घटना स्वतःस लाभकारक करून घेण्याची या राजकारण्यांची पात्रता मात्र मुळीच ठाऊक नव्हती.

३० मार्च १९४७ ला अशी एक वार्ता प्रसिद्ध झाली, की पं. नेहरूंनी आपल्या नेतृत्वाखाली भारताचे स्वतंत्र शासन ब्रिटिश सरकारने अस्तित्वात आणले तर आपण भारतास ब्रिटिश साम्राज्यातच ठेऊ अशा प्रकारची महत्त्वपूर्ण योजना इंग्रजांपुढे मांडली असून तिच्यामुळे संयुक्त भारताच्या सत्तांतराचा प्रश्न सोपा होण्याची अपेक्षा आहे. पण ही सूचना दोन वर्षे उशीरा केली गेल्यामुळे निष्फळ ठरली. या उलट जिनांनी अॅटलींना काय काय देऊ केले होते कोणास ठाऊक पण लौकरच ही गोष्ट स्पष्ट झाली, की जरी इंग्रज सरकार भारत सोडणार असले तरी जिनांशी तडजोड केल्यावाचून अथवा देशाचा काही भाग त्यास देण्याचे मान्य केल्यावाचून हिंदूची प्रतिनिधी असलेल्या काँग्रेसच्या हाती आपली राज्यसूत्रे देण्यास ते तयार नव्हते. महात्मा गांधी आणि राजगोपालाचारी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस मुसलमानांना सवलती मागून सवलती देत होती. तरीही ती त्यांना संतुष्ट करण्यास असमर्थ ठरली. किंबहुना त्यामुळे मुसलमानांची भूक अधिकच तीव्र झाली. नंतर एक उत्तम संधी आली होती. थोड्या दिवसांनी कॅबिनेट मिशन इकडे आले व त्यांनी मध्यवर्ती सरकारकडे फक्त संरक्षण व दळणवळण ठेऊन प्रांतांचे समूह करण्याची योजना मांडली. फाळणीनंतर घडलेल्या घटनांच्या पार्श्वभूमीवरून या योजनेकडे पाहिले म्हणजे काँग्रेसवाल्यांनी घाईघाईने मान्य केलेल्या २ जूनच्या योजनेपेक्षा ही योजना कितीतरी चांगली होती. ही योजना काँग्रेस व लीगने मान्यही केली होती. आणि पक्षपात न करता खरे बोलावयाचे झाल्यास म. गांधी व इतर काँग्रेस पुढारी यांनीच या योजनेस असलेली आपली मान्यता मागाहून कशीबशी काढून घेतली.

काही काळ तावातावाने असहकार करून बसलेल्या मुस्लिम लीगने आता हिंदुस्थान सरकार बनविण्यात भाग घेतला. जिनांनी अत्यंत धूर्तपणे सरकारला अधिकात अधिक उपसर्ग पोहोचवू शकतील अशी माणसे आपल्या पक्षातून मंत्रिपदासाठी निवडली. दर्जाने नव्हे तर जातीने राजा असलेले पंजाबचे गझनफर अली हे एक बोलघेवडे वक्ते होते. पंजाब विधीमंडळात असताना त्यांना गप्प बसवतच नसे. त्यांना पहिला मान मिळाला. दुसरे अबदुर रब निश्तार हे नावाप्रमाणेच काँग्रेस मंत्र्यांना भाल्यासारखे बोचत असत. तिसरे चंद्रिगर. त्यांनी पंजाबात गझनफर अलीची नव्हती इतकी दुष्किर्ती मुंबईला मिळविली होती व लियाकत अलीखान ते चौथे व त्यांची बेगम यांचे पं. नेहरूंशी सख्य असल्यामुळे त्यांना निवडले होते. अत्यंत मधूरवाणी व अत्यंत तीक्ष्ण नखे अशी या गृहस्थास परमेश्वराची देणगी मिळाली होती. काँग्रेसने आपल्या मंत्र्यांमध्ये मौलाना आझाद यांचा समावेश केल्यामुळे त्यास तोड म्हणून जिनांनी पूर्व बंगालमधून मंडल यांना आपल्या पक्षात घेतले. अशा रीतीने सरकारच्या मंत्रीमंडळात राजकीय रस्सीखेचीसाठी दोन तुल्यबलपक्ष सिद्ध झाले होते. ख्रिश्चन व पारशी सभासद तटस्थ राहातील अशी अपेक्षा होती. खरे पाहिले तर काँग्रेसच्या हिंदुमंत्र्यांना लिगी टोळके पुरून उरण्यासारखे होते. जिनांनी लॉर्ड वेव्हेल यांना एकांतात काही सांगितलेले असो, लीगने मंत्रीमंडळात प्रवेश केला होता तो मंत्रिमंडळ यशस्वी करण्यासाठी नसून ते मोडून टाकण्यासाठी केला होता व ही गोष्ट त्यांच्या नेत्यांनी लपवूनही ठेवली नव्हती. आणि खरोखरी त्यांनी आत राहून मंत्रिमंडळ मोडूनही दाखविले. कारण विवाद्य विषय कितीही क्षुल्लक असो काँग्रेस मंत्र्याने सुचविलेल्या कोणत्याही सूचनेस यांचा विरोध ठरलेला. काँग्रेस मंत्र्यांना आपल्या नव्या गादीवर आपणास सुखेनैव कारभार करता येईल अशी अपेक्षा होती. पण लिगी मंत्र्यांनी त्यांना भलताच उपद्रव देऊन मुळीच स्वास्थ्य मिळू दिले नाही.

काँग्रेसने निदान तत्त्वदृष्ट्यातरी अनत्याचारी मार्गाने स्वराज्य मिळवणे हे आपले ध्येय ठरविले होते. महासभेचे पुढारी व काँग्रेसचे इतर प्रतिस्पर्धी यांना काँग्रेसची अहिंसा काय किमतीची व कोणत्या जातीची होती याचा प्रत्यय गेल्या २५ वर्षातील त्यांच्या घोषणातून, भाषणातून व प्रतिपक्षास उखडून काढण्यासाठी त्यांनी भरविलेल्या सभातून आलाच होता. पण मुस्लिम लीगने ज्या दिवशी पाकिस्तानचे साध्य हे आपले ध्येय ठरविले त्या दिवसापासून आपल्या साध्य पूर्ती-

साठी कोणत्याही एका अथवा अनेक मार्गांचा अवलंब करण्यास मागेपुढे पाहिले नाही. साऱ्या देशभर जातीय दंगली व हत्याकांड याच्या रूपाने लीगवाले जे काही करीत होते तेच विध्वंसाचे कार्य निराळ्या रीतीने त्यानी आता मंत्रिमंडळाच्या बैठकीतून व आपआपल्या सत्तेखालच्या खात्यातून आचरणात आणले व्यापार उद्योग, राज्यव्यवस्थेचे नियम, यात उलथा पालथ होईल असे निवाडे व आज्ञा देऊन त्यानी साऱ्या राज्ययंत्रात एकच गोंधळ उडवून दिला. आपल्या कॉंग्रेस सहकाऱ्याच्या तोंडापुढे वळलेल्या मुठी फिरवणे आणि पंजाबी पुश्तुमध्ये ग्राम्य शिवीगाळ करणे हे मंत्रिमंडळाच्या बैठकीतील नेहमीचे दृश्य होऊन बसले. पं. जवाहरलाल नेहरू, आणि कॉंग्रेसचे पोलादी पुरुष सरदार पटेल यांना लौकरच या साऱ्या नाटकाची किळस आली. त्याना आपल्या योजनाचा व सूचनाचा असा उपमर्द सहन करण्याची कधीच सवय नव्हती. आणि मला वाटते याच काळात– भारताच्या इतिहासातील याच आणीबाणीच्या काळात त्याचे मानसिक परिवर्तन घडून आले असावे व कोणत्याही उपायाने ही नित्याची पिडा टाळावी असे विचार त्याच्या मनात घोळू लागले. जोपर्यंत आपण पाकिस्तानच्या मागणीस मान्यता देत नाही तोपर्यंत देशात शातता नादणार नाही अशी भीतीही, मुस्लिमलीगने देशाच्या निरनिराळ्या भागात राक्षसी कपटाने जातीय दंगली घडवून आणून त्यांच्या मनात उत्पन्न केली होती. हे सर्व पाहिले म्हणजे ज्यास आता पश्चिम पाकिस्तान असे नाव आहे त्या प्रदेशातील हिंदुशिखानी मार्च १९४७ पासून मुस्लिम लीगने त्याजवर केलेल्या अनन्वित व असह्य अत्याचाराचा ज्या धैर्याने व शौर्याने प्रतिकार केला त्याबद्दल आदर व कौतुक वाटल्यावाचून राहत नाही. मंत्रिमंडळातील केवळ शाब्दिक विरोधापुढे नांगी टाकणाऱ्या कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या धैर्याशी तुलना केली म्हणजे त्याचे धैर्य विशेषच खुलून दिसते. एकदरीत काहीही मोल पडो स्वराज्य हे मिळविलेच पाहिजे असे कॉंग्रेसच्या बड्या पुढाऱ्यांनी ठरविले व जी गंभीर वचने देऊन त्यानी निवडणुकी जिंकल्या होत्या त्याना हरताळ फासून ते मातृभूमीच्या चिरफाडीस तयार झाले. त्याच्या अगदी अंतर्मनात असेही असेल, की पाकिस्तान अगदी कसेही होवो, आपल्या सत्तेची खरी स्थाने मुंबई, गुजराथ, मद्रास, मध्यप्रांत, बिहार, संयुक्तप्रांत, ओरिसा, राजस्थान हे प्रांत काही पाकिस्तानात जात नाहीत. ते हिंदुस्थानातच काही झाले तरी राहाणार. राहाता राहिला पंजाब आणि बंगाल. हे दोन्ही प्रांत त्याना नेहमी अडचणीचेच झाले होते. विशेषत: पंजाबने युद्ध जिंकण्यासाठी ब्रिटिशाना सैनिकबळ पुरविल्यामुळे व बेचाळीसच्या 'छोडो हिंदुस्थान' चळवळीत सक्रिय भाग न घेतल्यामुळे त्यांच्यापैकी पुष्कळ जण पंजाबवर चिडलेच होते.

अशा रीतीने वर वर्णन केल्याप्रमाणे या प्रश्नाकडे पाहाण्याची कॉंग्रेस नेत्यांची मानसिक भूमिका आपण नीट ध्यानात घेतली म्हणजे त्यानी मातृभूमीचे तुकडे करण्यास मान्यता दिल्याबद्दल आपण त्याना दोषी ठरवू शकणार नाही. फाळणीच्या योजनेस मान्यता देऊन कॉंग्रेसने द्विराष्ट्रवादाच्या तत्वाचा स्वीकार केला व त्यासाठी जिनाशी वाटाघाटीही केल्या. हे करण्यात तिने तिच्या जन्मदिनापासून प्रतिपादन केलेल्या तत्वाचा त्याग केला हे खरे पण हे करतानाच पुन्हा असे करावयाचे नाही असा निश्चयही मनातल्या मनात तिने केला असावा. 'पाकिस्तानच्या निर्मितीपुरता आपण द्विराष्ट्रवादाचा स्वीकार करू या. एकदा उरलेल्या भारतावर आपला अधिकार झाला, की निधर्मी राज्याचा पुकारा करून एक राष्ट्रवादाच्या आपल्या आवडत्या तत्वास उचलून धरावयास आपण मोकळेच आहोत' असे त्यानी मनोमन मानले असेल. तथापि जनतेला गुप्त आणि कोणाच्या मनोमन असलेल्या गोष्टी कशा समजणार? ती काही झाले तरी प्रगट घोषणांवरच विश्वास ठेवते. पाकिस्तानचा पुकारा झाला तेव्हा हिंदु व शीख जनतेने त्या कल्पनेस अर्धवट का होईना, अनुकूलता दाखविली ती या श्रद्धेने की यामुळे तरी मुस्लिम राज्यास तोडीस तोड म्हणून एक बलशाली हिंदुशीख राज्य निर्माण होईल. पण प्रत्यक्षात जेव्हा निधर्मी राज्य अस्तित्वात आले तेव्हा त्याचा तोही भ्रमनिरास झाला.

यापुढे फाळणीचा प्रश्न, तिची व्यावहारिक दृष्ट्या शक्या शक्यता अथवा मागाहून होणारे आर्थिक परिणाम या दृष्टीकोनातून हाताळण्याचे कामच राहिले नव्हते. भावनातीतपणे विचार करण्याइतके आता कोणाचेच मन स्थिर नव्हते पाकिस्तान होणे इष्ट की अनिष्ट हा विचारही आता उरला नसून पाकिस्तानापासून बंगाल व पंजाबचा किती प्रदेश वाचविता येईल हाच हिंदुशिखाच्या चर्चेचा विषय होऊन राहिला होता. झाले, पडद्यामागून दोऱ्या ओढल्या जाऊ लागल्या. लोकानी निवडून दिलेल्या प्रतिनिधीकडूनच, जणू काय लोकाचीच मागणी आहे अशा स्वरूपात पंजाब आणि बंगालच्या फाळणीची मागणी करण्यात आली. सार्वमत वगैरे घेण्यात आले नाही आणि शेष भारतास वाचविण्यासाठी इतिहासात पुन्हा एकवार पंजाबी बैलास स्वत:च्या नाश पत्रावर स्वाक्षरी करण्यास बनविण्यात आले.

## हिंदुस्थान जगावा म्हणून पंजाबने मेलेच पाहिजे

पंजाबातील लढा तिरंगी होता. पंथाच्या पुढाऱ्यानी विचारविनिमय करून 'शीखलोक आपला धर्म, संस्कृती व सन्मान त्याच्या हाती कोठे तरी सत्ता असल्यावाचून राखू शकणार नाहीत असे आमचे निश्चित मत आहे' असा ठराव करून पतियाळा, नाभा, जिंद, फरीदकोट, कल्सिया, कपुर्थळा या संस्थानच्या शीख राज्यकर्त्यांना तो कळविला. सग्रुर येथे एकत्र झालेल्या पंजाबी संस्थानाच्या शिखाचे प्रतिनिधित्व शिरोमणी संस्थानी अकाल दलाचे अध्यक्ष सरदार प्रीतमसिंग यानी केले. मास्टर तारासिंग यानी ७ एप्रिल १९४७ ला केलेल्या वक्तव्यात हिंदुशीख प्रांताचा विस्तार चिनाबपासून यमुनेपर्यंत असला पाहिजे हे स्पष्ट केले. शीख आमदारानीही पंजाबच्या फाळणीची याचवेळी मागणी केली. २ मे १९४७ ला नव्या दिल्लीस चौधरी लहरीसिंग याच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या हिंदु व शीख आमदाराच्या परिषदेने पंजाबच्या फाळणी विषयी पुढील ठराव एकमताने पसार केला.

'मुस्लिम लीगच्या पाकिस्तानच्या अट्टाहासामुळे व त्यानंतर घडून आलेल्या पाशवी अत्याचारामुळे अल्प सख्याकाचा आपले जीवित व वित्त यांच्या सुरक्षिततेबद्दल बहुसख्याकावर विश्वास राहिला नाही म्हणून पंजाबची फाळणी होणेच अवश्य आहे. पंजाबातील राजकीय समस्या न्याय्य फाळणीनेच सुटू शकेल, अशी आमची खात्री आहे

१: ही फाळणी अल्पसख्य समाजाची लोकसख्या व त्या त्या प्रदेशातील त्यांचे हितसबंध लक्षात घेऊन करण्यात यावी.

२ : अंबाला, जलंदर आणि लाहोर विभागातील सर्व जिल्हे व ल्यालपूर किंवा मॉंट गोमरी या नवीन वसलेल्या जिल्ह्यांपैकी एका जिल्ह्याचा समावेश होईल एवढा चिनाब नदीच्या मर्यादेने बनलेला व ज्यात मुस्लिमेतर बहुसंख्य आहेत असा प्रदेश हिंदुशिखाना मिळाला पाहिजे.

३ : याच प्रदेशामध्ये बहुसख्य शीख वसलेले असून त्यांची एकात्मता व एक प्रादेशिकता राखली गेली पाहिजे.

'या शिवाय पाणी पुरवठ्याची न्याय्य वाटणी, सरकारी जमिनी व सर्व प्राताच्या सर्वसाधारण साधनांनी निर्माण झालेले प्रातिक वित्त यांनीही न्याय्य वाटणी झाली पाहिजे अशी ही सभा मागणी करते.' तसेच परिषदेने असेही घोषित, केले की वर दर्शविलेल्या मूलभूत तत्वाना धाब्यावर बसवील अशी कोणतीही प्रादेशिक राज्यकारभाराची तात्पुरती व्यवस्था होता कामा नये. कारण अशा व्यवस्थेने मुस्लिमेतरांच्या हितसबधास पुष्कळच बाध येईल.

या ठरावावर दिवाण चमनलाल यानी विस्तृत भाषण करून हिंदुशिखांची निरनिराळ्या जिल्ह्यातील सख्या, त्याचे विशिष्ट हितसबध व त्याची धर्मक्षेत्रे इत्यादी गोष्टी विशद करून सागितल्या.

आर्य समाजही चिंतातूर झाला होता. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात आर्य समाजाने पजाबात अत्यत कष्टाने एक भव्य व नवे युग निर्माण केले होते. फोर्ट सॅडिमन व पेशावरपासून पंजाबच्या कानाकोपऱ्यापर्यंत त्यानी आपली मदिरे उभारून शैक्षणिक, सामाजिक आणि जनसेवेच्या अनेक सस्था स्थापन केल्या होत्या. पुष्कळशी शेतीवाडी आणि देवळे, शाळा व कॉलेजे यांच्या मोठमोठ्या इमारती त्याच्या स्वामित्वाखाली होत्या. आर्य प्रादेशिक प्रतिनिधी सभा व आर्य प्रतिनिधी सभा या त्यांच्या दोन मध्यवर्ती सस्थाच्या कार्यालयाच्या इमारती व कचेऱ्या, अनेक आश्रम व धर्मादाय सस्था इत्यादीमुळे पश्चिम पजाबातच त्याचे कोटयावधी रुपयाचे वित्त गुंतलेले होते. आर्य समाज ही एक सलग्न अथवा स्वतत्र ज्ञाती नसल्यामुळे फार तर लाहोर सोडून पंजाबात स्वत.साठी स्वतत्र असा प्रदेश समाज मागू शकत नव्हता.

मुस्लिम लीग खैबर व डयुरांड लाईनपासून सतलजपर्यंतच्या साऱ्या प्रदेशावर आपला अधिकार सागत असल्यामुळे फाळणीचा प्रश्न अवघड होऊन बसला होता. १९४१ च्या शिरगणतीचे आकडे हे शेवटचे म्हणून ग्राह्य धरावयाचे असल्यामुळे जन सख्येचा आकडा हा त्याना अनुकूल असलेला सर्वात महत्वाचा मुद्दा होता. ४१ च्या शिरगणतीचे आकडे पूर्णपणे बनावट आहेत अशी हिंदु-शिखानी कितीही ओरड केली तरी सरकार तिकडे लक्ष देईना. १९०० ते १९४१ पर्यंत ब्रिटिश पंजाबच्या लोक सख्येच्या वाढीचे प्रमाण शेकडा अनुक्रमे १%, ५%, १३%, २०%, असे पडले. यावरूनच कोणाही सुबुद्ध व चाणाक्ष निरीक्षकास ४१ ची शिरगणती हे थोतांड असल्याची निश्चिती वाटली असती. ४१ च्या पूर्वीच्या दशकात पंजाब्यांची जनन क्रिया इतकी विस्तृत आणि अतिरेकी झाली होती काय, की १९०० ते १९११ च्या १% या प्रमाणावरून ती एकदम २०% च्या प्रमाणावर जावी? ४१ च्या शिरगणतीत आढळून आलेली पंजाबच्या लोकसख्येतील ५८ लाखाची आश्चर्यजनक वाढ ही अप्रामाणिक गणकाच्या हात चलाखीनेच अस्तित्वात आलेली होती.

त्याचप्रमाणे दुसरा मुस्लिम प्रदेश बंगाल व आसाम तेथेही त्याच शिरगणतीतील मुसलमान लोकसख्येची डोळ्यात भरण्यासारखी वाढ हे स्पष्ट दर्शविते, की हा सर्व प्रकार कोणातरी धूर्त विचारवंताच्या मेंदूने घडवून आणला होता. लोकसख्येच्या दृष्टीने पाहता केवळ मुस्लिम प्रदेशातच दाट लोकवस्ती आढळून यावी हे आश्चर्यकारक नव्हते काय ? ते काहीही असो, हा प्रश्न आता विवाद्य उरला नव्हता. या दोन्ही प्रदेशात राहाणाऱ्या लक्षावधी हिंदु मुसलमानाचे भवितव्य हीच १९४१ ची शिरगणची आता ठरविणार होती.

मे १९४७ च्या मध्यास व्हाईसरॉयनी केलेल्या सूचनेवरून जिनानी शीख व मुसलमानात तडजोड करण्याचा प्रयत्न केला. जिना पतियाळाच्या महाराजास जाऊन भेटले. दोघानी मिळून पजाब प्रांताची फाळणी न करता शीख-मुसलमानाच्या तडजोडीच्या शक्यतेची चर्चा केली. पंजाबच्या फाळणीने शिखाचेही दोन भाग पडतील असे लीगवाले बजावीत होते. या दोघाचे काय सभाषण झाले हे बाहेर आले नाही. पण असे म्हणतात की पतियाळा नरेशांनी पाकिस्तानच्या सैन्यांचा प्रमुख शीख असला पाहिजे व सर्व सरकारी नोकऱ्यातून शिखांचे प्रमाण त्यांना भरीव सवलती देऊन ठरविण्यात आले पाहिजे अशी मागणी केली. वाटाघाटी फिसकटल्याचे उघड कारण असे सागण्यात आले की नुकत्याच झालेल्या जातीय दगलीमुळे शीख जात अतिशय खवळली असून बहुसख्य समाजाच्या अधिपत्याखाली आपण सुरक्षित राहू शकणार नाही असे तिला वाटते.

४१ च्या शिरगणतीप्रमाणे लोकसख्येच्या प्रमाणात फाळणी व्हावयाची असून पंजाबच्या लोकसख्येत मुसलमानाचे प्रमाण शे. ५६ होते हे जरी मान्य केले तरी जिना अगदी धारवाडी काटयाने मोजून फार तर पंजाबचे शे. ५६ क्षेत्रफळ घेते. आणि तरीही असह्य अशी वागवणूक न होता हिंदुशिखाना आपली स्वत:ची अशी पुरेशी भूमी उरली असती. 'ट्रिब्युन' मध्ये एक लेखक लिहितो 'पजाबचे क्षेत्रफळ ९५०८९ चौरस मैल असून त्याची लोकसख्या २८४१८८१९ आहे. यापैकी मुसलमान १,६२,१७२४२ असल्यामुळे त्याना ५६५४६ चौरस मैलांपेक्षा अधिक क्षेत्रफळावर अधिकार सागता येणार नाही. पंजाबच्या पाच विभागापैकी जलदर आणि अबाला या विभागात हिंदुशिखांची बहुसख्या असून रावळपिंडी व मुलतान या विभागात मुसलमान बहुसंख्य आहेत. या मुस्लिम विभागाचे क्षेत्रफळ ५३११४ चौरस मैल असल्याने पाचव्या लाहोर विभागापैकी केवळ ३४०२ चौरस मैलांवर मुसलमानाचा अधिकार पोहोचू शकेल. उरलेला प्रदेश मुस्लिमेतरानाच मिळाला पाहिजे. त्यातील काही जिल्ह्यात हिंदुशिखाची बहुसख्या आहे म्हणूनच नव्हे तर तेथे त्याची पुण्यक्षेत्रे व धर्मक्षेत्रे असून तेथील शैक्षणिक, सामाजिक, सास्कृतिक, औद्योगिक, व्यापारी व कलाविषयक जीवन हिंदु व शिखाच्याच बुद्धिमत्तेने आणि परिश्रमाने उभारले गेले आहे आणि त्याच्याच अप्रतिहत योजकतेवर व कार्यक्षमतेवर आधारलेले आहे. त्यामुळे न्यायानेच हा प्रदेश हिंदुशिखाना मिळाला पाहिजे. सस्थानी मुलखासह साऱ्या पजाब प्रातावर दृष्टी टाकून वस्तुस्थितीचे थोडे सविस्तर निरीक्षण केल्यास असे दिसून येईल, की साऱ्या पजाब प्राताचे क्षेत्रफळ १,३७२३५ चौरस मैल आहे आणि एकूण लोकसख्या ३,४३०९८५१ आहे. त्यापैकी मुसलमान १,८२,८९७४४ आहेत.

लोकसंख्येच्या प्रमाणात मुसलमानांना ७३०३६ चौरस मैलांपेक्षा अधिक प्रदेशावर आपला अधिकार सांगता येणार नाही. पैकी ते बहुसंख्य असलेल्या रावळपिंडी व मुलतान या दोन विभागाचे क्षेत्रफळ ५३११४ चौरस मैल असून मुसलमान बहुसंख्य असलेल्या बहावलपूर संस्थानचे १४४९४ चौरस मैल त्यात मिळविले म्हणजे त्यास ७०६३८ चौरस मैल मिळतात. या हिशोबाने उरलेल्या प्रदेशातून लीगला केवळ २३९८ चौरस मैल प्रदेश मागता येईल. याचा सरळ अर्थ असा, की लाहोर विभागातील सहा जिल्ह्यांपैकी ज्याचे क्षेत्रफळ २३९८ मैलापेक्षा अधिक नाही असा फक्त एकच जिल्हा लीगला मिळू शकेल. वास्तविक आम्ही जिनासाहेबाच्या राजकीय तत्वज्ञानाचे व त्याच्या आकडेशास्त्राचे उत्साहाने स्वागत करावयास पाहिजे. मात्र अगदी काटेकोर प्रामाणिकपणे ही फाळणी झाली पाहिजे.'

केवळ लोकसंख्येच्या आकड्यांवरून शिखांचा प्रश्न सोडविणे योग्य नव्हते. त्यावेळचे भारतमंत्री लॉर्ड पेथिक लॉरेन्स यांनी मास्टर तारासिंग यांना लिहिलेल्या आपल्या पत्रात पंजाबात शिखांना विशिष्ट महत्त्व असल्याचे मान्य केले होते. ते लिहितात, 'घटना समितीत तुमच्या ज्ञातीच्या वाट्यास आलेल्या प्रतिनिधींच्या संख्येवर तुमच्या ज्ञातीचे महत्त्व अवलंबून नाही.' सतलजपासून खैबरपर्यंत आणि काराकोरमपासून सक्करपर्यंतच्या साऱ्या प्रदेशावर, एक अन्याय कारण पुढे करून इंग्रजांनी हा प्रदेश आपल्या साम्राज्यास जोडीपर्यंत शिखांचेच राज्य होते. स्वतः महाराजा दलीपसिंगाचे पालक असता केवळ शिखांच्या एका विभागाने त्यांच्या सत्तेविरुद्ध केलेली बंडाळी ब्रिटिश सैन्याच्या साह्याने मोडली म्हणून महाराजाचे सारे राज्यच हिरावून घेण्याचा इंग्रजांस कोणताही वैध अथवा नैतिक अधिकार नव्हता. ते कसेही असो, आता मात्र या देशात हिंदु आणि मुसलमान या दोघांनाही केवळ स्वतःचे म्हणता येतील असे प्रदेश मिळणार असता, पंजाबची फाळणी रावी नदीच्या सीमेने झाली तर केवळ स्वतःचा म्हणता येईल असा कोणताच प्रदेश शिखांना उरणार नव्हता. शीख समाजापुढे यावेळी प्रामुख्याने हाच प्रश्न होता. एकेकाळी याच प्रदेशावर त्यांचे राज्य होते व ह्याच प्रदेशात त्यांच्या पंथाचा उदय होऊन त्यांच्या हुतात्म्यांच्या रक्ताने तो पावन झालेला होता. १६ मे १९४७ च्या ब्रिटिश मंत्रिमंडळाच्या वक्तव्यातही खालसाची एकता टिकविण्याची आवश्यकता मान्य केली होती ती कशी टिकवावयाची हे मात्र त्यांनी सांगितले नव्हते पंजाबात शीख लोकसंख्येचे सर्वसाधारण प्रमाण १३·२२ असले तरी ते गुरुदासपूर जिल्ह्यात १९·१८, मॉंटगोमरी जिल्ह्यात १३·१७, सिआलकोट जिल्ह्यात ११·७१ व गुजराणवाल्यात १०·८७ होते. पंजाबचा हाच मध्यवर्ती प्रदेश शीख अत्यंत पवित्र मानतात, येथेच त्यांची अत्यंत पवित्र अशी पुण्यक्षेत्रे असून पंथाच्या इतिहासात संस्मरणीय अशी महाराजा रणजितसिंगाची समाधी याच प्रदेशात आहे. बियास आणि चिनाब या नद्यांमधील प्रदेश हीच शिखांची मातृभूमी व याच भूमीत त्यांचा सारा इतिहास सामावलेला आहे. प्रांताच्या फाळणीचे उत्तरदायित्व ज्यांच्या शिरावर होते त्यांनी या सर्व मुद्द्यांचा काळजीपूर्वक विचार करावयास हवा होता. आणि ज्या फाळणीमुळे असंतोषाची आणि भांडणाची बीजे पेरली जाणार नाहीत व देशातील सुख व शांती नेहमीसाठी धोक्यात येणार नाही याचीही त्यांनी पूर्ण खबरदारी घ्यावयास हवी होती.

वरील कारणांमुळे लॉर्ड माऊंट बॅटन, कॉंग्रेस व मुस्लिम लीग नेते, या प्रांताची फाळणी करतील त्यावेळी प्रत्यक्ष काय घडेल या गोष्टीकडे पंजाबचे लोक अत्यंत चिंतातूर होऊन लक्ष घालू लागले.

२ जून १९४७ च्या घोषणेचे साऱ्या देशभर संमिश्र भावनेने स्वागत झाले असले तरी पंजाबातील हिंदुशिखांना वाटत असलेली अधिकात अधिक भीती या घोषणेने सार्थ ठरली लॉर्ड माऊंट बॅटननी मुस्लिम लीगने मागितले ते ते सर्व तिच्या पदरात टाकले. त्यांनी पाकिस्तानला सतरा जिल्हे देऊन पूर्व पंजाबात बाराच जिल्हे ठेवले. अमृतसर वगळून सारा लाहोर विभाग पश्चिम पंजाबात समाविष्ट केला होता. ही वाटणी तात्पुरती असून सीमा कमिशन दोन्ही पंजाबमधील निर्णायक सीमारेषा ठरवील व ही रेषा ठरविताना लोकसंख्येशिवाय इतर गोष्टींचाही काळजीपूर्वक विचार करील असेही आश्वासन या घोषणेने दिले होते. लोक अनिश्चित अवस्थेत सापडले. विवाद्य प्रदेशातील कोणते गाव कुणीकडे जाईल हे त्यास कळेना व हे त्यास शेवटच्या क्षणापर्यंत समजलेच नाही. पंजाबचे केवळ हृदय असलेले लाहोर हे राजधानीचे शहर या विवाद्य प्रदेशातच अडकून पडले होते

पश्चिम बंगालमध्येही असाच अन्याय करण्यात आला. मात्र कलकत्त्याचा समावेश पश्चिम बंगालमध्ये करण्यात आल्यामुळे सर्व पंजाब्यांना खरेखुरे समाधान वाटले पंजाबी हे नेहमीच स्वतःपेक्षा इतरांचाच अधिक विचार करतात. त्या काळात लाहोर शहरात एकमेकास भेटणारा प्रत्येक सुशिक्षित हिंदुशीख या घटनेबद्दल आनंद व्यक्त करीत होता. त्या बिचाऱ्यास हे काय माहित, की कलकत्त्याचा हिंदुस्थानात समावेश याचा अर्थ लाहोरची हिंदुस्थानशी ताटातूट. मुस्लिम लीगमध्ये बरेच महत्त्व असलेल्या माझ्या एका मुस्लिम स्नेह्यानेही या निर्णयाबद्दल मजजवळ अत्यंत आनंद व्यक्त केला व त्याने हेही स्पष्ट सांगितले, की लाहोर हिंदुशिखांना मिळेल अशी खोटी आशा त्यांनी बाळगून नये कारण गव्हर्नर जनरल व जिना यांचेमध्ये या देवघेवीविषयी ठरावच झाल्याचा त्याने उल्लेख केला. दुर्दैवाने त्याच्या भाषणाकडे मी पुरेसे लक्ष पुरविले नाही.

## ७ : मोठ्यात मोठा ऐतिहासिक पोरखेळ

पंजाब सीमा समितीने तिच्यावर विश्वास ठेवून बसलेल्या लोकांचा जो राक्षसी व अत्यंत क्रूर विश्वासघात केला त्यास जगाच्या इतिहासात तोड असल्याचे कोणी दाखवू शकेल काय? वस्तुतः ती मुळी सीमा समितीच नव्हती. ते सारे एकपात्री नाटक होते. त्या माणसाने कधी सीमेस भेट दिली नाही किंवा कधी उभय पक्षातील कोणाचे म्हणणेही ऐकून घेतले नाही. रौलट चळवळीच्या दिवसात लोकप्रिय झालेली एक म्हण या प्रकरणी सहज लावता येईल. लवादाने आपला निवाडा 'वकील दलील अथवा अपील' यांच्याकडे लक्ष न देता द्यावयाचा. सीमा समितीच्या नियुक्तीची घोषणा होताच



**वीस वर्षांचे श्रम असे कारणी लागले**

लोक आपापल्या पक्षाच्या निवेदनाच्या सिद्धतेत निमग्न झाले. लाहोरला फेनरोडवरील बक्षी सर टेकचंद यांचा निवास या कार्याचे केंद्र बनले. हिंदू, काँग्रेस आणि शीख या तिघांनी आपली एकत्र सिद्धता करून समितीपुढे मांडण्यासाठी प्रतिपक्षास निरुत्तर करणारे निवेदन बनविण्यास सर टेकचंद यास साहाय्य केले. सहस्रावधी रुपये गोळा झाले. पंजाब नॅशनल बँकेचे अध्यक्ष लाला योधराज यांनीच पंचवीस हजार रुपये दिले. एक खास उपसमिती नेमली गेली व तिला अनेक अभ्यासू तज्ज्ञ साहाय्य करीत होते. जुने दप्तर तपासून निवेदनातील प्रत्येक विधान पाहून पारखून घेण्यात आले. लाहोरचा भारतामध्ये समावेश करण्यास अनुकूल असा पुरावा गोळा करण्याचे काम लाला योधराज यांच्यावर सोपविण्यात आले होते. अशा रीतीने हे निवेदन तयार झाल्यावर त्याची एक प्रत पं. नेहरूंकडेही पाठविण्यात आली होती. ते त्यांना आवडले व त्यांनी काही फेरफारही सुचविले होते असे म्हणतात. लाला योधराज यांनी आपली बाजू मांडण्यासाठी अमेरिकेचे सुप्रसिद्ध अ‍ॅडव्होकेट माजी अटर्नी जनरल ऑनरेबल फ्रान्सिस बिडल यांना बोलावण्याची व्यवस्था केली होती. तत्पूर्वी हे प्रकरण नीट बनविण्यास साहाय्य करण्यासाठी मुंबईचे एक प्रसिद्ध बॅरिस्टर भरभक्कम फी देऊन बोलावले होते. मागाहून ही फी त्यांनी परत केली. जो जो हे निवेदन तयार होऊ लागले तो तो या मंडळींना स्वतःच्या यशाबद्दल-खात्री वाटू लागली व मला वाटते, ते स्वतःच्याच मुद्द्यांना इतके बळी पडले, की त्यांच्या फाजील आशावादित्वाचा संसर्ग उच्च वर्गातील मध्यम वर्गास होऊन त्यांनाही लाहोर पूर्व पंजाबातच रहाणार यावद्दल शंका राहिली नाही. त्यांच्यापैकी काही थोडेखेरीज करून साऱ्यांनी आपले वित्त लाहोरहून का हलविले नाही याचा उलगडा वरील गोष्टीवरून होतो. बक्षी टेकचंद यांचे कायद्याचे ग्रंथालय साऱ्या आशियात उत्कृष्ट होते. त्यांनी त्यापैकी एक ग्रंथही हलविला नाही. सीमा समितीच्या आपल्या कामावरून माननीय न्यायमूर्ती मेहेरचंद महाजन एकदा सिमल्याहून लाहोरला आले आणि आपल्या घरची एक वस्तूही न हलविता त्याच रात्री परत गेले. त्यावरून लाहोर निश्चितपणे पूर्व पंजाबमध्येच समाविष्ट होणार असाच निष्कर्ष मी काढला. माझे सामानसुमान हलविण्यास लागणारी साधने, पैसा आणि वेळ मला उपलब्ध असूनही तो एक अनावश्यक खटाटोप आहे असेच मी ठरविले. लाहोरचा समावेश पूर्व पंजाबमध्ये व्हावा असे म्हणणाऱ्या पक्षाचे निवेदन इतके न्याय्य व भरीव आहे, की निवाडा उलट जाणे शक्य नाही अशी मला निश्चिती वाटू लागली होती. मला नंतर सर्वात अधिक पश्चात्ताप व खेद झाला तो वीस वर्षे परिश्रम करून अर्थशास्त्रावरील संशोधनात्मक ग्रंथाची मी तयार केलेली हस्तलिखिते, माझ्या स्मरणवह्या व दैनंदिनी यांच्या गहाळ होण्याचा. त्या परत मिळविण्यासाठी मी केलेले सर्व प्रयत्न निष्फळ ठरले आहेत. महिना शंभर रुपये भाडे येण्याजोगा माझा बंगला महिना पन्नास रुपये पेन्शन असलेल्या एका सेवानिवृत्त जमादाराला देण्यात आला आहे. तो भोळेपणाने उद्गारला, ' मी ती सारी रद्दी चहा करण्यास वापरली. '

मुसलमानांनी आपले निवेदन बनविण्यास फारसे श्रम घेतले नाहीत. मात्र त्यांनी आपला पक्ष मांडण्यासाठी सर झाफरुल्लाखान या मुसलमानातील अग्रगण्य कायदेपंडितास नियुक्त केले होते. हे प्रकरण सुनावणीस निघण्याचा दिनांक जो जो जवळ येऊ लागला तो तो ते ऐकण्यासाठी जी पद्धती ठरविली होती तिची एक एक वार्ता हिंदू पक्षाच्या कानी हळूहळू पडू लागली व शेवटी असे आढळून आले की, वादी प्रतिवादी हिंदू शीख व मुसलमान यांना आपापसात घोळ घालण्याची अथवा वर्दळीवर येण्याची पूर्ण मुभा देण्यात आली असून या लग्नसोहळ्यातून मुख्य नवरदेवास मात्र वगळण्यात आले होते. अशाप्रकारे भारतातील मुसलमान व हिंदू शिखांवरील परस्पर तेढीचे प्रदर्शन व्हावे म्हणून इंग्रजांनी अत्यंत धूर्तपणाने हे नवे व्यासपीठ उभारले होते. त्यामुळे आपला पक्ष मांडण्यासाठी आंतरराष्ट्रीय कीर्तीचा एखादा कायदेपंडित बोलावण्याची कल्पना अर्थातच सोडून द्यावी लागली. सीमा समितीच्या कार्यपद्धतीचे रूपांतर लौकरच पोरखेळात झाले.

काँग्रेस पुढाऱ्यांनी या प्रकरणी एकामागून एक चुका केल्या. पंजाब आणि बंगाल या दोन्हीसाठी एकच सीमा समिती मान्य करण्यात काँग्रेस पुढाऱ्यांनी पहिली खेदकारक चूक केली. तीन न्यायाधीशांच्या ठिकाणी फक्त एकास मान्यता देणे ही दुसरी घोडचूक होय आणि इंग्लंडच्या सार्वजनिक जीवनात कोणतेही विशिष्ट स्थान नसलेला, राजकीय निःपक्षपातीपणा अथवा कायद्याच्या क्षेत्रातही अप्रसिद्ध असलेला सर सेरिल रॅडक्लिफ यासारख्या माणसास मान्यता देऊन वरील चुकांवर कळस चढविला. त्यांचे नाव सुचविण्यात आले तेव्हा त्यांच्या पूर्वचरित्राविषयी पं. नेहरूंनी यत्किंचितही चौकशी केली नाही. जिनांनी या नावास तात्काळ संमती दिल्यामुळे तरी पं. नेहरूंच्या मनात थोडा संशय यावयास हवा होता. पण ही एक अत्यंत क्षुल्लक गोष्ट म्हणून गंभीरपणे लक्ष देण्याजोगी नव्हे असेच त्यांना कदाचित वाटले असेल. दिल्ली येथील एका दैनिकात एकाने पत्र लिहून असा आरोप केला होता की, काही वर्षापूर्वी जिनांनी जेव्हा लंडनला वकिली आरंभली तेव्हा हे रॅडक्लिफमहाशय त्यांचे ज्युनियर

होते. हा आरोप पुढे केव्हाही नाकारण्यात आला नाही. कॉंग्रेस-वाल्याची चौथी अक्षम्य चूक अशी, की त्यानी लवादाच्या या निवाड्यावर ब्रिटिश सरकारकडे फेरतपासणी करण्याचा अधिकारही सोडून दिला.

लॉर्ड माऊटबॅटनला आपला निवाडा सादर करताना सर रॅडक्लिफ व माऊटबॅटन याचे काय खलबत झाले हे त्याचे त्याना ठाऊक. तथापी रॅडक्लिफ याच्याबरोबर पच म्हणून नेमलेल्या हिंदू, मुसलमान व शीख प्रतिनिधीशी सर रॅडक्लिफ याचे वेळोवेळी झालेले सभाषण आता षटकर्णी झाले आहे. त्यावरून विचार करता सर रॅडक्लिफ हा खरोखरी मोठा चाणाक्ष माणूस असला पाहिजे यात शका नाही. आपण जे काही करणार ते त्याच्याच हिताचे करणार अशी प्रत्येक जातीच्या प्रतिनिधीची समजूत करून देण्यात त्याचा हातखडा दिसला. त्यामुळे या तिन्ही ज्ञातीपैकी प्रत्येकास निवाडा आपल्याच बाजूने होणार असा शेवटच्या क्षणापर्यंत विश्वास वाटत होता

२ जूनच्या योजनेप्रमाणे पश्चिम पजाबमध्ये ज्या सतरा जिल्ह्याचा समावेश व्हावयाचा होता त्यात शे. ७३ मुसलमान असून शे. १४ हिंदू, शे. १० शीख व शे. ३ ख्रिश्चन व इतर जातीचे लोक होते. इतर सर्व ज्ञाती एकत्र केल्या तरी मुसलमानाचे निश्चित आधिक्य होते. पण पूर्व पंजाबच्या बारा जिल्ह्याची मात्र तशी स्थिती नव्हती. तेथे हिंदू शे. ४८, मुसलमान शे. ३२, शीख शे. १८ व इतर शे २ असे प्रमाण होते त्यामुळे कोणत्यातरी एकाच जातीचे निर्भेळ बहुमत होण्याजोगे नव्हते. पश्चिम पजाबात १७ लक्ष शीख उरले असून पूर्व पजाबमध्ये त्याची लोकसख्या वीस लाख अथवा शे. १८ होती. अशा प्रकारे शीख ज्ञातीचे नेमके दोन तुकडे होणार होते.म्हणजे आपोआप सारा पंजाबच मुसलमानांच्या वर्चस्वाखाली जाणार होता. आर्थिक-दृष्टचा हा प्रात खरोखरी अविभाज्य आहे. फाळणीमुळे ज्याच्या आर्थिक स्थितीवर काहीही परिणाम होऊ शकत नव्हता असा फक्त एक अंबाला विभाग. या विभागाची शेती यमुनेच्या कालव्यावर अवलबून असून पजाबच्या पाची नद्याशी त्याचा काहीही सबंध नाही. नियोजित फाळणीने दोन्ही भागांची समृद्धता सपुष्टात येणार होती. त्यातल्यात्यात पूर्व पजाबवर तिचा अधिक परिणाम होणार होता. पूर्व पजाबला अन्नपुरवठा होणे कठीण होते. कारण प्रत्येक दुसऱ्या वर्षी त्या भागात दुष्काळ पडतो. काही भागात तर पिण्यासदेखील पुरेसे पाणी नसते त्यामुळे कित्येक दशके हा प्रात हिंदुस्थान सरकारला एक ओझे बनून राहील असे वाटते. उलटपक्षी आशियामधील अत्यत सुपीक असा कालव्याच्या वसाहतीचा प्रदेश–जे हिंदुस्थानचे धान्य कोठार होते–पश्चिम पजाबात समाविष्ट होणार होता. याच कारणाने हिंदु शिखांनी सीमा समितीकडे फाळणीच्या योजनेत फेर-फार सुचवून पूर्व पजाबसाठी फक्त लाहोर व गुरुदासपुरचीच मागणी केली नसून कालव्याची एक वसाहतही मागितली होती. पाकिस्तान स्वयपूर्ण राज्य व्हावे यासाठी ब्रिटिश सरकारने फार कळकळ दाखविली. तेवढीच कळवळ एक शतकभर ज्या प्राताच्या आधारावर इग्रज भारतात राहू शकले त्या पजाबसाठीही त्यांनी दाखवावयास हवी होती.

पथिक अँसेंब्ली पार्टी, पथिक प्रतिनिधी बोर्ड आणि शिरोमणी अकाली दलाची कार्यकारिणी याची एक बैठक १३ जून १९४७ ला पंजाबच्या फाळणीसंबंधी विचारविनिमय करण्यासाठी नव्या दिल्लीस भरली होती. तिने, पश्चिम पजाबातून हिंदु शीख लोकसख्येबरोबरच त्याचे वित्तही न्यायपद्धतीने पूर्व पजाबात हलविण्यात यावे अशी सीमा समितीने जोराची शिफारस करावी असे मत व्यक्त केले. लोकसख्या व वित्त हलविले नाही तर फाळणीचा हेतूच विफल होईल असेही परिषदेने म्हटले होते. परंतु शीख पुढाऱ्याच्या या मागणीस आता फार उशीर झाला होता. सुमारे दोन वर्षापूर्वी जेव्हा स्वत. जिना यानी लोकसख्येची व मालमत्तेची अदलाबदल सुचविली तेव्हा बहुतेक सर्व पक्षानी एका सुरात त्या सूचनेची टवाळी केली. महात्मा गांधीपासून तो सडकेच्या वाटसरूपर्यंत सर्वांनी तिला विरोध केला आणि देशातील यच्चयावत् कॉंग्रेस पक्षीय व शीख वृत्तपत्रानी एक आचरट व अव्यवहार्य सूचना केली म्हणून जिनाची हेटाळणी केली. जिना गप्प बसले. पण दुसऱ्या कोणासही ज्या आगामी घटनाचे आकलन होऊ शकले नाही त्याचे चित्र जिनाच्या डोळ्याना दिसू शकले, त्या गृहस्थाचा दूरदर्शी मोठेपणा यावरून सिद्ध होतो. दोन्ही पजाब व दोन्ही बगाल यामधील लोक व वित्त यांची नियोजनपूर्वक अदलाबदल झाली असती तर भारताचे स्वातत्र्य हे खऱ्या अर्थाने सर्वांचेच स्वातत्र्य होऊ शकले असते.

या योजनेप्रमाणे पूर्वपजाबला ३५३१४ चौरस मैलाचा प्रदेश मिळाला होता तर मुसलमानाना ६३७७५ चौरस मैलाचा प्रदेश दिला होता. सिमल्याचे क्षेत्रफळ केवळ ८१ चौरस मैलाचे होते. मुसल-मानाना १७ जिल्हे मिळणार असून मुस्लिमेतराना ११ च जिल्हे मिळाले होते व त्यातील काही जिल्हे तर मुस्लिम प्रदेशातील तालुक्याएवढे होते.

शिखांच्या मागणीमुळेच पजाबची फाळणी करण्यात आली असे मानले जाते. मग त्याची म्हणून जर फाळणीची मागणी मान्य केली होती तर ती फाळणी त्यांच्या साऱ्या गरजा पूर्ण करील अशी व्हाव-यास हवी होती. केवळ फाळणीसाठी फाळणी त्याना नको होती. पण त्याची मागणी म्हणून फाळणी तर केलीच व ती मोठ्या युक्तीने त्याच्या गळीही उतरविली. तीत शिखाचा अधिकात अधिक तोटाच झाला. हे नतर शिखाना कळून आले. तयालपूर, सरगोधा, शेखोपुरा, मुलतान व मॉंटगोमरी या जिल्ह्याच्या भरभराटीस त्याचे अपार श्रम कारणीभूत झाले होते. जलदर व अबाला हे दोन विभाग जेवढा शेतसारा भरीत तेवढा एकटा तयालपूर जिल्हा भरीत असे काल-व्याच्या वसाहतीत हिंदुशिखानी आपले सारे भाडवल गुतविले होते. २ जूनच्या घोषणेने यापैकी कोणताही प्रदेश त्यास मिळालाच नाही. पण पुढेमागे त्या प्रदेशापैकी काही प्रदेशाचा समावेश- पूर्वपजाबमध्ये करण्याचा प्रश्न सीमा समिती विचारात घेईल अशी साधी आशा करण्यासही या घोषणेने आधार ठेवला नव्हता.

हिंदुस्थान सरकारची मालमत्ता व देणेघेणे याच्या वाटणीची मूलतत्त्वे अद्याप ठरली नव्हती. परतु त्याची वाटणी उभय राष्ट्राच्या लोकसख्येवरून करण्यात येईल अशी चिन्हे दिसत होती. अशाच अनिश्चित स्थितीत सीमा समितीच्या कार्यव्याप्तीचा प्रश्न टागून ठेवण्यात आला होता. २ जूनच्या घोषणेने लोकसख्या व इतर गोष्टीचा उल्लेख केला होता, पण या ' इतर गोष्टी ' कोणत्या याचा स्पष्ट निर्देश केला नव्हता. तथापि काही झाले तरी इंग्रज पजाबी

हिंदुशिखांवर अन्याय करणार नाहीत ही आशा अद्याप सुटली नव्हती. हिंदुशीख चागले शतकभर त्याचे शूर सहकारी होते. ही आशा थोडी अंधूक झाली होती खरी. पण १७ जुलैच्या वृत्तपत्रात कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाचे उपनेते मि. अलेक्झाडर बटलर यांची 'पजाबच्या फाळणीने आपण शीख ज्ञातीची दोन्ही राष्ट्रात जवळजवळ सारखीच वाटणी केली आहे. पण शिखाची पूजास्थाने, त्याची मालमत्ता व शिखाना जिव्हाळ्याच्या वाटतात त्या इतर गोष्टी सीमा रेषेच्या एकाच अगास येतील अशी रेषा फाळणी निश्चित करताना सीमा समिति आखून देईल अशी आम्ही आशा करतो.' अशी घोषणा प्रसिद्ध झाली. त्यामुळे हिंदुशीखाच्या आशेला पुन्हा चागलाच उजाळा मिळाला. त्याचप्रमाणे आर्थर हेडरसन यानी केलेल्या 'इतर गोष्टी'च्या व्याख्येने गळाठून गेलेल्या हिंदुशिखाना पौष्टिक मिळाले. त्यानी या व्याख्येत शिखाच्या पूजास्थानाचा उल्लेख केला होता. या व अशा घोषणानी व उदगारानी पंजाबच्या अल्पसख्याकांची पुन्हा एकदा दिशाभूल झाली आणि किमानपक्षी शेखपुरा व लाहोर हे जिल्हे पूर्व पजाबमध्ये घालण्यात येतील असे त्याना वाटू लागले पुढे घडलेल्या घटनांवरून पाहाता या दोघा सभ्य गृहस्थानी अल्पसंख्याकाची केलेली ही निष्ठूर थट्टाच होती हे स्पष्ट झाले नव्य। दिल्लीहून 'डॉन'ने १९ जुलै १९४७ च्या आपल्या अकात 'पुन्हा एकदा दुटप्पीपणा' या शीर्षकाखाली फाळणीचा निर्णय करताना 'इतर गोष्टी' लक्षात घेतल्याम परिणामाचा विचार न करता मुस्लिम लीग सीमा समितीच्या निवाडयास धाब्यावर बसवील' असे सरकारला रोखठोक आव्हान दिले. जिना व लियाकतअलीखान यानी लॉर्ड माऊंट बॅटन व इग्रज सरकार यांच्याकडे कडक शब्दात तक्रारी केल्या. तेव्हा लॉर्ड माऊट बॅटन यानी सीमा समितीची प्रत्यक्ष गाठ घेण्यासाठी लाहोरला येण्याचे ठरविले वास्तविक फाळणीच्या सीमा ठरविताना 'इतर गोष्टी' लक्षात घ्याव्यात या तत्वास लीगने पूर्वी मान्यता दिली होती. पण ही मान्यता अगलट येणार असे दिसताच लीगचे पुढारी, 'इतर गोष्टी'विषयी आपली मते व्यक्त करणाऱ्या ब्रिटिश मुत्सद्याना शिवीगाळ करून, त्या मान्यतेतून आपली सोडवणूक करून घेण्याचा डाव खेळत होते व शेवटी त्यात त्याना यशही आले.

२१ जुलै १९४७ रोजी लॉर्ड माऊट बॅटन यानी लाहोरला दिलेल्या भेटीच्या वेळी, भरलेल्या सीमा समितीच्या बैठकीत, समितीच्या सदस्याना बराच दोष दिला. कारण भिन्नभिन्न पक्षाच्या पुढाऱ्यानी सीमा समितीचा निवाडा आपल्या अपेक्षा सफल करू शकला नाही तर आपण प्रतिकार करू अशी धमकीवजा निवेदने काढून एक प्रकारचे युद्धच आरभले होते. ते थांबविण्यास ही समिती असमर्थ ठरली होती. शेवटी त्यानी स्पष्ट सागितले की, लाहोर हा विवाद्य जिल्हा आहे १० ऑगस्टला निवाडा होताच उभय पक्षानी वर किंवा खाली हलण्यास सिद्ध राहावे.

हिंदु आणि शीख यांनी समितीच्या निवाडयाचा प्रतिकार करण्याचा प्रश्नच नव्हता. २ जूनच्या मूळ योजनेपासून ब्रिटिश सरकारने व आपल्याच कांग्रेस पुढाऱ्यानी चळता कामा नये असा आग्रह धरून बसणे एवढेच त्याचे काम होते. सीमा समितीचे अधिकार -काय आहेत व तिचा निवाडा निर्णायक आहे, की काय हे मूळ योजनेत स्पष्ट केलेले नव्हते. या योजनेप्रमाणे सर्व पक्षाना विचारून सीमा समिती नेमली जावयाची असून तिच्या पुढे निर्णयार्थ ठेवावयाचे मुद्देही साऱ्या पक्षाच्या विचारानेच ठरावयाचे होते. असे असता ब्रिटिश सरकारने पार्लमेंटमध्ये सीमा समितीच्या अध्यक्षाने दिलेला निवाडा निर्णायक समजला जाईल अशी घोषणा का केली याची कारणे त्यानाच ठाऊक. ही घोषणा म्हणजे योजनेच्या मूल तत्त्वात महत्त्वाचा फेरफार होता वास्तविक निरनिराळ्या पक्षानी सीमा समितीपुढे एकूण २५१ निवेदने मांडली होती ती सर्व चालून निवाडा देणे हे अध्यक्ष महाशयाना शारीरिक व मानसिक दृष्ट्या केवळ अशक्य होते. तरीही या एकट्या एक व्यक्तीने केलेला निवाडा अल्प सख्याकाच्या जीवन मरणाचे भवितव्य ठरविण्यास निर्णायक मानला जाणार होता.

हिंदुशिखानी आपले म्हणणे अत्यत कौशल्याने तयार केले आणि समितीला जी बधने होती त्यांचाच आधार देऊन त्यानी आपला पक्ष मांडला. फाळणीची रेषा ठरविताना सीमा समितीने मुस्लिम व मुस्लिमेतर यांच्या सख्येच्या विचाराबरोबरच 'इतर गोष्टी'चाही विचार करावा अशी समितीला सरकारी सूचना होती या 'इतर गोष्टी'वर हिंदुशिखानी भर दिला होता. त्यात साहजिकच शिखाना मानाचे स्थान होते

'साऱ्या ब्रिटिश भारतात ४१।। लक्ष शीख असून त्यापैकी ३७।। लक्ष एकट्या पंजाबात राहातात. तीच त्याची मायभूमी व तीच त्यांची धर्मभूमी व पुण्यभूमी त्याची मुळे पंजाबच्या भूमीत खोल रूजली आहेत त्याच्याच कष्टामुळे व धाडसामुळे प्रांताची इतकी भरभराट झाली आहे

त्यालपूर जिल्ह्यात एका मोठ्या प्रदेशात हिंदु व शिखाचे मिळून सख्याधिक्य आहे. जर हा प्रदेश शेखपुरा व मॉंटगोमरीसह पूर्व पजाबात घातला तर शीख लोक सख्येची फाळणी न होता त्याची एकात्मता कायम राहील.

'शिखाच्या पूज्य स्थानाचा विचार करणे अत्यंत अवश्य आहे. त्यापैकी एक अत्यत पवित्र व पूज्य स्थान म्हणजे नानकानासाहेब. ते त्याचे धर्म सस्थापक गुरुनानक याचे जन्मस्थान असून ते शेखपुरा जिल्ह्यात आहे

'देशाच्या सरक्षणाच्या दृष्टीने सीमारेषा ठरविली पाहिजे. एखादी मोठी नदी या दृष्टीने उपयुक्त म्हणून चिनाब नदी सीमारेषा ठरावी.

'दोन्ही विभाग आर्थिकदृष्ट्या सुरक्षित असावेत हाही विचार 'इतर गोष्टीत' कमी महत्त्वाचा नाही. जाहीर झालेल्या फाळणीने ठरलेल्या पूर्व पजाबात गव्हाचे उत्पादन शे. २९ असून पश्चिम पजाबचे उत्पन्न शे ७१ पडते. हेच माणशी प्रमाण पूर्व पजाबात १५$\frac{६}{१०}$ पौड पडत असून पश्चिम पजाबात ते २५$\frac{३}{१०}$ पौड पडते. तांदुळाच्या प्रमाणात तर याहूनही मोठी विषमता दृष्टीस पडते. पूर्व पजाबचे उत्पादन केवळ १४ तर पश्चिम पजाबचे ८६ टक्के. व माणशी प्रमाण अनुक्रमे १$\frac{६}{१०}$ व ६$\frac{६}{१०}$ पौंड असे आहे. कापसाच्या उत्पादनाची तीच स्थिती. पूर्व पजाबात केवळ हजार गठ्ठे अमेरिकन कापूस पिकतो तर पश्चिम पंजाबात त्याचे उत्पादन ७ लक्ष गठ्ठे आहे'

'उत्पादनातील ही विषमता पूर्व पजाबातील लोकसंख्येच्या दाटीमुळे अधिक तीव्र झाली आहे. पूर्व पजाबची लोकसख्या दर मैलास

३२७ आहे तर पश्चिम पजाबची मैलास २६४ आहे पूर्व पजाबची लोकसख्या ४० ६/१० असता त्याच्या वाटचास ३५ ६/१० भूभाग आला असून पाणी पुरवठ्याचा प्रदेश केवळ १८ टक्के आहे आर्थिक स्थैर्यासाठी व वाढत्या लोकसख्येला वाव मिळावा म्हणून पूर्व पजाबला अधिक भूमी मिळणे अवश्य आहे.'

'मुस्लिमेतराच्या धडाडीमुळेच या प्राताचा उद्योगधदा व व्यापार भरभराटीस आला आहे. लाहोर जिल्ह्यातील एकूण १८६ कारखान्यापैकी फक्त ७८ मुसलमानाचे असून मांटगोमेरी व ल्यालपूर जिल्ह्यातील अनुक्रमे २७ आणि ५७ कारखान्यांपैकी केवळ ८ आणि १५ मुसलमानाचे आहेत. 'एकटया लाहोरमध्ये ९७ बँका आहेत. त्यापैकी फक्त सात बँकाचा कारभार मुसलमान पहातात. बँकाच्या शभर कोट रुपयाच्या भाडवलापैकी केवळ अर्धा कोट रुपये भाडवल मुसलमानांचे आहे. लाहोरच्या १८ विमा कंपन्यापैकी फक्त दोनच मुसलमानाच्या हाती आहेत. अशा रीतीने लाहोर शहरातील सारा उद्योगधदा मुस्लिमेतराच्या स्वाधीन आहे. गेल्या वर्षी मुस्लिमेतरानी पाच लक्ष वीस हजार विक्रीकर भरला उलट मुसलमानानी फक्त ६६ हजार रुपये भरला.'

'याप्रमाणे आपल्या विचारसरणीची सामान्य तत्त्वे तपशीलवार सागून आपण मागितलेल्या प्रत्येक बाबीवर आपला अधिकार कसा पोहचतो हे हिंदुशीखाच्या निवेदनाने स्पष्ट केले. ते पुढे म्हणतात. 'अवाला आणि जालदर विभागात मुस्लिमेतराचे वर्चस्व असल्यामुळे व लोकसख्या, सलग्नपणा 'इतर गोष्टी'त विचारात घेता त्याचा पूर्व पंजाबात समावेश करणे अगदी न्याय्य आहे. या प्रदेशातील बहुतेक शेती मुस्लिमेतराचीच असून तेथील आर्थिक रचनेमध्ये हिंदूचेच हितसबध अधिक गुतलेले आहेत

'अमृतसर जिल्हा लाहोर विभागात असून तेथील लोकसख्ये पैकी शे. ५४ मुस्लिमेतर आहेत. व तेथील १६ लक्ष रु. शेतसाऱ्यापैकी १३ लक्ष सारा ते भरतात व केवळ तीन लक्ष रु. मुसलमान भरतात. शहरातील स्थावरवित्ताचे धनी कोण आहेत हे 'नागरीस्थावर कराच्या आकड्यानी सहज कळण्यासारखे आहे. अमृतसरला पधराशे घराचे धनी मुसलमान असून ते ७२००० रुपये कर भरतात. उलट मुस्लिमेतर घरमालक ६३०० असून ते ३८॥ लक्ष रुपये कर भरतात. विक्रीकर तर याहून अर्थपूर्ण आहे. मुस्लिमेतर १० लक्ष ३० हजार विक्रीकर देत असून मुसलमान २७००० रुपये भरतात. म्हणजे त्याचे शे. प्रमाण फक्त ३ पडते.

'गुरुदासपूर जिल्ह्यात मुसलमान २६००० लोकसख्येने अधिक आहेत. तरीही त्या जिल्ह्यावर मुस्लिमेतरानी हक्क सागणे न्यायाचे आहे. मुस्लिमांचे हे सख्याधिक्य प्रथम १९३१ च्या शिरगणतीत अस्तित्वात आले. याचे कारण महात्मा गाधीच्या आदेशानुसार कॉंग्रेस पक्षीय हिंदूनी शिरगणतीवर बहिष्कार टाकला होता. त्यामुळे ३१ आणि ४१ च्या शिरगणतीचे आकडे अविश्वसनीय आहेत. इतर गोष्टी मात्र मुस्लिमेतराना फार अनुकूल आहेत. या जिल्ह्यात मुस्लिमेतरांची शेती पुष्कळच मोठी आहे. शिवाय कांगडा, कोलू, आणि चबा, मंडी, सुकेत इत्यादी सस्थानाना अमृतसरशी जोडणारा आगगाडीचा एकमेव फाटा याच जिल्ह्यातून गेला आहे. हा जिल्हा पश्चिम पजावास जोडल्यास दळणवळणाची सारीच व्यवस्था विस्कळीत होईल.

तसेच उत्तर वारी दुआव कालव्याचे वाटप केंद्र याच जिल्ह्यात पठाणकोट तहसीलीत मधुपूर येथे आहे हा कालवा म्हणजे गुरुदासपूर, अमृतसर आणि लाहोर या जिल्ह्यातील बहुतेक प्रदेशाची प्राणधमनी आहे. म्हणून गुरुदासपूर जिल्हा पूर्व पंजाबलाच मिळाला पाहिजे.

'शिवाय हा जिल्हा शिखाचा इतिहास व परपरा याच्याशी फार निगडीत आहे. शीख पथाचे सस्थापक गुरुनानकदेव याचे लग्न हल्ली ज्यास डेराबाबा नानक म्हणतात त्या 'पखोकी' गावास झाले असून शक्करगड तहसील मधील कर्तारपूर येथे त्याचे देहावसान झाले'

'लाहोरमध्ये १९४१ च्या शिरगणतीने मुसलमानाची सख्या १० लक्ष २८ हजार आणि मुस्लिमेतराची ६ लक्ष ६८ हजार दाखविली असली तरी खरोखर मुस्लिमाचे एवढे सख्याधिक्य नाही. एकूण १ लक्ष ८२ हजार शेतधन्यांपैकी ९९ हजार मुस्लिमेतर असून ८२ हजार अथवा ४५ टक्के मुसलमान आहेत. १७॥ लक्ष रुपये शेतसाऱ्यापैकी शे. ६८ शेतसारा मुस्लिमेतर भरतात

असल्याच कारणासाठी हिंदुशिखानी सियालकोट, शेखपुरा व गुजराणवाला याचाही समावेश पूर्व पजाबात व्हावा अशी मागणी केली.

सयुक्तिक व भक्कम पुराव्यावर आधारलेल्या या निवेदनास फारसा पाठिंबा मिळाला नाही. इग्लडचे अर्थमत्री स्टॅफोर्ड क्रिप्स यानी असे आश्वासन दिले होते की दोन मुख्य जमातीना ज्या प्रकारची सपूर्ण स्वायत्तता दिली होती तितकी सर्वच जमातीना देणे स्वाभाविकपणेच अशक्य असले तरी शीख आणि पठाण याच्या कल्याणाविषयी इग्रजाची तळमळ कमी होणार नाही. परतु हे आश्वासन पाळण्याऐवजी मोडलेच गेले.

सीमा समितीच्या एकूण दहा बैठकीपैकी एकाही बैठकीचे अध्यक्षस्थान रॅडक्लिफ महाशयानी भूषविले नाही. त्याना रोजच्या बैठकीत होणाऱ्या चर्चेची वार्ता अक्षरशः पुरविण्याची व्यवस्था करण्यात आली होती. सीमा समितीच्या इतर सदस्याना केवळ आपले मत देण्याचाच अधिकार होता. अतिम निर्णयाचा अधिकार खास अध्यक्षासाठी राखलेला होता.

## लाहोरचे दैव गटांगळ्या खात होते

याचवेळी पंजाब फाळणी समिति पूर्व आणि पश्चिम पजावसाठी सचिवालयाच्या नोकरवर्गाची वाटणी करण्यात गुतली होती. ६ ऑगस्टलाच साऱ्या नेमणुका होऊन चुकल्या होत्या व त्याच इमारतीत वेगवेगळ्या भागात ही दोन्ही सचिवालये कामही करू लागली. १० ऑगस्टला दोन्ही सचिवालयाना सुट्टी देण्यात येऊन ती पुन्हा उघडताना कोठे उघडावयाची हे ठरविण्यात आले नव्हते. सीमा समितीच्या निवाड्यावर ही गोष्ट अवलबून होती. प्रत्येकाचे डोळे आता मोठ्या आतुरतेने रॅडक्लिफ महाशयाच्या निवाड्याकडे लागले होते. लाहोरचे दैव गटंगळ्या खात होते. युगासारख्या भासणाऱ्या या चिंतेच्या काळात जे थोडे हिंदुशीख लाहोरमध्ये उरले होते, त्यांना २ जूनची ऐतिहासिक घोषणा व नतर तिच्या सबधी प्रसिद्ध झालेली ब्रिटिश मुत्सद्यांची स्पष्टीकरणे यातील लहानसहान वाक्याचा आणि शब्दाचा येता जाता भेटेल त्याच्या जवळ काथ्याकूट करण्यावाचून दुसरा उद्योगच राहिला नव्हता. त्या घोषणेतील प्रत्येक वाक्य व प्रत्येक शब्द समुच्चय विस्ताराने अभ्यासिला जात होता.

पुष्कळांना तर निरनिराळ्या घोषणातील विविक्षित भाग अक्षरशः तोंड पाठ झाला होता. चर्चेला अंत उरला नाही. लॉर्ड माऊंट बॅटन यानी एकदा 'शिखांनी स्वतःच कांग्रेसमार्फत पंजाबच्या या फाळणीची मागणी केली असून तीमुळे शिखांची जवळ जवळ सारखीच दोन शकले पडणार आहेत हे पंजाबच्या नकाशावरून मला आढळून आले. हे पाहून मी आश्चर्याने स्तंभितच झालो असे उद्गार काढले. होते. त्यावर चर्चेचा बराच भर असे. लाट साहेबांनी शिखांच्या या 'आत्महत्ये' बद्दल जणू काय त्यांचे सांत्वन करण्यासाठी आपणास शिखांबद्दल अतिशय आदर व सहानुभूती वाटते असेही पुढे म्हटले होते. लाट महाशयांचा दुसरा एक उद्गार त्या काळी विनोदी वाटला. ते म्हणाले होते 'वित्तावर आधारलेली फाळणी इंग्लंडच्या मजूर सरकारला मानवणे अशक्य वाटते' हे उदगार काढताना लॉर्ड माऊंट बॅटन यानी विनोद केलेला नसून कठोर पण प्रामाणिक सत्यच सांगितले होते हे पुढे घडलेल्या घटनांवरून सिद्ध झाले. आणि त्यांनी शिखांचे जे अगाऊच सांत्वन केले होते त्याचाही खरा अर्थ शीख आपल्या पुण्यस्थळांना व आपल्या मायभूमीला मुकणार होते असाच होता. बहुजन समाजाने लाटसाहेबांच्या शब्दाचा उघड अर्थ ध्यानात घेतला नाही ही केव्हढी दु:खाची गोष्ट? त्याहून अधिक दुःखाची गोष्ट ही की कांग्रेसचे पुढारी व काही शिखांचेही पुढारी मध्य पंजाबातील हिंदु शिखांची आणि लाहोरच्या हिंदुशीख जनतेची विशेषतः, अद्यापही चिनाब नसली तरी रावी नदी पूर्व पंजाबची सीमा रेषा ठरणार आहे अशी समजूत करून देऊन सारखी फसवणूक करीत होते. जाहीर झालेल्या फाळणीमध्ये कोणत्याही महत्त्वाच्या गोष्टीत फेरफार होणे संभवनीय नाही असे जर श्रेष्ठतम पुढाऱ्यांनी सरळ सरळ सांगून टाकले असते, आणि लोकांनीही लॉर्ड माऊंट बॅटन हे कसलाही लपडाव न करता सरळ सरळ बोलत आहेत असे मानले असते तर पश्चिम पंजाबच्या शीखहिंदूंना तेथील धोक्याच्या प्रदेशातून योजनापूर्वक निर्वासनाची व्यवस्था करण्यास अद्यापही पुरेसा वेळ होता. अथवा पाकिस्तानचे एकनिष्ठ प्रजाजन म्हणून तेथेच स्थाईक होण्यासंबंधी निश्चयात्मक निर्णय घेता आला असता. दुसऱ्या अवस्थेत मागून दिल्लीकडे डोळे लावून बसण्याऐवजी आपल्या रक्षणासाठी स्वतःच मुस्लिम लीगशी कसला तरी ठराव करता आला असता. आणि हे जर झाले असते तर झाला हा रक्तपात व हत्याकाड निश्चयाने टळले असते.

### काळाकुट्ट दिवस

ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात एकाएकी अशी घोषणा करण्यात आली की, समितीचा निवाडा १५ ऑगस्टच्या पुढे ढकलण्यात आला आहे. आणि शेवटी हा घातकी निवाडा पुढे दोन दिवसांनी म्हणजे १७ ऑगस्ट १९४७ ला प्रसिद्ध झाला. हा दिवस पंजाबातील हिंदु शिखांच्या इतिहासात अगदी काळाकुट्ट म्हणून आठवला जाईल. हिंदुशिखांना डोंगर पोखरून उंदीर काढल्याचा खराखुरा प्रत्यय या निवाड्याने आणून दिला. ४१ च्या शिरगणतीखेरीज या अंतिम निवाड्यात इतर कोणत्याही गोष्टीचा विचार केला नव्हता. बऱ्याच मोठ्या प्रदेशाची नैसर्गिक सीमारेषा डावलून स्वेच्छेने ती कशीतरी आखण्यात आली होती. बहुतेक सारा लाहोर जिल्हा पाकिस्तानला दिला होता. दरबार साहेबाजवळचा रावी नदीवरील हिंदुशीख बहुसंख्य असलेला शक्करगड तहसील देखील पूर्व पंजाबला दिला नाही.

हिंदुशिखांमध्ये घोर निराशा पसरली. मुसलमानांचे चेहेरे मात्र आनंदाने ओसंडत होते. कांग्रेसच्या पुढाऱ्यांशी त्यांनी केलेल्या या बुद्धियुद्धामध्ये लाहोरसारखे केवळ दुसऱ्यांच्या परिश्रमानी भरभराटीस आलेले शहर मिळविणे हा त्यांचा दणदणीत विजय होता. भारताची फाळणी ही आता सिद्ध गोष्ट झाली होती. त्याबद्दल खरोखर मुस्लिम पुढाऱ्यांच्या कणखरपणाला धन्यवादच द्यावयास पाहिजेत. जून १९४७ मध्ये प्रथम तिचा पुरस्कार सुरू झाला आणि १७ ऑगस्ट १९४७ ला तिची सांगताही झाली. दिल्ली व भारताच्या इतर नगरातून कितीही मोठ्या प्रमाणात दीपोत्सव करून, राष्ट्र ध्वजारोपण करून अथवा मेवामिठाया वाटून जरी स्वातंत्र्योत्सव साजरा होत होता तरीही देशाचे विच्छेदन व दोन प्रांताची फाळणी या घटना भारताच्या इतिहासात कधीही घडल्या नव्हत्या इतक्या अनर्थकारी आहेत, ही गोष्ट कांग्रेस पुढाऱ्यांनी कितीही शब्दच्छल व वक्तृत्वाच्या कसरती केल्या तरी त्यांना लपविता येणे शक्य नव्हते.

निवाड्याची घोषणा नेमलेल्या दिवशी का करण्यात आली नाही? कांग्रेस आणि लीग पुढाऱ्यांना स्वातंत्र्योत्सवातील आनंदाचा रंगभंग करावासा वाटला नाही की अगदी शेवटच्या क्षणी ब्रिटिश मंत्रिमंडळाशी विचारविनिमय करून गव्हर्नर जनरलने निवाड्यात काही फेरफार केले? का सर रॅडक्लिफने आपण बनविलेल्या निवाड्याविषयी गव्हर्नर जनरलशी एकांतात कानगोष्टी करून त्यांच्या सूचनेवरून काही फेरफार केले? निवाडा घडविला जात असता शेवटच्या आणीबाणीच्या दिवसात पडद्यामागून दोऱ्या ओढणारी कोण कोण माणसे होती? केवळ छापण्यास उशीर झाला म्हणून घोषणेस उशीर झाला की गव्हर्नर जनरल अथवा रॅडक्लिफ यांनी शेवटच्या क्षणी केलेले फेरफार इतक्यात कळू नयेत म्हणून लोकांना चकविण्यासाठी हे नुसते निमित्त होते?

या प्रश्नाची खरीखुरी उत्तरे लॉर्ड माऊंट बॅटन किंवा सर सेरिल रॅडक्लिफ हेच देऊ शकतील. कदाचित त्यांच्या मृत्युपर्यंत हे प्रश्न अनुत्तरितच राहतील. शेवटच्या क्षणी फेरफार करण्यात आले हे जर रॅडक्लिफनी मान्य केले तर त्यानी आपले दौर्बल्य अथवा पक्षपातीपणा मान्य केल्यासारखे होईल. आणि ज्या कामात आपला संबंध नाही त्या कामात हस्तक्षेप केल्याचा अपराध लॉर्ड माऊंट बॅटनच्या गळी उतरेल. ज्या रूपात अतीम निवाड्याची घोषणा झाली ते घडविण्यात जिना अथवा पं. जवाहरलाल नेहरू यांचा कितपत हात होता किंवा त्यांना त्यासंबधी कितपत माहिती होती हा प्रश्नही एक न उकललेले कोडे आहे. दिल्लीतील जनतेत यासंबंधी कित्येक कथा प्रचलित आहेत. पण जोवर या शोकपर्यवसायी नाटकातील एखादे पात्र आपले मन मोकळे करीत नाही तोवर त्या साऱ्या कल्पितच मानल्या पाहिजेत. कारण इच्छेतूनही कल्पना सुचत असतात.

एक बोलवा अशी आहे की, संपूर्ण गुरुदासपूर जिल्हा जर पाकिस्तानला दिला तर लाहोर शहरासह संपूर्ण लाहोर जिल्हा पूर्व पंजाबला द्यावयास सर रॅडक्लिफ सिद्ध होते प्रत्येक इंग्रजाच्या मनात जे होते तेच करण्यास रॅडक्लिफसाहेब उद्युक्त झाले होते. कारण गुरुदासपूर पाकिस्तानला दिले की काश्मीर संस्थान चोहोबाजूनी पाकिस्तानकडून वेढले जात होते. काश्मीरला जाण्याच्या एकूण तीन वाटा आहेत. त्यापैकी दोन आधीच पाकिस्तानात विरून गेल्या




दणदणीत विजय

होत्या. ही तिसरी वाट पठाणकोट, काटुहा, जम्मू अशी होती. आता काश्मिरला जाण्यासाठी हाच राजमार्ग बनण्यासारखा होता. तोही पाकिस्तानकडे गेला असता म्हणजे काश्मिर संस्थानाने पाकिस्तानशी संलग्न व्हावे नाहीतर पाकिस्तानकडून गिळंकृत केले जावे. याशिवाय पसंती नापसंतीचा दुसरा कोणताही मार्ग काश्मीरच्या महाराजांना उपलब्ध होण्यासारखा नव्हता. त्या स्थितीत काश्मीर भारताशी संलग्न झालेले असते तरी पाकिस्तानचे काश्मिरवर झालेले आक्रमण थोपविणे अथवा काही सहाय्य करणे भारतास अशक्य झाले असते. भारतातून काश्मिरला जाणारा हा एकमेव मार्ग सोडून देण्यास पं. नेहरूही तयार नव्हते असे म्हणतात. यावरून फाळणीसंबंधी हिंदुशिखांचे निवेदन बनविणाऱ्या समितीचे अध्यक्ष सर बक्षी टेकचंद यांना गुरुदासपूर जिल्ह्याचा समावेश पूर्वपंजाबमध्ये होईल असे आधार गोळा करण्यास विशेष परिश्रम घेण्यास का सांगण्यात आले होते याचा उलगडा होतो.

वर लिहिलेली बोलवा जर खरी असेल तर जिल्ह्याची निवड करण्यात आपण किती अदूर दर्शित्व दाखविले हे स्पष्ट सिद्ध आहे. लाहोर जर हिंदूंच्या हाती येते तर पंजाबच्या हिंदु आणि शिखांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक जीवनात ज्या प्रमाणात मोडतोड व उलथापालथ झाली आहे ती तितकी झाली नसती. दिल्लीमध्ये गोळा झालेले निर्वासितांचे घोळके टळले असते. अनेक नृशंस कृत्ये व शेखपुरा व बहुमली येथे झालेल्या कत्तलींसारख्या अघोर कत्तली घडून आल्या नसत्या. आणि पाकिस्तानने काश्मिरवर आक्रमण केल्यास, तशा आणीबाणीच्या व हातघाईच्या प्रसंगी आमच्या फौजा सरळ पाकिस्तानातून काश्मिरला पोहचल्या असत्या.

दिल्ली येथे प्रचलित असलेली दुसरी कथा अशी आहे की, सर रॅडक्लिफनी आपली सीमारेषा प्रथम उत्तरेकडून रावी नदी, नंतर मोगलपुरा कालव्याच्या उद्यानातून गेलेला बारीदुआव कालवा आणि त्यापुढे निआजवेग जवळ रावीस मिळालेला कालवा अशी ठरविली होती. यामुळे बारीदुआव कालव्याच्या पूर्वेकडील सर्व प्रदेश लाहोर छावणी, मॉडेल टाऊन आणि लाहोर जिल्ह्याचा बराच मोठा प्रदेश भारताला मिळाला असता. असे म्हणतात, की लॉर्ड माऊंट बॅटन यांना ही योजना पसंत पडली होती पण व्हाईसरॉयचा खाजगी कार्यवाह मि. अॅबेल याने शेवटच्या क्षणी हस्तक्षेप करून तिला मोडता घातला. अॅबेल हा पंजाब सिव्हिलिअन असून मुसलमानांचा कट्टा पक्षपाती होता. या कामी त्याने व्हाईसरॉयचे सल्लागार म्हणून इंग्लंडहून आलेल्या इस्मे यांचेही साहाय्य घेतले होते म्हणतात.

मुस्लिमलीगवाले म्हणतात व त्यांच्या एका मंत्र्याने लंडन येथे ते स्पष्ट बोलूनही दाखविले की, मूळ निवाड्यात सतलज ही सीमारेषा मानून जालंदर आणि अमृतसर जिल्हेदेखील पाकिस्तानला देण्यात आले होते.

निवाडा करताना काय काय घडामोडी झाल्या या विषयी वर दिलेल्या तीन वदंतांपैकी शेवटची बरीच अविश्वसनीय वाटते.

पंजाबचे हिंदुशीख खरोखरच 'बैल' समजले पाहिजेत कारण भारताने लॉर्ड माऊंट बॅटन यास आपला पहिला गव्हर्नर जनरल म्हणून निवडले. उलट पाकिस्तानने त्यास डावलून श्री. जिना यांची निवड केली. त्यामुळे सीमा समितीचा निवाडा पाकिस्तानपेक्षा आपणासच अधिक अनकूल असा होईल असे त्यांना वाटत होते. पंजाबच्या हिंदुशिखांना योग्य न्याय मिळावा म्हणून लाटसाहेब रॅडक्लिफवर आपले वजन पाडतील अशी त्यांची समजूत होती पण या लोकांस इंग्रज माणसाच्या स्वभावाचे ज्ञान नव्हते. आपला निःपक्षपातीपणा अगदी संशयातीत राहावा म्हणून लाटसाहेबांच्या पदवीचा माणूस विरुद्धपक्षासच साहाय्य करण्यासाठी चार पावले पुढे सरसावेल हेच मानणे वस्तुस्थितीला धरून होते. ते कसेही असो, पण त्यांनी बाळगलेली ही समजूत हिंदु-शीखांपैकी लाहोरमध्ये राहाणाऱ्या सहस्रावधी आणि साऱ्या पंजाबमध्ये राहाणाऱ्या लक्षावधी लोकांना कित्येक आठवडे धीर देत होती एवढे मात्र खरे.

नकाशावर सर रॅडक्लिफ यांनी निळ्या पेन्सिलीने केवळ एक रेघ मारली होती. रेघेच्या पश्चिमेकडील प्रदेश पाकिस्तानचा व पूर्वेकडील प्रदेश हिंदुस्थानचा असे ते म्हणाले. त्यांना वाटले आपल्या या कृतीने हा प्रश्न सुटला. खरे पाहता त्यांच्या कृतीने पाकिस्तान व हिंदुस्थान या दोघांनाही पुरून उरतील असे अनेक प्रश्न मात्र त्यांनी निर्माण करून ठेवले होते. त्यांनी पाकिस्तानला सुसज्ज अशी वायव्य सीमा दिली. उलट शेतातून व कुरणातून गेलेली सीमा भारताच्या पदरात टाकली. या संबंधी कलकत्त्याच्या एका संपादकांनी पश्चिम बंगाल सरकारला सादर केलेल्या माहितीवरून जी गुपिते उघडकीस आली आहेत ती खरोखर आश्चर्यचकित करून सोडणारी आहेत. त्यातले एक गुपित असे आहे, की सर्व्हेखात्याने धादांत खोटे, काल्पनिक व भौगोलिक वस्तुस्थितीशी न जुळणारे नकाशे पुरवून सर रॅडक्लिफ यांना फसविले. दुसरा आरोप असा आहे, की समितीच्या हिंदु सदस्यांना जे नकाशे पुरविले होते ते रॅडक्लिफने जे नकाशे आधारभूत मानले होते त्यापेक्षा निराळेच होते. आणि मुसलमान सदस्यांना दिलेले नकाशे त्याहूनही भिन्न होते. हे जर खरे असेल तर लॉर्ड क्लाइव्हने राजा उमीचंदाशी केलेल्या व्यवहाराची आठवण ताजी होते. इतिहासाची पुनरावृत्ती झाली खरी पण गरीब बिचाऱ्या

बंगाली हिंदुना तिचे केवढे भयकर मोल द्यावे लागले ?

सीमा समितीच्या विचारासाठी तयार केलेल्या एका टिपणीची एक प्रत लाला योधराज यानी आगाऊ पं. नेहरूकडे पाठविली होती. **या टिपणीत हिंदुस्थानसाठी संरक्षणक्षम अशी सीमा रेषा का निर्माण केली पाहिजे याची कारणे विस्ताराने पुढे मांडली होती. सीमा समितीने या निवेदनाकडे ढुंकूनही पाहिले नाही. या निवेदनातील काही उतारे आम्ही खाली देत आहोत.** याचे कारण त्यामध्ये जी भीती व्यक्त करण्यात आली होती ती बऱ्याच अंशी दुर्दैवाने खरी ठरली असल्यामुळे हे उतारे लोक मोठ्या कुतुहलाने वाचतील. इग्रजानी अथवा त्याच्या आधी शिखानी जिंकलेल्या सिंधू आणि ड्यूराड लाईन यामधील पठाण प्रदेशास अफगाणिस्तान अद्यापही मान्यता देत नाही. सिंधूच्या पश्चिमेकडील सारा प्रदेश आणि पेशावर परत मिळविण्याची त्याना अद्यापही महत्त्वाकाक्षा आहे. दुसरी गोष्ट अशी की पाकिस्तानचे लीगी राज्यकर्ते इस्लाम एकीकरणाच्या उत्साहात काश्मिरवर करावयाच्या आक्रमणासाठी पठाणाना पाचारण करतील. हे या निवेदनात केलेले भाकीत ततोतत खरे ठरले. सपाटीवर राहणाऱ्या मुसलमानाचे रक्षण करण्यासाठी आता पाकिस्तानने डोंगरी मुसलमानाची मोठ्या सख्येने लष्करात भरती चालविली आहे. तसेच भारत, अमेरिका व इग्लड याच्या हितसबधास बाध आणण्याच्या हेतूने त्याने सोव्हिएट रशियाशी लगट चालविली आहे. या साऱ्या गोष्टी या निवेदनात अगदी ततोतत आगाऊ वर्तविल्या असल्यामुळे त्यातील काही तत्सबधी उतारे पुढे दिले आहेत.

'सार्वभौम राज्याचा पहिला विशेष म्हणजे त्यास सीमा असल्या पाहिजेत. जेव्हा एखादे नवे राज्य अस्तित्वात आणावयाचे असते तेव्हा त्याच्या सीमा निश्चित करणे आणि शेजारी राष्ट्राशी नवी सधी करणे या गोष्टी मुळीच सोप्या नसतात. असलेल्या सीमात फेरफार करण्याचा हा प्रश्न नसून मुळीच अस्तित्वात नसलेली नवी सीमा अस्तित्वात आणण्याचा हा प्रश्न असतो. या दृष्टीने भारताच्या वायव्येस निर्माण होऊ घातलेल्या पाकिस्तानच्या नव्या सार्वभौम राज्याचा प्रारभ चागलाच अनूकूल आहे. त्यास वायव्येकडे भक्कम सुरक्षित सीमा मिळत आहे. उत्तरेकडे काश्मिरसस्थानशी झालेल्या संधीनी परंपरेने निर्माण झालेल्या सीमा चौक्या व आयात निर्यात कराची नाकी यांनी तिकडील सीमा निश्चित झालेली आहे. वायव्य सीमेकडील टोळीवाल्याचा प्रदेश व बलुचिस्तान याची सीमा इंग्रजांनी अनेक अनुभवांनी व प्रयोगानी ठरवून घेतली आहे. ही सीमा म्हणजे एक रेषा नसून ब्रिटिश, भारत व अफगाणिस्तान याचा संघर्ष टाळणारा टोळीवाल्याच्या राज्यांचा एक पट्टाच आहे. ही सीमा बनविण्यासाठी कित्येक लढाया लढाव्या लागल्या व अब्जावधी रुपयांचा व्यय झाला. या प्रदेशातील मलिक लोकाना वार्षिक देणग्या देऊन आणि या प्रदेशातून गेलेल्या सडकाचे रक्षण करण्याचे कार्य स्थानिक टोळीवाल्यातून खासेदार नेमून करून घेण्याच्या पद्धतीमुळे या प्रदेशास शाततेचा लाभ झाला आहे. सडकेच्या प्रत्येक कोपऱ्यावर व वळणावर आणि इतर टेकड्यावर लष्करी पहाऱ्याच्या चौक्या आहेत. या चौक्यावर भारतातील उत्कृष्ट सैन्य जागते खडे असून आपल्या मध्यवर्ती केंद्राशी वायरलेसने जोडलेले आहे.

सरक्षणाची ही योजना प्रदेशाच्या रुदीकडे भरपूर लक्ष पुरवून करण्यात आली आहे. पेशावर, बन्नु, लोहाट, रझमक आणि कोटा हे सरक्षणाच्या अर्धवर्तुळावरील मुख्य बिंदु मानले तर त्याची चालक केंद्रे बरीच मागे म्हणजे पजाब व सिंधमधील महत्वाची जी पुरवठा केंद्रे आहेत ती आहेत. टोळीवाल्याच्या प्रदेशाला भिडलेला हा सारा प्रदेशच खरोखर सीमारेषा आहे. ती अफगाणिस्तानच्या सीमेपासून भरपूर दूर आहे. सरक्षणाच्या साऱ्या मोर्चांची तोडे वायव्येकडे असून ते उघडलेल्या हाताच्या पजासारखे आहे. या पजामागे हाताचे मनगट व प्रहारक बाहू साऱ्या ब्रिटिश भारतभर पसरलेल्या अवाढव्य लष्करी सामर्थ्याच्या रूपाने सुसज्ज आहे. सीमेवरील छावण्यातून लष्कर ठेवण्याचा हेतू हाच की त्यानी आक्रमणाची पहिली धडक शोषून घ्यावी. त्याचा उपयोग ढालीसारखा आहे भारतातील सैन्य सीमेवर पोहोचेपर्यंत त्यानी शत्रुचा हल्ला थोपवून धरावा हे त्याचे कार्य आहे. पजाबमधील भूमार्गाच्या व लोहमार्गाच्या आसपास लष्करी छावण्या टाकण्याचा हाच हेतू आहे. मध्यभारत व सयुक्त प्रांत या प्रदेशात असलेले सैन्य राखीव सैन्यासारखे आहे.

'प्रस्तुतच्या ब्रिटिश भारताच्या सरक्षणाच्या दृष्टीने पाहता सीमा प्रात, बलुचिस्तान, सिंध आणि पजाब हा सारा प्रदेश अगदी एकसध मानला पाहिजे. अर्थातच या प्रदेशाचा तुकडा तोडून तो वायव्य पाकिस्तानचा एक भाग बनविण्याचा विचार करताना शेष भारताच्या सरक्षणाचाही विचार केला पाहिजे. तसेच पजाबचे दोन कृत्रिम विभाग पाडावयाचेच असतील तर केवळ या विभागांच्या सरक्षणापुरताच विचार न करता सर्व भारताच्या सरक्षणविषयक निकडीनाही अत्यत काळजीपूर्वक दृष्टीसमोर ठेवले पाहिजे.' याशिवाय ब्रिटिश राज्याच्या अताबरोबर भारत सरकारचे टोळीवाल्यांबरोबर झालेले करारमदार रद्द होतील व पाकिस्तान सरकारशी तसलेच करार करण्याचे त्यानी नाकारले तर सरक्षणाचा प्रश्न गोधळात पडेल. तसेच मुस्लिम लीगच्या पॅन इस्लामी वेडामुळे पश्चिम पजाब पुढेमागे अफगाणी व टोळीवाल्याच्या आपोआप भक्ष्यस्थानी पडेल इत्यादी बाबीचा उल्लेख करून हे निवेदन पुढे म्हणते, 'नजीकच्या भविष्यकाळात सोव्हिएट रशिया व अमेरिका, ब्रिटन ही पश्चिमी राष्ट्रे याचा संघर्ष होण्याची शक्यता आहे. भारत पश्चिमी शक्तीशी सहकार्य करणार हे उघड आहे. अशा स्थितीत हा वायव्य प्रदेश हातापासून तुटलेल्या मनगटाप्रमाणे होईल. पश्चिम पजाबची रुंदी कोठेही अडीचशे मैलांहून अधिक नसल्यामुळे त्याचे खोलवर संरक्षण करणे अशक्य होईल. पाकिस्तान मित्र राष्ट्र असले तरच सैन्याचे विभाग सीमेवर सरळ जाऊ शकतील.'

मी या निवेदनाचा वर थोडक्यात सारांश दिला आहे. पण प्रत्यक्ष निवेदनात सीमा समितीने पजाबची फाळणी करून सीमा ठरविताना प्रत्यक्ष भारताच्या सरक्षणाच्या दृष्टीने ती कशी ठरवावी याचा विस्तृतपणे विचार केला होता

'सीमा निदर्शक दगडानी व उभारलेल्या स्तंभांनी सीमेचा सारा उद्देश सफल होत नाही. एखाद्या मोठ्या नदीसारखी नैसर्गिक सीमा असणे अवश्य आहे. तसेच ज्याप्रमाणे अफगाणिस्तान व हिंदुस्थान यांच्यामध्ये टोळीवाल्यांचा 'मधला' प्रदेश आहे. त्याचप्रमाणे

पाकिस्तान व हिंदुस्थान यांच्यामध्येही असा प्रदेश राखून ठेवणे अवश्य आहे व सीमा रेषेवर ज्या ठिकाणी लष्करी ठाणी उभारली जातील त्या प्रदेशातील रहिवासी शस्त्रे वापरण्यास सरावलेले व शिक्षण घेतलेले असावेत म्हणजे आणीबाणीच्या काळात या लष्करी ठाण्यांना त्यांचे साहाय्य होईल.'

'विद्यमान पंजाबात हिंदुस्थानची सीमारेषा जर चिनाब नदी ठरविली तर या दोन्ही अपेक्षा सफल होऊ शकतात. चिनाब आणि सतलज या नद्यांमधील विस्तीर्ण प्रदेशात शिखांची वस्ती एकत्र झाली आहे. त्यामुळे हा प्रदेश वायव्येकडील टोळीवाल्यांच्या प्रदेशाप्रमाणे लढाऊ पठाणांच्या टोळ्याऐवजी लढाऊ शीख टोळ्या, एवढ्याच फरकाने मानता येईल. मात्र शीख लोक पठाणांपेक्षा कितीतरी अधिक सुसंस्कृत, सुविद्य व संपन्न आहेत. लाहोर व अमृतसर जिल्ह्यात शेतातून व कुरणातून कसली तरी सीमारेषा ओढण्याऐवजी रावी नदी सीमारेषा ठरविली तरी चालेल.

'रावी नदी ही जर सीमारेषा ठरविली तर सर्व मॉंटगोमरी जिल्हा व मुलतान जिल्ह्याचा काही भाग पूर्व पंजाबला देण्यात यावा व होऊ घातलेल्या पाकिस्तानी जिल्ह्यातून इतस्तत: पसरलेल्या शीख मालक शेतकऱ्यांना योग्य मोबदला (ऐवज) देऊन त्यांना हिंदुस्थानच्या सरहद्दीवरील जिल्ह्यातून वसविले जावे.

'हल्लीच्या घोषणेप्रमाणे पंजाब प्रांताची फाळणी एका बाजूस १२ जिल्हे व दुसऱ्या बाजूस १७ जिल्हे याप्रमाणे करणे हिंदुस्थानच्या संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत असमाधानकारक आहे. अमृतसर जिल्ह्याची फाळणी केल्याने बारी दुआब प्रदेशाचे दोन भाग पडतात. तसेच अमृतसर जिल्हा डोके पुढे वाकवावे असा आहे. त्यामुळे गुरुदासपूर व लाहोरच्या वायव्य व आग्नेय कोपऱ्यातून उद्या जर 'पिन्सर' सारखे लष्करी संचलन झाले तर भारतापासून अमृतसरचा संबंध तुटावयास मुळीच वेळ लागणार नाही. शिवाय संभाव्य पाकिस्तानी सीमारेषा, चंबा संस्थान व कांग्रा, होशियारपूर, जालंदर, फिरोझपूर या जिल्ह्यातून जी गेली आहे ती अमृतसर जिल्ह्याला तीन बाजूंनी घेरणारी आहे. अशी सरहद्द राखण्यास हिंदुस्थानला कठीण जाईल.

'पंजाब प्रांताचे दोन विभाग पाडताना ठरवावयाच्या सीमारेषेचा प्रश्न हा केवळ तत्प्रांतियांनी आपसात सोडवावा असा प्रांतिक प्रश्न नाही. या सीमारेषेच्या योजनेवर शेष हिंदुस्थानच्या संरक्षणाची योजना अवलंबून आहे. म्हणून हिंदुस्थानसारख्या खंडप्राय देशाची सुरक्षितता व संरक्षण या विशाल दृष्टिकोनातूनच या प्रश्नाकडे पाहणे आवश्यक आहे. सीमा समितीसमोर पंजाबच्या दोन विभागात काही जिल्हे अथवा चार-दोन तहसिली इकडे तिकडे करून सीमारेषेत सुधारणा करण्याचा प्रश्न नसून हिंदुस्थानसाठी पूर्वीसारखा वायव्य सरहद्द प्रांत निर्माण करण्याचा तो खरा प्रश्न आहे. यासाठी चिनाब आणि सतलज या नद्यांमधील प्रदेश निवडणे अतिशय योग्य असे आहे. निदान कमीत कमी रावी आणि सतलज यामधील प्रदेश या हेतूने निवडण्यात यावा. याशिवाय दुसऱ्या कोणत्याही योजनेने हिंदुस्थानच्या सरहद्दीवरील संरक्षणफळी उभारता येणार नाही.' ⚜

**हप्ता तिसरा समाप्त. हप्ता चौथा पुढील अंकी**




## वर्गणी

◻ 'चित्र, वार्ता पुस्तक' ही पुरवणी महिन्यातून दोनदा, साप्ताहिक माणूस व्यतिरिक्त प्रसिद्ध होईल.

◻ या पुरवणीची वार्षिक वर्गणी रुपये पंचवीस वेगळी पाठवावी.

◻ साप्ताहिक माणूस वर्गणीदारांसाठी पाक्षिक पुरवणी वर्गणीत वीस टक्के सवलत ठेवली आहे.

◻ म्हणजे साप्ताहिक माणूस वर्गणीदारांनी आपला वर्गणीक्रमांक कळवून फक्त वीस रुपये चित्र, वार्ता, पुस्तक पुरवणी वार्षिक वर्गणीप्रीत्यर्थ पाठवावेत.

—व्यवस्थापक

## डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या कथा

पृष्ठ १९ वरून

उबळी येणार नाहीत ? येणार. स्वर्ग आढयाप्रमाणे घाणेरडा होणार, तरी देव हे धुराडे का मोडीत नाहीत ? बाबाला विचारले पाहिजे. खरे म्हणजे भगवान श्रीकृष्णाजवळ गदाचक्र आहे, प्रभु रामचद्राजवळ धनुष्यबाण आहे, शकराजवळ त्रिशूळ आहे, इद्राजवळ वज्र आहे तरी ते स्वर्गाला खराब करणारे धुराडे मोडून का टाकत नाहीत ? की धूर तिथपर्यंत जातच नाही ? परंतु स्वर्गातून पृथ्वीवर येताना नक्कीच त्रासदायक होत असेल ?...तरी देव हे धुराडे का ठेवत आहेत...का ?

तो झपाझप चालला होता. पडलेल्या प्रश्नाचे उत्तर शोधीत होता. उत्तर सापडत नव्हते. तरी मजा वाटत होती. तो सडकेवर आला. दिव्याकडे जाऊ लागला. सडकेच्या पलीकडे एक तळे होते. त्याच्या पलीकडे झाडेझाडोऱ्याने भरलेले मोठे थोरले मैदान होते. पलीकडे आंब फणसाची, ताडमाडाची, सुपारीची झाडे होती. आणि तिथेच काही बुटकी घरे होती. मद काळोखात घराच्या खिडक्या दारातून पडलेला उजेड– खिडक्या दाराना प्रकाशाच्या चौकटी ठोकून दिल्याप्रमाणे वाटत होता.

तो दिव्याजवळ गेला. दिव्याच्या खाबाला टेकून उभा राहीला आणि एकाएकी भोवतालची सुनाटी त्याला जाणवू लागली. आजूबाजूला कोणी माणूस दिसत नव्हते. दूर दोन रस्त्याच्या नाक्यावर एक गुत्ता दिसत होता. त्याच्यापुढे पेट्रोमॅक्सची बत्ती जळत होती. तिच्या उजेडात जमिनीवर काही माणसे टोळचा टोळयाने बसली होती. एक टोळी दूर बसली होती. ते कोण असावेत ? लंगोटीवाले ?

तसे त्याचे मन बेचैन झाले. आणि म्हणून त्याने पटकन बगलेतून पुस्तक काढून उघडले. तो एक-दोन ओळी वाचतो नाही तोच त्याच्या पाठीमागून पायरव ऐकू येऊ लागला. त्याने मागे वळून पाहिले. एक उंच गोरापान हडकुळा, डोक्यावर पगडी, हातात काठी असलेला माणूस येताना दिसू लागला.

कोण चित्याचा बाप ? दारूडा. त्याला वर्गात मुद्दाम धक्का दिला म्हणून गोधळ उडवून देणारा. थेट प्रिन्सिपॉलपर्यंत घेवून जाणारा. त्याचा बाप. तो दारूडा. येवू दे.

भिवा सावध झाला. त्याने मनाशी ठरवून टाकले होते. त्याला जवळ येऊ द्यायचे. बोलू द्यायचे. अन अगावर आला की अशी हूल द्यायची की कोसळलाच पाहिजे. हडकूळा तर आहे. दारूडा तर आहे. लवकर उठणारच नाही.

त्याचे वाचनावरील लक्ष उडाले होते आणि आजचे शाळेतील भाडण आठवत होते. चित्या हडकूळा, रडवा, किरकिरा. अभ्यासातही जेमतेम. पण त्याचा तो द्वेष करायचा. महार म्हणायचा शिवू नको म्हणायचा. काल मुद्दाम धक्का दिला तसा तो कोसळला. पडल्या पडल्या रडू ओरडू लागला. भिव्या महाराने मला मारले. पाडले. पोर गोळा होऊ लागली पण अगावर कोणी आले नाही. प्रिन्सिपॉलकडे त्याला जायला सांगू लागली. तसा तो अधिकच ढोग करू लागला. त्याला पोरानीच प्रिन्सिपॉलकडे नेले, सागितले. प्रिन्सिपॉल फादर यांनी बोलवून घेतले. त्यांच्याशी इंग्रजीत बोलताच ते खूष झाले. त्यांना सर्व सागितले. तसे ते पोरावर रागवले. सर्वांना जायला सांगितले. अन त्याला समजावीत म्हणाले, 'अभ्यास कर. खूप शिक.' जरूरीचे आहे. . फादर असे का म्हणाले.. ?

तो विचार करीत असताना तो उचेला माणूस गाणे गुणगुणत पुढे गेला. तो गुत्याकडे चाललाय हे भिवाला माहीत होते तो त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघत होता. अन् बघता बघता त्याला एकदम पोरके पोरके वाटू लागले अत करणात दु:खाचे कढ उठू लागले. उदास वाटू लागले. दु:ख देणाऱ्या शाळेत जावू नये. ती त्रास देणारी, दूर ठेवणारी पोरे पाहू नयेत. लगोटीवाले बरे. सर्वांशी गोडी करून घेवू. खूप खेळू. मॅची घेऊ. कॅप्टन मीच. जिंकून दावू....

हा विचार त्याला एवढा आवडला की तो झटकन तडक चाळीच्या दिशेने चालू लागला. चालता चालता त्याला वडिलाची आठवण झाली. त्याची पूजेची वेळ होऊन गेलेली आहे. ते वाट बघत असतील. शोधीत असतील. रागवतील. खेद करीत बसले असतील. आत्या काळजी करीत दारात येऊन बसली असेल. दादा पोराना विचारीत असेल. अन् ती...सावत्र आईची आठवण येताच त्याला तिची चीड आली तशी तो पळू लागला. अधार तुडवीत चाळ जवळ करू लागला. चाळीजवळ आला. खोलीजवळ आला.

दार उघडेच होते. वडील पुजेला उभे होते. आत्या दाराजवळ बसलेली होती. तो आत शिरला. तशी आत्या ओरडली.

'लेका, गेला व्हतास कुठं,' सुभेदार गरकन वळले. पुजेला मन लागतच नव्हते. त्याचे धुळीचे-पाय, घामेजलेले कपाळ, उतरलेले तोड पाहून त्यांना प्रथम वाईट वाटले. नतर राग आला. रागाने त्याच्याकडे बघत ते कठोर आवाजात म्हणाले,

'कुठं गेला होतास ? मी शोधले. दादा पाहून आला ? कुठे होतास ?'

आपल्यासाठी सर्वांना त्रास झाला. पुजा खोळंबली. जेवणाला उशीर झाला म्हणून तो खजिल झाला होता. खाली मान घालून उभा होता.

भाच्याचा तो आवतार, खाली मान घालून उभे राहणे, फुगलेले गाल, आणि डोळे पाखडीत खाली बघणे बघून बयोला ढगाएवढे मोठे गोडगोड हसू आले. ती हासऱ्या आवाजाने मोठया प्रेमाने म्हणाली,

'इकडे ये बाळा,' बहिणीच्या शब्दातून लोढयाप्रमाणे उचंबळून आलेल्या प्रेमवात्सल्याने सवध घर भरून गेले. सुभेदाराचा ओढून ताणून चेहऱ्यावर बसवून ठेवलेला राग कुठच्या कुठे गेला. त्याना बहिणीप्रमाणेच हसावेसे वाटू लागले. भिवा आता मोठा मनोहर दिसत होता. पण हसून उपयोग होणार नव्हता. त्यामुळे तो थोडावेळ शाळा सोडून बसेल. म्हणून ते खोटया रागाने म्हणाले,

'पाय एवढ धुळीने का भरलेत ?'

'पळत आलो.'

'का ? मारामारी केली ?'

'नाही'

'खेळ रंगला होता ?'

'नाही. खेळायला गेलो होतो. पण पोरे भाडणं घरी आणतात म्हणून खेळायला गेलो नाही... सर्वच वेडी, अज्ञानी.'

'कोण ?'

'ही आणि ती शाळेतली.'

'शाळेतला. चित्या...?'

'हं. मला महार म्हणून चिडवणारा. आज धक्का देऊन पाडला. रडायला लागला.'

'मग ?'

'प्रिन्सिपॉलकडे नेले. प्रिन्सिपॉल त्यांच्यावर रागावले. मला म्हणाले, शिक, जरूरी आहे.'

'बघ. बयो. मी म्हंतो तसंच तो साहेब पण बोलला... का बोलला... ?' सुभेदार आनंदित होऊन गेले. लेकाकडे कौतुकाने बघत, प्रेमळपणाने म्हणाले,

'जा; हात तोंड धू...' भिवा न्हाणीकडे जावू लागला. तसे सुभेदार म्हणाले,

'ते बगलेत काय आहे ?'

'नेपोलियन.'

'सर्वांना भारी ठरणारा नेपोलियन तुझ्या काखेत... बघ बाई...' अन सुभेदार हसू लागले. चितेच्या आणि काळजीच्या भाराने अवघडून गेलेले घर, मने मोकळी झाली. आरती पुन: सुरू झाली. भिवासाठीच त्याच्या भल्यासाठीच ती केली जात होती. भिवा हाततोंड धुवून हात जोडून आरतीला उभा होता. सुभेदारांचा आवाज मोठा मधूर होवून येत होता.

# वर्ग



सुभेदारांची तब्येत ठीक नव्हती. शाळा सुरू झाल्यापासून ते अजून एकदाही भिवाच्या क्लास टीचरला, प्रिन्सिपॉलना भेटून आले नव्हते. भिवा पास झाला. पाचव्या वर्गात गेला. अभ्यास सुरू झाला. तरी शिक्षकांना न भेटणे त्यांचा अपमान करण्यासारखे आहे. त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. नमस्कार करून आले पाहिजे. गुरुदक्षिणा देता येत नाही तेव्हा एवढे तरी पालक म्हणून केले पाहिजे.

भिवाचे जेवण चालले होते. तो शाळेत निघाला म्हणजे त्याच्याबरोबर आपणही निघावे. भेटून यावे. अंथरुणावर पडून राहिले तर थंडीताप सोकावतो. अंथरुणावर खिळवून टाकतो. तेव्हा जरा फिरून यावे. आपण पहिल्याच दिवशी का आलो नाही हे सांगता येईल. चेहरा बघून सर्वांना खरेही वाटेल.

भिवा जेवून बाहेर आला तसे अंथरुणावर उठून बसलेले सुभेदार म्हणाले,

'भिवा, मी तुझ्याबरोबर येऊ काय ? प्रिन्सिपॉल साहेबांचे आभार मानीन. सरांना तुझ्यावर लक्ष द्यायला सांगेन....'

'वरं वाटल्यावर या. सरांनी तसं सांगितलेलं नाही...बये जातो.'

आत्या त्याच्याकडे बघत होती. नव्या कपड्यात तो मोठा नी रुबाबदार दिसत होता. उंच बळकट झाल्यासारखा वाटत होता. त्याचा रुबाब, प्रसन्नपणा पाहून तिच्या मनात नेहमी डोकावणारा विचार डोकावला. तिला वाटले, भिवाचे लग्न करण्याचे वय झालेय. त्याचे लग्न करून टाकले पाहिजे. दादाची तब्येत पण अलीकडे ठीक नसते. लग्न झाले म्हणजे दोघंही मोकळे. कपाळाला बाशिंग, अंगाला हळद अन् डोळयात काळज घातलेला, देखणा रुबाबदार भिवा तिच्या डोळ्यापुढे येऊ लागला. तरी तिला सुखा एवढे सुंदर आणि समृद्ध हासू आले. तिचे ते छान हासे पाहून सुभेदारही प्रसन्नपणे हसून लेकाकडे कौतुकाने बघत, कौतुकाने म्हणाले,

'बये, बध, तुझ्या रुबाबावर खुश झालीय. हासतेय बघ कशी छान...'

भिवाने आत्येकडे पाहिले. तिच्या चेहऱ्यावर उमटलेले भाव सूर्योदयाआधी आकाश दिसते तसे त्याला वाटले. तो खुप झाला गोड गोड हसत म्हणाला,

'जातो बये,'

'पोटभर जेवलास ना...'

'हो.'

'जपून जा रस्त्यावर, गाडीत भाडण तटा काढू नको. जावा जपून ये.' भिवा खोलीबाहेर पडला. ती दोघेही भावडे त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघत होती हे भिवाला माहित होते. तो त्याच्या दृष्टीआड झाल्या बरोबर त्याने पिशवी खाद्यात अडकवली. ऑलीव्हर ट्विस्ट काढले अन् तो रस्त्याने वाचीत जाऊ लागला. वडील नेहमीच रस्त्याने वाचीत चालू नको असे सागायचे. म्हणून त्याने एवढी दक्षता घेतली होती. तो वाचीत काही पाऊले गेला नाही तोच त्याच्या कानावर हाक आली,

'भिवा, मॅच आली...परेलची.'

'कोण ते? ते मागे भाडण करून गेले ते?

'हां.'

'मग घेऊन टाकू. चोपून काढू.

'मग घेयाची?'

'तर.'

'मग लेटर लिहून ठेव. दुपारी सुटीत शाळेवर येतो.'

'ये. प्रॅक्टीस करू आजपासून.'

'जिकूच.'

'तर.' भिवा पुढे झाला. आज मजा होती. जेवण चागले झाले होते. पुस्तके वह्या नव्या होत्या. अगावर नवा पोषाख होता. घरात पास झाल्याबद्दल वडिलानी सूट शिवून दिला होता. आज आनदी आनद होता. भिवा आनंदानेच गाडीत बसला आनदातच शाळेत शिरला. प्रिन्सिपॉल दारातच उभे होते. त्याला बघताच त्यानी त्याचे अभिनंदन केले. त्याच्या पाठीवर शाबासकीची थाप मारून त्यानीही त्याला वर्गात जायला सागितले. प्रार्थनेची वेळ आता होणार होतीच

तो वर्गात आला आणि त्याला बघताच वर्गात कोरडेपणा, तटस्थपणा आला. बाकाच्याकडेला बसलेली पोरे आत सरकू लागली. त्याच्याकडे बघू लागली. पुढे बसण्याची त्याची योग्यता असूनही त्याला बसायला तिथे जागा नव्हती. तो मागे गेला. बाकावर बसला तो बाकावर एकटाच होता. फ्रान्सिस परेरा देखील आज पुढे बसला होता.

'हल्लो, परेरा हाव आर यू?' त्याने परेराला विचारले. परेरा कोरडेपणाने म्हणाला, 'ओ. के.'

परेराचा कोरडेपणा त्याच्या अत करणावर अघात करून गेला. तोही कोरडा होऊ लागला. आतमध्ये दु ख वेदनेसारखे, चीड सतापासारखे काही तरी उत्पन्न होऊ लागले. त्यामुळे मनाची प्रसन्नता नाहीशी होवू लागली. घरी किती कौतुक. किती प्रेम. त्याच्या टोळीतील पोरे त्याच्यापुढे नम्र. विरोधी पोरे वचकून. तो शिकलेला म्हणून. तो चांगला खेळतो आणि चिडला म्हणजे चागले रट्टे देतो म्हणूनही. अन इथे सर्व दूर होतात. बोलण्याचे, जवळ येण्याचे टाळतात. तो बघत होता. सर्व पोरे एकमेकाशी बोलत होती. मागल्याशी, पुढल्याशी, जवळ बसलेल्याशी. पण त्याची कोणीच दाद घेत नव्हते. का? तो मूर्ख आहे? तो वाईट आहे? त्याच्या अगावर चागला पोषाख नाही? मग का?...महार! महार म्हणजे काय? कसा असतो? वाघासारखा. सापासारखा. झुरळासारखा...?

त्याच्या मनात विचाराची, राग–संतापाच्या दुःख चिडीच्या भावनांची गर्दी उसळली होती. तो आपल्याच नादात होता आणि त्याचा तो गंभीर विचारमग्न चेहरा पाहून पोरे एकमेकाला खुणावित होती. त्याच्याकडे बघायला सांगत होती. हसत होती व जाती अहकाराची व परजातीबद्दल तुच्छतेची जाणीव तीव्र असलेल्या पोराने बसायला आणि भिवाने त्याच्याकडे बघायला एकच गाठ झाली. त्याचे कुत्सितपूर्ण हसू पाहून भिवाच्या अगाची लाही झाली. तो बेभान होऊन त्या पोराला मारायला आवेषाने उठला आणि नेमकी त्याच वेळी प्रार्थनेची वेळ झाली. सबध वर्गच उठून उभा राहिला. सर्वांच्या पाठी त्याच्याकडे झाल्या. सर्व पाठी शात होत्या. निर्विकार होत्या. सारख्या दिसत होत्या त्या भावशून्य पाठी आणि प्रार्थनेचे सूर त्याचा त्याच्या मनावर असा परिणाम होवू लागला की, याचा आवेष कोसळू लागला. त्याला थकल्यासारखे, पोरके पोरके, एकटे एकटे वाटू लागले. मन निरस होऊ लागले. शाळेतून, वर्गातून बाहेर पडावेसे वाटू लागले.

प्रार्थना चालूच होती. शब्द, सूर बदलत होते. अन् भिवाच्या मनातही वादळ खळबळत होते.

. प्रार्थना सपली. मुले खाली बसली तसे वर्गशिक्षक जोशी वर्गात आले. मुले उठून उभी राहिली. सरानी बसायला सागताच ती बसली. शिक्षक भूमितीचा नवा पाठ शिकवू लागले. मुले मन लावून ऐकत होती. पण काही शब्द असे होते की, ते अपरिचित असल्यामुळे समजत नव्हते. त्यामुळे डोक्यात शिरत नव्हते

भिवा ऐकत होता. ऐकता ऐकता त्याला बरे वाटू लागले. आतले वादळ, हुरहूर विरू लागली. शांतता मिळू लागली. गुण देणारे औषध घ्यावे. लवकर बरे व्हावे असे वाटल्यावर माणूस औषध ज्या भावनेने घेतो त्याप्रमाणे भिवाचे मन सराचे प्रत्येक वाक्य उचलीत होते. आतल्या बेचैनीवर, रागसतापावर, दुःखवेदनेवर लावीत होते. त्याला बरे वाटत होते. त्यामुळे आतले कोणीतरी सरांचा शब्दनशब्द पुटपुटत होते, ते सिद्ध करीत असलेल्या प्रमेयाला प्रश्न विचारीत होते. आणि उत्तर शोधून काढीत होते. उत्तर शोधताना बुद्धीला पडणारा ताण त्याला खूप सुखद वाटत होता. आनद देत होता. फळ्यावर जोशी सर आकृती काढीत असतानाच आतले कोणीतरी ती आकृती आधीच पुरी करत होते अन आतल्या प्रमाणेच सरानी काढलेली आकृती जमत होती. पटकन पाठ होवून जात होती. स्मरणात अढळ होवून बसत होती जोशी सर बोलत होते. कृत्य करीत होते.

सर बोलता बोलता थांबले. आणि मुलाकडे बघत म्हणाले,

'पुन. एकदा मी आता सागितलेले प्रमेय, सिद्धांत, रचना समजावून सागतो, मी सागत असताना प्रश्न विचारा.' सर सागू लागले. प्रश्न विचारायला विद्यार्थ्यांना सधी देण्यासाठी थाबत होते. विद्यार्थी प्रश्न विचारीत होते उत्तरे देत, समजावीत सरानी शिकवणे थाबवले आणि ते काही काळ थावून सर्व वर्गाकडे बघत म्हणाले,

'मी फळ्यावरले पुसतो आहे. तुम्ही मात्र डोक्यातले पुसू नका.' सरानी फळा पुसून काळा कुळकुळीत केला. तशी काही मुलांच्या मनात पोकळी निर्माण झाली. त्यामुळे ती घाबरून गेली आणि असे ते घाबरून गेले असतानाच सरानी विचारले,

'मी जे प्रमेय सागितले ते कोणी पुरे करून दाखविल काय...? भिवाने पटकन हात वर केला. शेवटच्या बाकावरला, महाराचा मुलगा हात वर करतोय याचे जोशी सराना आश्चर्य वाटले. आणि त्यांची इच्छा नसतानाही त्याकडे दुर्लक्ष करून जोशी सर पुढे बसलेल्या मुलांची नावे घेवून त्याना प्रश्न विचारू लागले. भिवाला वाईट वाटले. त्याने हात वर केला होता. अजून खाली घेतला नव्हता.

तरी सर त्याला विचारीत नव्हते. फुटकी, तुटकी, अपुरी उत्तरे ऐकत होते. भिवाला राहवले नाही तो उठून उभा राहिला आणि म्हणाला,

'सर',

'बोला आबेडकर'

'मी सांगतो...'

'तुम्ही ? अन् शेवटच्या बाकावर बसून ?'

'होय सर...प्रिन्सिपॉल यांना सागूनही ते मला माझ्या नंबरावर नेत नाहीत. नेऊ शकत नाही...'

'का ?'

'या वर्गाला तसे वाटते म्हणून...' भिवाने वर्गावर डोळे फिरविले. त्याचा आवाज तीव्र झालेला होता. अन डोळ्यात मात्र राग होता.

'असं. मी नवा आहे. प्रिन्सिपॉल साहेबांना विचारतो. बोल.'

सरानी जे सागितले होते ते भिवा त्याच्या शब्दात सांगू लागला. त्याची ग्रहणशक्ती बघून सर चकीत झाले. थक्क होवून त्याच्याकडे बघू लागले. तो अडखळत नव्हता. चुकत नव्हता. घडघडा बोलत होता. त्याचे ते पाठ केल्याप्रमाणे बोलणे पाहून जोशी सराना शंका आली. ते त्याला थाबवून म्हणाले,

'तू पाठ करून आलास ?'

'नाही.'

'तुला घरी कोणी शिकवतेय...वडील काय करतात? कुठे राहतोस ?'

'डवक चाळीत राहतो. वडील मिलटरीत होते. कधी शिकवतात. कधी नाही.'

'इकडे ये. हा खडू घे... फळयावर काढून दाखव...'

'सर...' पुढल्या बाकावरील काही हात वर झाले तसे मागच्या बाकावरीलही अनेक हात वर झाले. अनेक आवाज उठले. अनेकांचे चेहरे भयभीत झाले. सतापले. चिंताग्रस्त झाले. सबध वर्गात भयबेचैनीची आलेली लाट, मुलाच्या चेहऱ्यावर उमटलेले भयाचे, चिंतेचे राग–संतापाचे भाव पाहून मास्तर आवाक झाले. त्यानी पुढील मुलाला विचारले,

'तू हात वर का केलास ?'

'त्याला थाबवा.'

'त्याला थाबवा.' अनेक भयभीत आवाज उठले.

'हात खाली करा. गप्प बसा. नाहीतर प्रत्येकाला दंड करीन. वर्गाबाहेर काढीन.' जोशी सराना वाटले, ही मुले त्याच्या बुद्धिमत्तेवर जळत आहेत. त्याच्याशी वैर धरून आहेत. म्हणूनच त्यानी त्याला ८ मुलांत ढकलून दिले आहे. मागे डावून, जखडून टाकले आहे. हा अन्याय आहे. आणि जोशी सर सतापले. आवाज चढवून ते ओरडले,

'सर्व शात बसा...'

'सर...'

पुन: अनेक आवाज उठले.

'काय ?' सर सतापून म्हणाले. त्यांनी सर्वांना शिक्षा करण्याचे पक्के केले होते.

'त्याला फळयाकडे बोलवू नका.'

'का ? त्याची हुशारी सहन होत नाही ?'

'तो महार आहे... अनेक आवाज बिचकत बिचकत उठले.

'महार ?' आबेडकर, होय ?'

'होय. महार म्हणजे काय सर... ?'

'खाली बस'

'बसू ?' त्याने विचारले. सराना काय उत्तर द्यावे हे क्षणभर कळेना. ते व्याकूळ होऊन भिवाकडे बघू लागले. त्याच्या मनात विचार येऊ लागले. मी कोण ? शिक्षक की जातीने ब्राह्मण ? ब्राह्मण आहे तर ग्रथ, स्मृती, शास्त्रे काय म्हणतात ? शुद्राला एक मुखाने विरोध का करतात ? उगीचच ? कोणीच कसे शुद्राच्या बाजूने नाही ? का नाही ?... ब्राह्मण आणि क्षत्रियाशिवाय इतराचा या ग्रथांनी विचार का केला नाही ? ते हिंदू नाहीत ? भारतीय नाहीत ? ती माणसे नाहीत ?...

आणि यातून फायदा काय झाला. देश हारला. धर्म हारला. सर्वांपुढे जे आक्रमक येतील त्याच्यापुढे. आणि आता तर परतत्र आहे. ते अशा विरोधाने, आत्मपुजेने मिळेल ? समृद्धी अशा शक्तीच्या संहाराने मिळेल,

'आबेडकर... पुढे या... सागा.'

'सर...'

ज्यांना ऐकायचं नाही त्यांनी वर्गाबाहेर पडा......' सराचा रुद्रावतार पाहून मुले घाबरून गेली. तरी एक मुलगा उभा राहिला.

'माझ फराळाच फळयामागे आहे. ते घेण्याची परवानगी द्या.'

'घे.' सर वैतागून म्हणाले. तशी सर्व मुले पटापट उठू लागली. बाके लोटून, रेटारेटी करीत फराळाचे घेऊ लागली. बाकावर येवून बसताना बाकाच्या टोकापासून दूर सरकून बसू लागली. सर्वच धास्तावले, अस्वस्थ झालेले होते.

त्याची ती भित्री धडपड, त्याचा तो दुर्बळ भ्याड रागसताप, त्याचे स्पर्श होऊ नये म्हणून सरकून बसणे, भिवाच्या आत काहीतरी जळत होते. वेदना देत होते रडघासारखे अत:करण भर पसरत होते. चीड येत होती. वैताग येत होता. उदास उदास वाटत होते. मारामारी करावी असे वाटत होते. गोष्टीतल्या राक्षसासारखे डोगराएवढे व्हावेसे वाटत होते. सारखे काहीतरी आत घडत होते. एक पडत होते. एक जडत होते.

'या...ससे एकमेकाला बिलगून बसलेत. या. तुम्ही वाघ अहात. वाघासारखे या...'

उदास व्याकुळ झालेला भिवा पुढे येऊ लागला. बाकाचा आधार घेण्यासाठी हात उताविळ होत होते पण हात आधारासाठीही बाकाला टेकता येत नव्हते. जखडल्यासारखे, बाधल्यासारखे वाटत होते. तो अवघडल्या अगाने हळू हळू पुढे आला. बाकाजवळ गेला. खडू हातात घेवून त्याने वर्गाकडे तोंड केले. सर्व मुलाकडे पाहिले. आणि त्याच्या व्याकूळ अंत करणातून गहिवर घेऊन शब्द बाहेर पडले...

'नाऊ, लिसन मी... लिटल बॉईज...'

'भिवा बोलत होता. फळयावर लिहीत होता. समजावित होता. आणि सर विचार करीत होते त्याना त्याने सुरुवातीला उच्चारलेले शब्द मोठे विलक्षण वाटत होते या शब्दाची जुळणी अशी कशी झाली. नाऊ आणि लिटलबॉईज हे शब्द कसे आले. कोणी सागितले.

सर विचार करीत होते. भिवा बोलत होता आणि मुले निर्विकार होऊन ऐकत होती. त्याना राग नव्हता. द्वेष नव्हता. लोभ नव्हता. फक्त वडिलानी जे सागितले होते त्याप्रमाणे ते वागले होते. याचेच त्याना समाधान वाटत होते,

# पाक्षिक भविष्य

## कृष्ण माईणकर

**दि. १६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट १९७३**

### भारतात यादवी संघर्षाचा उदय

भारताच्या मकर राशीच्या आठव्या स्थानी राजकारणी तत्त्वाचा ग्रह रवि दि. १६ ऑगस्टला प्रविष्ट झाला आहे. सिंह राशीतील त्याचे हे आगमन राजकीयदृष्टया बरेच खळबळ उडवून देणारे ठरावे. सत्तारूढ कॉंग्रेस पक्षातील अनेक राज्यांचे मुख्यमंत्री तात्पुरते स्थिर झाले असले तरी ते दारूच्या सुरुंगावर बसले आहेत याचा 'यादवी' प्रत्यय त्यांना येईल. पंतप्रधान इंदिरा गांधी, बाबू जगजीवनराम, सी. सुब्रह्मण्यम, ललित नारायण मिश्र, या केंद्रीय नेत्यात–मंत्र्यात एकमेकांविरुद्ध धुसफूस चालू होईल. राष्ट्रपती गिरी सत्तारूढ पक्षाचे जास्ती विरोधक बनतील. इंदिरा गांधींबरोबर त्यांची चकमकदेखील उडण्याची शक्यता दृष्टिआड करता येणार नाही. कामराज, मोरारजी देसाई व अशोक मेहता यांना महत्त्व प्राप्त होणार आहे. स. का. पाटील यांच्या सहकार्याची गरज भासू लागेल. कम्युनिस्ट पक्ष कॉंग्रेस पासून दूर जाईल. मूळ कॉंग्रेसची कुंडली ही कन्याचंद्राची असल्यामुळे या संघर्षातूनही ती टिकाव धरू शकेल. संघटना कॉंग्रेसला थोडे जीवदान मिळेल. जनसंघाला उग्र टीकेतून जावे लागले तरी त्याचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट यावेळी धनू चंद्राच्या वाजपेयींना कर्तबगारीचे योग आहेत. महाराष्ट्र राज्याच्या बाबतीत लिहायचे झाले तर शासनात पुरोगामी जनतानुकुल असे बदल होण्याची शक्यता वाटते. मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना पुनश्च जाणवण्याइतका विरोध होईल. पण त्यांच्या स्थानाला धक्का पोचणार नाही. महाराष्ट्राच्या कॉंग्रेस संघटनेत मात्र भांडणाला ऊत येईल. अन्नधान्याच्या दृष्टीने थोडीफार सुधारणेची आशा आहे. ◻

**मेष** : यशदायी घोडदौड

हा पंधरवडा आपल्या जीवनात यश आणि सफलता याचे लेणे घेऊन उगवणार आहे. आजच रवि पाचवा स्वगृही प्रविष्ट झाला आणि रवि मंगळाचा नवपंचम हा असामान्य योग तुमच्या जीवनात घडून आला आहे. हा एकटा नवपंचम योगदेखील तुमच्या साऱ्या महत्त्वाकांक्षा आणि भावी योजनांचे आराखडे पुरे करायला समर्थ आहे. दि. २३ ऑगस्ट रोजी होणाऱ्या शुक्र-प्ल्यूटो युतीपासूनच अनेक लाभ तुमच्या पदरात पडून जातील. दि. १६ ते २०, दि. २२ ते २५ व दि. २७ ते ३१ या काळाची विशेष दखल घ्या. या वेळी नोकरी नसणाऱ्यांची वणवण थांबणार आहे. प्रतिष्ठा मिळवून देणारी नोकरी मिळालेली असेल. चालू नोकरीचे स्थान बदलेल. दर्जा व उत्पन्न वाढेल. स्टेशनरी, जमिनीची खरेदी विक्री, औषधे, खते शेतीमाल, प्रकाशन यात प्रगती होईल. हे धंदे करणारे लोक भरभराटीला येतील. टीकात्मक व विश्लेषणात्मक लेखन करणाऱ्यांना चांगलीच लोकप्रियता लाभेल. आर्थिक प्रश्न दुसऱ्या आठवड्यात सुटेल. पैसे मिळवण्याचे सारे प्रयत्न यशस्वी होतील. उद्योग व्यापारासाठी कर्ज मिळू शकेल. लघु उद्योगाला सहाय्य मिळू शकेल. राजकारणातील माघार तर थांबेलच पण या राशीच्या अनेक नेत्यांना महत्त्वाचे स्थान प्राप्त होणार आहे. **महिलांस** : अनेक बाबतीत आजवर अपुरी राहिलेली स्वप्ने यावेळी सफल होतील. उपासनेत मन रमेल. ◻

**वृषभ** : संयमाची कसोटी

बारावा मंगळ व चौथा रवि हे दोन समर्थ ग्रह तुम्हाला फारसे अनुकूल नाहीत. रवि आणि मंगळ प्रतिकूल असले की त्यांच्याशी झटापट वा तंटा करून उपयोगी नाही. याचा अर्थ आपण यापुढे मन शांत व डोके थंड ठेवून काम करणे आवश्यक आहे. भाग्यस्थ गुरु व दि. २३ ची शुक्र प्ल्यूटो युती तुमचे स्थान घसरू देणार नाही. प्रत्यक्ष कोणतेही नुकसान होऊ देणार नाही. बोलणे व वागणे कौशल्याने ठेवलेत तर हेही दिवस जातील. प्रामुख्याने दि. ११ नंतर विरोध व अडचणीतून मार्ग काढावा लागेल. अंतीम यश तुमचेच आहे. पण या सव्यापसव्यातून जावेच लागेल. कलाक्षेत्रात तुमची स्वतःची जवळ जवळ मक्तेदारी होती तिला स्पर्धक निर्माण होण्याची शक्यता आहे. पण तुमचे स्थान त्याला मिळणार नाही. तुमच्या व्यवसायात आजवर तुमच्याशी स्नेहाच्या भावनेने वागणारा एखादा तुमचा सहकारी 'परवश' होऊन तुमच्याविरुद्ध वा स्पर्धा करणारा उद्योग सुरू करील. असे काही असले तरी हा पंधरवडा तब्येतीच्या दृष्टीने सुधारणा करणारा आहे. नोकरीत फारसे चांगले काही घडले नाही तरी आहे त्या परिस्थितीत काही वाईट घडणार नाही. वरिष्ठाची कचकच थोडीफार राहील. पण तुमच्या वाचून त्याचे जमणार नाही. पैसा कमी पडणार नाही. प्रतिष्ठेला तडा जाणार नाही. खर्चासाठी कुणाकडे उसने मागावे लागणार नाही हेही नसे थोडके. **महिलांस** : गुरु महाराज अनुकूल आहेत. त्यामुळे काही उणीव भासणार नाही. व्रतवैकल्ये व दानधर्म यात उणेपणा राहाणार नाही. नोकरी करणाऱ्यांना ठीक.

## मिथुन : धाडसी बनाल

तुमच्या चद्राच्या मदतीला शनि आल्यापासून खरे म्हणजे तुमचे सारे तत्र व कर्तृत्व बदलले आहे. साडेसाती असली तरी बाराव्या शनीने जेवढे तुम्हाला भोगायला लावले तेवढे हा शनि लावणार नाही. उलट हा तुम्हाला बऱ्याच प्रमाणात मदतच करील आणि त्याचा प्रत्यय याच पधरवड्यापासून येऊ लागेल. रवि बदलला आहे व त्याचे पराक्रमातील उच्च सामर्थ्य तुम्हाला प्राप्त होणार आहे. अनेक क्षेत्रात आता एखाद्या सेनापतीप्रमाणे तुमचा प्रवेश होणार आहे. महत्त्वाकाक्षेची सफलता दृष्टिपथात येणार आहे. कर्तबगारीची नवनवीन क्षेत्रे पादाक्रात करण्याची जिद्द तुमच्यात रवि व मगळ निर्माण करणार असून त्यात यशही मिळणार आहे. तुम्ही लेखक असाल तर तुम्हाला यावेळी फार मोठी मागणी येणार असून ती पुरी कशी करावी हाच प्रश्न तुमच्यापुढे उभा राहील. अपुरे लिखाण पुरे होईल. लेखणीला धार चढेल. या राशीच्या नाटककाराचे एखादे नाटक फार गाजेल. पहिल्या प्रसिद्धीतच मोठे यश पदरात पडेल. नोकरीत बदली होईल. नव्या ठिकाणी तुमच्या कर्तृत्वाला आव्हान मिळणारे क्षेत्र लाभेल व ते तुम्ही यशस्वी कराल. इजिनियर, सशोधक, पत्रकार, प्रकाशक, प्रेसवाले यांना हा काळ उत्तम जावा. राजकारणात अगर शासनात या राशीचे लोक असतील तर त्याना लोकप्रियता मिळणार आहे. त्यांच्यावर अनेकाचे लक्ष केंद्रित होणार आहे. आर्थिक परिस्थिती मात्र सर्वसाधारणच राहील. पैसा हाती टिकणे कठीण आहे. **महिलांस** : सार्वजनिक कार्यात मानाचे योग येतील. बुद्धीच्या प्रभावाने अनेक बाबतीत शाबासकी मिळेल. उद्योगात प्रगती. ¤

## कर्क : खर्चावर बंधन हवे

आपण रसिक आहातच. पण त्याचबरोबर अतीव भावविवशता, विकारवशता, चंचलता आणि अविचार याचे दर्शनही तुमच्या स्वभावात होत असते. बारावा शनि व केतू सध्या तुमच्या राशीला लाभले आहेत याची जाणीव ठेवा व प्रामुख्याने खर्चावर पकड ठेवा. नाहीतर भलत्याच आपत्तीत सापडण्याची भीती आहे. या पंधरवड्यात कोणत्याही प्रकारचे लेखी करार, जामीन करार करू नका. गोड बोलून अथवा मित्रत्वाचे नाते सागून कोणत्याही प्रकारचा जामीन राहण्याची तुम्हाला भीड घालील तो नक्कीच तुम्हाला 'टाग' मारील याची कटाक्षाने जाणीव ठेवा. गुरु तुमचे सरक्षण करायला समर्थ आहेच. तरीपण तुम्ही सावध राहावे हे उत्तम. यावेळी पत्नीच्या मार्गदर्शनाने वागणे जास्त हिताचे ठरेल. दि. २१ रोजी होणाऱ्या शुक्र-प्ल्यूटो युतीपासून नोकरी व उद्योग या क्षेत्रात अनेक प्रगतीच्या वाटा दिसायला लागतील. मागे केलेल्या प्रयत्नाचे फलित दृष्टिपथात येऊ लागेल. दि. १९ ते २४ या काळात सासुरवाडीकडील माणसाची येजा खर्चात भर टाकील. त्याचबरोबर नोकरीत शुभसूचक घटना घडू लागेल. गेले काही दिवस वडिलाची तुमच्यावर नाराजी आहे त्यात फरक पडेल. तुमचे हक्क तुम्हाला मिळतील. नोकरीत बदल मात्र करू नये. व्यापारात कुणाशीही भाडणे व कायद्याचे उल्लघन करणे त्रासदायक ठरेल. राजकारणात दि. २५ ते ३१ हा काळ विशेष प्रगतीचा जाईल. कार्याचे चीज होईल. एखादे महत्त्वाचे पद गळ्यात पडेल. मध्यस्थी करण्याची एखादी जबाबदारी स्वीकारावी लागेल. परदेशी जाण्याची सधी सरकारी शिष्टमंडळातून मिळेल. कलाक्षेत्रात-प्रामुख्याने सगीताच्या क्षेत्रात नव्या कलावताना प्रोत्साहन मिळेल. जुन्याच्या मैफली गाजतील. उपेक्षित अशा नाट्य-कलावताला मानाचे हारतुरे मिळतील. प्रगती करण्याची सधी चालून येईल. उपासकांची उपासना साध्य होईल. **महिलांस** : स्त्री-लेखिकांना चागला पैसा मिळेल. ससारात प्रेम व आनद लाभेल. आईची माया लाभेल. नोकरीत अनुकूल वातावरण. ¤

## सिंह : यशस्वी घोडदौड

या पंधरवड्यात अनेक क्षेत्रात चमकणाऱ्या ज्या राशी आहेत त्यात सिंह राशीला अग्रगण्य मिळणार आहे. अतरिक्षातील अनेक ग्रह तुम्हाला 'हवे ते मागा' असे सांगत आहेत भाग्यस्थानी मेषेत प्रविष्ट झालेला मंगळ, राशीतच चद्राबरोबर खेळीमेळीने वागायला आलेला रवि, अकरावा शनि एवढे बलाढ्य ग्रह तुम्हाला लाभलेले आहेत. ते विजयाची माळ तुम्ही संचार कराल त्या क्षेत्रात तुमच्या गळ्यात घालणार आहेत. तुमचा खरा धर्म राजकारणाचा. ते तुमच्या पाचवीला पुजलेले आहे. दि. १९ पासून तुमच्या राजकारणी वृत्तीला अनुकूल वातावरण लाभणार आहे. तुम्हाला नेतृत्व लाभणार आहे. यावेळी एखादी निवडणूक असेल तर यश तुमचेच आहे. सर्वसामान्याच्या दृष्टीने हा पधरवडा प्रगतीचा आहे. पैशाची टचाई कमी होईल. याआधी केलेल्या कामाचा मोबदला यावेळी हाती येईल. चार पैसे हाती खेळतील. अडून राहिलेली कामे वेग घेऊ लागतील. कागदाचा व्यापार तेजीत येईल. औषधी मालाला खूप मागणी येईल. खतकारखान्यात व इंजिनियरिंग उद्योगात काम करणाऱ्या लोकाना चांगलाच लाभ होईल. जागेचा किंवा घराचा प्रश्न त्रासाशिवाय सुटेल. दि. २४ ते ३० हा काळ उत्तम आहे. विशेष महत्त्वाचा आहे. या मुदतीत रेस, लॉटरी यात नशीब उघडेल. कोणत्याही प्रकारचा वायदेव्यवहार या मुदतीत तुम्हाला भरभराटीला पोचवील. नोकरीत अनपेक्षित पगारवाढ व बढती मिळेल. जमिनीचे व्यवहार, प्लॉट विक्री-खरेदी फायदा मिळवून देईल. कापड व्यापारात मात्र मदीचा तडाखा बसण्याची शक्यता आहे. एखाद्या नव्या उद्योगाची मुहूर्तमेढ यावेळी रोवली जाईल. उद्योगपती व धनिक याचा प्रभाव बराच वाढेल. उपासनेत मात्र अडथळे येतील. **महिलांस** : लहान प्रमाणात स्वतःचा व्यवसाय करणाऱ्या स्त्रियाना अनुकूलता लाभेल. श्रीमत लोकाची मदत होईल. ¤

## कन्या : अनपेक्षित अर्थलाभ

गेले अनेक दिवस तुमच्याभोवती प्रतिकूलतेचे वातावरण होते. निराशा आणि अपयश तुमच्या जीवनात थैमान घालीत आहे. पण ही सारी प्रतिकूलता आता इतिहासजमा होत असून तुमच्या बाबतीत प्रगतीचे नवे युग आता निर्माण होत आहे. प्रामुख्याने दि. २१ च्या शुक्र-प्ल्यूटो युतीपासून मनोरथ सफल होऊ लागतील. रवी जरी बारावा असला तरी शनी व मगळ छान आहेत. आठवा मगळ प्रतिकूल असतो असा गैरसमज कृपया करून घेऊ नका. या मगळाला तर स्थान व रास यादृष्टीने असामान्य महत्व आहे.

रक्तदाब, पित्त व उष्णविकार यांचा त्रास ज्या लोकांना अजिबात नसेल त्यांना हा मगळ वरदानच ठरेल. गेले अनेक दिवस शारिरीक दुर्बलता व मानसिक कमकुवतपणा यामुळे तुम्ही भीतिग्रस्त होतात त्यात नेत्र-दीपक असा बदल होईल. दि. २१ ते २७ या काळात अर्थप्राप्तीच्या दृष्टीने अतिशय अनुकूल आहे वारसदारीत पैसा व स्थावर मिळकत मिळेल. शेतीव्यवसायात भरपूर लाभ होईल. गळीताच्या धान्याचा व्यापार फायदेशीर होईल. खाणीत काम करणारे नोकर लोक, जमिनदारीत गुतलेले लोक, वकील लेखक, आयकर अधिकारी, पत्रकार व नाटककार यांना हा काळ आर्थिक समृद्धी आणणारा आहे. नोकर लोकाना पाचवा गुरु व दहावा शनी दर्जा वाढवून देणारा ठरेल. राजकारणात सरशी होईल सहकारी मदत करतील. वरिष्ठाचे संबध अनुकूल राहतील. प्रमसबधात प्रगती होईल. प्रवासमात्र यावेळी करू नका. नव्या वाहनाची खरेदी-विक्री सध्या करू नये. लग्नाला मुहुर्त नसले तरी लग्नाचा साखरपुडा करायला हा काळ छान आहे. लावणीवर पडलेली लग्ने जमून येतील. **महिलांस :** शैक्षणिक क्षेत्रातील महिलाना आर्थिक लाभ बऱ्यापैकी होईल. जुना आजार सुधारेल. मगल कार्यात भाग घेण्याचा योग यईल. ¤

## तूळ : कलाक्षेत्रात उत्कर्ष


तुमचे रसिकमन अलिकडे फारसे शात नाही. मनाला स्वास्थ्य लाभत नाही. मनात नाना कल्पना व नाना विचार थैमान घालतात. त्यामुळे मनाचा गोधळ उडतो. चौथा गुरु मुळातच मकर या त्याच्या नीच राशीत आहे तो हे सारे घडवीत आहे. त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट म्हणजे हा चौथा गुरु तुमचा जागेचा प्रश्न अपेक्षेप्रमाणे सोडवणार आहे. मूळची कुडली ज्याप्रमाणात पॉवरफूल असेल त्याप्रमाणात फळे मिळणार आहेत. ज्याची बगल्याची अपेक्षा असेल त्याची ती यावेळी पुरी होईल. कुणाला जागा राहायला मिळून वणवण सपेल सातवा मगळ मात्र पत्नीच्या तब्येतीला काहीना काही आजार निर्माण करून तुमची झोप उडविणारं आहे. यावेळी प्रसूतियोग्य स्त्रियानी तब्येतीला जपले म्हणजे मात्र पुत्र जन्माचा लाभ तुमच्यापैकी काही भाग्यवंतांना होणार आहे. पती-पत्नीची मूळची भांडणे असतील तर त्यानी सयम पाळणे आवश्यक आहे. तरुणानी प्रेमाच्या भानगडीत तूर्त पडू नये. लग्नाचा बेत लावणीवर टाकावा. तुम्हाला खरी साथ आहे ती शनीची आणि शनी तुमचा जीवलग मित्र आहे. तो तुमचे मनोरथ पुरे करणार आहे हे निश्चित समजा. इजिनियराची बेकारी दि २२ ते २८ या दरम्यान सपेल. आर्थिक व तात्रीक सहाय्य मिळून त्यांचा व्यवसाय सुरू होईल. चालू उद्योगात प्रामुख्याने तेल गिरण्यांचे मालक – लोखडी सामानाचे कारखानदार याना उत्कर्षाचा जाईल. ज्याना अभिजात अभिनयाची साथ आहे, गाणे, नृत्य वा चित्रकला येते त्याना कलाक्षेत्रात प्रवेश मिळून पैसा व कीर्ती मिळेल. **महिलांस :** चौथा गुरु सुखाचा शोध लावून देईल. मन मात्र अस्वस्थ राहील. सशय मनात बळावत राहिल. ¤

## वृश्चिक : नोकरीत दर्जा वाढेल

राशिस्वामी मगळ हा त्याच्याच मेष राशीत आल्यापासून तुमचे तंत्र व मत्र बदलला आहे. प्रगतीचा नवा पर्वकाळ सुरू झाला आहे. त्याचा तुम्हाला प्रत्ययदेखील येत आहेच. तुमची वृत्ती ही मूळची स्वाभिमानाची व अहकाराचीच आहे दुसऱ्याचा नोकर म्हणून राहण्यापेक्षा आपल्या हाताखाली नोकर ठेवून हुकमत गाजवणे तुम्हाला जास्त आवडते. या वातावरणाला पोषक असे ग्रहमान तुम्हाला या पधरवड्यात लाभले आहे याचा तुम्ही पुरेपूर उपयोग करून घेतला तर कधी नाही एवढा फायदा होईल. नोकरीत पोलिस अधिकारी, उच्चपदावर असलेले इजिनियर्स, लष्करी अधिकारी, अमलबजावणी करणारे अधिकारी याना हा काळ चलतीचा—त्याच्या बुद्धीला व अधिकाराला महत्वाचे स्थान प्राप्त करून देणारा ठरेल. ज्याना बदली हवी असेल त्याना ती मिळेल. नोकरीत दर्जा व मिळकत वाढवणारा हा पंधरवडा आहे. प्रामुख्याने दि. १६ ते २०, दि. २४ ते २८ हा काळ जास्त अनुकूल ठरावा. महत्त्वाकाक्षेला प्रोत्साहक ठरणाऱ्या योजना दृष्टिपथात येतील. स्वत.चे वाहन घेण्याची आकाक्षा पुरी होईल. धनिकाचा मित्रपरिवारात समावेश होईल. जमिनदार, प्लॅस्टिकचे कारखानदार, विद्युत उपकरणे तयार करणारे उद्योगपती याना नोकराचे सहकार्य मिळेल. धंदा व्यवसायातील मंदी विरू लागेल. सप वा तटे असल्यास ते तडजोडीने मिटतील. या राशीच्या राजकीय नेत्यानी लोकांच्या भावनाची दखल घेतली वा त्याच्याशी सपर्क ठेवला तर त्यांना मोठीच प्रतिष्ठा लाभेल. विदेशी यात्रेची इच्छा महिन्याच्या शेवटी पुरी होईल. आर्थिकदृष्टचा हा पंधरवडा मध्यमप्रतिचा ठरावा. **महिलांस :** संताप व अविचार यापासून दूर राहिलांत तर अगीकृत कार्याला हा काळ उपकारकच ठरेल. ¤

## धनू : मंगळाचे वरदान

प्रामाणिकपणा व प्रतिष्ठा या दोन गुणाना तुम्ही आपल्या जीवनात महत्वाचे स्थान देता. धार्मिक श्रद्धा व हाती घेतलेल्या कार्यावर निष्ठा हा तुमचा स्वभाव आहे. पण या गुणाचे नियत्रण करणारा गुरु दुसरा आहे मकर राशीत त्याचे सामर्थ्य कमी झाले आहे. त्याचे अपेक्षित एवढे सामर्थ्य तुम्हाला लाभत नाही. त्यामुळेच तुमचे मन सतत डळमळत राहते. सशय व नाना कुशंका तुमच्या मनात येत राहतात. या पधरवड्यातदेखील यात बदल होईल असे नव्हे. त्याची तीव्रता मात्र कमी होईल. भाग्यस्थानी आलेला रवि व पाचवा मगळ ही तुमच्या कर्तृत्वाच्या रथाची दोन वेगवान चक्रे आहेत. तुमची सर्वंकष प्रगती साधण्यात, त्या प्रगतीचा वेग वाढवण्यात या दोन ग्रहाचे मोठेच सहाय्य तुम्हाला होईल. मनातील भीती व सशय काढून टाका. येणाऱ्या सधीला सामोरे जा. वरिष्ठाविषयी मनात सशय आणू नका. स्वत.चा अहकार बाजूला ठेवून त्यांच्या आज्ञेचा आदर करा. तसे करण्याने तुमच्या आशा-आकाक्षा बऱ्याच पुऱ्या होतील. नोकरीत तुमचा चांगला जम बसेल. खासगी अगर सरकारी नोकरी असो, स्थैर्य मिळेल. आर्थिक लाभाच्या अनेक योजना दुय्यम व्यवसायात हाती येतील. डॉक्टरी व्यवसायात उन्नतीचे योग आहेत. कुस्तीगीर, हॉकी, फुटबॉल या खेळात प्राविण्य मिळवणारे खेळाडू परदेशातदेखील या पधरवड्यात मान्यता पावतील. दि. १६ ते १९, दि. २१ ते २४, दि. २८ ते ३१ हा काळ आर्थिक वाढ




## आपण असे आहात !

वरील आकृतीत दर्शविल्याप्रमाणे आपल्या कुंडलीत मंगळ असेल तर आपण म्हणजे जमदग्नीचाच अवतार असे समजावे. आपला स्वभाव अति रागीट थट्टा-मस्करी सहन न होणारा, क्षुल्लक कारणावरून हमरीतुमरीवर येणारा, थोडक्यात म्हणजे दादागिरी करणारा व पूर्ण हिंसावादी राहील. तुम्ही कडक शिस्तीचे भोक्ते बनाल. कुणी सहज आपणास नुसती टिचकी मारली तर प्रत्युत्तर म्हणून आपण त्याच्या खाड्कन मुस्कटात माराल त्यामुळे आपणास इतर लोक वचकून राहतील. मात्र आपल्या स्वभावात एक फार मोठा दोष राहील तो म्हणजे तुम्ही स्वत:च इतराच्या कुरापती काढाल व वर अरेरावी कराल. त्यामुळे तुम्ही लोकांत अप्रीय बनाल.

तुमची प्रकृती फार उष्ण राहील. लहानपणी खरूज, गळवे, गोवर किंवा देवी यापासून तुम्हास त्रास होईल. इतकेच नव्हे तर तुमच्या शरीरास विशेषत: डोक्यावर (मानेपासून वरचा भाग) केव्हातरी अपघाताने फार मोठी जखम झाल्याशिवाय राहाणार नाही. तुमच्यावर शत्रूपक्षाकडून हल्ला होऊन शरीरावर शस्त्राचे वार होण्याचाही फार मोठा धोका आहे. या मगळाने जर तुमचा लग्नेश युक्त असेल तर तुमच्या जीवनाची अखेर अग्नी, शस्त्र, वीज व स्फोटक पदार्थ यापासून होईल हे आपण विसरू नये. इतका जहाल परिणाम घडविणारा हा मगळ समजावा. या मगळामुळे तुमचे वैवाहिक जीवन पाहिजे तितके सुखावह जाणार नाही. आपण जर स्त्री असाल तर आपल्या पतीशी आपले नेहमी मतभेद होत राहतील. नेहमी आपणा दोघात खटके उडत राहतील. किंवा आपणास पतीकडून मारहाणही होईल.

आपण पुरुष असाल तर पत्नीवर नेहमी हुकूमत गाजवाल. तिचेशी प्रेमळपणे वागणे आपणास शक्य होणार नाही. तिच्या भावनाची आपण कदर करणार नाही. त्यामुळे आपल्या पत्नीला आपण अप्रीय व्हाल. तात्पर्य असे की, हा मगळ स्त्री सौख्य किंवा पतिसौख्य यांस ठीक नाही.

धनयोगदृष्टघा तो उत्तम आहे. त्यामुळे आपणास प्रॉपर्टीचा उपभोग घडेल किंवा यत्रापासून आपणास धनप्राप्ती होईल. गणीत, सायन्स, इजिनियरींग व डॉक्टरकी हे आपले पेशे राहतील व त्यात आपण नावलौकिक कमवाल. आपल्या आवडीचा आणखी एक पेशा आहे तो म्हणजे पोलिसखाते किंवा मिलीटरी. या क्षेत्रात आपण चांगलीच मर्दुमकी गाजवाल. अगदी गोळ्यांच्या वर्षावातसुद्धा शत्रूवर चाल करून जाल व त्याला पाणी पाजाल. अथवा प्राणाची कुर्बानी करून हुतात्मा बनाल व आपल्या देशाचे व स्वत चेही नाव इतिहासात अजरामर कराल.

**एन. आर. साळवी, पनवेल**

सबळ करणारा आहे. श्रमाचे चीज होऊन, पैसा मिळेल. पाचवा मंगळ कोणत्याही प्रकारच्या स्पर्धेत अद्वितीय असे स्थान व यश मिळवून देईल. संसारात सातवा शनि व केतू बारीक सारीक कटकटी निर्माण करू लागला तरी त्यामुळे तुमच्या प्रगतीला अडथळा येणार नाही. **महिलांस :** तुमच्या भावना कितीही तीव्र असल्या तरी पतीराजाबरोबर जुळते घेण्यातच शहाणपण आहे. मिळते जुळते घेण्याने इच्छा व स्वप्ने पुरी होतील. पैसा मिळेल. ◻

### मकर : विरोधकांचे सहकार्य

सहाव्या शनीने तुमचे स्थान जरी अबाधीत ठेवले असले तरी तुमच्या प्रगतीचा रथ अजून तरी काही काळ रखडत, रेंगाळतच चालणार आहे. पाचव्या शनीने तुम्हाला जी मदत केली तिला तोडच नव्हती. तेवढा हा शनि तुम्हाला मदत करणार नाही. पण तो तुमचा राशिस्वामी असल्यामुळे विरोधी ठरणार नाही. उलट सार्वजनिक कार्यात तुम्हाला विरोध करणारे, तुमच्या विरुद्ध कटकारस्थाने रचणारे लोक तुमच्या समोर मात्र गोगलगाय बनतील. तुम्ही सहकार्याची अपेक्षा केली तर ते हात पुढे करतील. दि २१ च्या शुक्र प्लूटो युतीपासून नोकरीत स्थित्यतराची प्रगतीची चिन्हे दिसू लागतील. दि. २२ ते २८ कामाचा ताप कमी होईल. नको असलेल्या कामाचा ताण जो अनेक दिवस तुम्हाला सहन करावा लागत होता तो कमी होईल. हाताखालच्या माणसाचे सहकार्य मिळेल. बढती बदलीची चिन्हे यावेळी दिसू लागतील. रबर उद्योग, तेल गिरण्या, वायदेव्यवहार, स्टेशनरी उत्पादन, प्लॅस्टिक, जमिनी, सौंदर्य प्रसाधने, नारळ, छपाई व प्रकाशन उद्योग करणारे लोक, तसेच या उद्योगाशी सबंधीत असा नोकरवर्ग या पंधरवड्यात समाधान पावेल. सरकारी नोकरीत ऊच्चपदस्थ असलेला मत्री, आमदार-खासदार याना मात्र सघर्षातून जावे लागणार आहे या राशीच्या पत्रकारांनी विशेष करून तिखट टीका करणाऱ्यानी लोकाचे भलते आव्हान स्वीकारू नये. लोकप्रियता गमावण्याचा त्याच्यावर प्रसग ओढवेल सताप जाणवू देऊ नये. गुरूचे सहकार्य असल्यामुळे या राशीच्या तरुणाच्या हातून अविचारी कृत्य घडणार नाही. पण अविचार मात्र मनात येईलच. सूडाची भावना टाकून द्या. सयमाने अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. लेखकाना स्फूर्ति येईल **महिलांस :** सध्या लग्नाचे मुहूर्त नाहीत. पण प्रेमसंबंध जुळून येईल. उद्योगात असलेल्या महिलास थोडा फायदा होईल. नोकरीत कामाला प्रोत्साहन मिळेल. भरतकामाचे कौतुक होईल. ◻

### कुंभ : उद्योगात यशप्राप्ती

तुमचे व्यक्तिमत्त्व शनिप्रधान आहे. निग्रही स्वभाव व अगावर पडलेली जबाबदारी पार

पृष्ठ ५१ वर

# क्रीडांगण

मुकुंद मणूरकर

## एक पॅरलल् कोचिंग कॅम्प


सध्या 'पॅरलल्' शब्द भलताच पॉप्युलर झाला आहे. उदाहरणार्थ शिवसेनेचे मधूनमधून स्थापन होणार 'पॅरलल् गव्हर्मेंट' किंवा जनसघाचे सकल्पित 'पॅरलल् ब्रॉडकॉस्टिंग' वगैरे वगैरे. तर हा असाच एक पॅरलल् कोचिंग कॅम्प. ॲथलेटिक्सचा. या कॅम्पची कल्पना चहाच्या टेबलाभोवती ठरली गेली. तशा अनेक चागल्या चागल्या योजनाचे सकल्प चहाच्या टेबलाभोवतीच बोलले जातात. त्यापैकी, बहुतेक त्या चहाची चव सपेपर्यंतच जिभेवर रेंगाळतात. पण कधीकधी सणक थेट मेंदूला जाऊन भिडते असे चार मेंदू एकत्र आले की चक्रे फिरू लागतात आणि सकल्प सिद्धीस वगैरे जाण्याच्या मार्गावर लागतो. पुण्याच्या 'नेहरू स्टेडियम' वर चालू असलेला ॲथलेटिक्सचा कोचिंग कॅम्प याच प्रकारात मोडावा.

'पूना यूथ क्लब' नावाचा एक क्लब पुण्यात आहे. वय वर्षे अवघे एक! पण गुणवान व जिद्दी लोकांचा यात भरणा असल्यामुळे प्रथमवर्षीच त्यांनी प्रादेशिक विजेतेपदही मिळविले. तर या क्लबची दोनचार मडळी, उदाहरणार्थ. प्रा. सुरेशचंद्र नाडकर्णी, रमेश तावडे, प्रल्हाद सावत, सय्यद रशीद एके दिवशी गप्पा मारीत असतात. विषय असतो जानेवारीत पुण्यात भरणाऱ्या आंतरराज्य ॲथलेटिक्स स्पर्धा! तीनचार वर्षापूर्वीपर्यंत महाराष्ट्राचे सघ या स्पर्धेत बऱ्यापैकी किंवहुना चांगलीच कामगिरी बजावीत असत. पण त्यानतर मात्र महाराष्ट्राच्या यशाने सॉलीडपैकी घसरगुंडीचा खेळ सुरू केला. दर्जेदार खेळाडूची धडाधड होणारी निवृत्ती हे या घसरगुंडीचे एक कारण. पण खरे कारण म्हणजे त्याच्या निवृत्तीने झालेली पोकळी भरून काढायला कुणी पुढे आले नाहीत. आणि आणण्याचा प्रयत्नही झाला नाही हे होय! यदा या स्पर्धा बऱ्याच खटपटीनतर प्रथमच पुण्यात भरणार आहेत. तेव्हा इतर राज्यातील खेळाडूनी भराभरा पदके मिळवावीत आणि महाराष्ट्राची थाळी मात्र रिकामी रहावी ही शक्यता आहेच! यजमान सघाची स्वतःच्या मैदानावर होणारी नामुष्की हे एक अफलातून प्रकरण असते. या नामुष्कीच्या कल्पनेने वर उल्लेखलेल्या मडळीना भयकर अस्वस्थ केले. ताबडतोब काहीतरी पॉझिटिव्ह अप्रोच घेतला पाहिजे हे त्यांना उमजले यातूनच कोचिंग कॅम्पची कल्पना पुढे आली.


हेतू चांगला असेल तर मार्गही सुकर होतात. या कॅम्पच्या कल्पनेला प्रथमच खो बसला असता जर क्रीडागणाची सोय झाली नसती तर! पण महापालिकेच्या 'नेहरु स्टेडियम' व्यवस्थापक श्री. सुयोधन करवडे यानी ही अडचण तडकाफडकी दूर केली, मुफ्तपणे क्रीडागण देऊन! करवडे याच्यासारखा, खेळात तुफान इटरेस्ट असणारा माणूस व्यवस्थापकपदी असल्यामुळे पुण्यातील सर्व खेळाचे खेळाडू 'नेहरू स्टेडियम' कडे मोठ्या आशेने पाहतात. एकदा क्रीडागण मिळाल्यावर मग 'शो मस्ट गो ऑन' व्हायला काही अडचण नव्हती. रमेश तावडे, अमृतपाल, एडवर्ड सिक्वेरा, सय्यद रशीद याच्यासारख्या राष्ट्रीय. आतरराष्ट्रीय दर्जाच्या खेळाडूनी शिक्षकाची भूमिका उचलण्याची तयारी दर्शवली. त्यामुळे वर्तमानपत्रातून जाहीर झाल्यावरोवर कल्पनेला प्रचड प्रतिसाद मिळाला. पुण्यातीलच नव्हे तर सांगली कोल्हापूर येथील काही मडळी दाखल झाली. असले कॅम्प्स वगैरे भरविताना एक डोळा नेहमी शासनाच्या अनुदानावर ठेवावा लागतो. पण या मडळीनी तिकडे चक्क काणाडोळा केला. नाही म्हणायला त्यांनी शासनाच्या सेवेचा छोटासा लाभ घेण्याचा एक अयशस्वी प्रयत्न केला. स्पोर्टस् कौन्सिलची एक कचेरी नेहरू स्टेडियमच्या इमारतीत आहे. त्या कचेरीत वेट लिफ्टीगची काही साधने आहेत. त्याचा वापर शिबीरार्थींना करायला मिळावा अशी सयोजकानी विनती केली. पण आज देऊ उद्या देऊ करता करता सरकारी अधिकाऱ्यानी सयोजकाना पद्धतशीर वाटेला लावले.

हा कॅम्प भरविण्यात संयोजकांचा एकच हेतू होता, तो म्हणजे महाराष्ट्राचा झेडा दिमाखाने फडकाविणे! पण महाराष्ट्र सरकारच्या क्रीडाखात्याला यात काय गैर वाटले कुणास ठाऊक, पण त्यांनी याच्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले. खेळाची प्रगती होण्यासाठी आपल्या या क्रीडाखात्याकडे एक भन्नाट आयडिया आहे. ती म्हणजे एकेका खेळासाठी एकेक कोच नेमणे! बस्स! पुढे तो कोच आणि त्याचा तो खेळ काहीका करेनात! आता ॲथलेटिक्सच्याच बाबतीत बोलायचे झाल्यास श्री. राम भागवत याना सरकारने कोच म्हणून नेमले आहे. हे गृहस्थ गेली दहा वर्षे ही धुरा सभाळीत आहेत. पण गमतीची गोष्ट म्हणजे पुण्यातील अनेक खेळाडूना ही बातमी कळते तेव्हा अद्भूत बातमी ऐकल्यासारखे त्याचे चेहेरे होतात. इतकी याची थोर कर्तबगारी!


महाराष्ट्रातील ॲथलेटिक्सच्या काही ज्येष्ठ मंडळींनी सागितले की, भागवत हे गेली दहा वर्षे कोच आहेत ही बातमी आपल्याला परवा परवाच कळली! या दहा वर्षांत भागवतांनी 'तयार' केलेल्या खेळाडूची मोजदाद करायला दोन हाताची बोटेसुद्धा जास्त होतील. भागवताच्या 'कॅंप'मध्ये दोनचार जणच तर 'पूना यूथ क्लब'च्या कॅंपमध्ये शेसव्वाशेजण सामील होतात यात काही गफलत तर नाही ना याची क्रीडाखात्याने चौकशी करावी.



अमृतपाल–सर्व गोष्टी अगदी तोलून मापून!
थोडा तोल किंवा ताल बिघडला की....



एडवर्ड सिक्वेरा–वास्तव्य मुंबईत. पण
खास मार्गदर्शनासाठी शनिवार–रविवार
मुक्काम पुण्यात.



हे पाय बऱ्याच वेळा मागे ओढले गेले आणि अनेक संधी
गमवाव्या लागल्या. तरीही–



–तरीही मी पूर्ण
समाधानी आहे–रमेश तावडे

तर हा कॅप सुरू होऊन आता तीन आठवडे झाले आहेत. रमेश तावडे, अमृतपाल, सय्यद रशीद हे रोज जातीने उपस्थित राहून मार्गदर्शन करतात. एडवर्ड सिक्वेरा हा मुंबईचा खेळाडू, पण खास या कॅंपला मार्गदर्शन करण्यासाठी तो दर शनिवार-रविवार पुण्याला येतो या दर्जेदार खेळाडूंच्या मार्गदर्शनाबरोबरच शिबीरार्थींना आणखी एक लाभ मिळत आहे. म्युनिच ऑलिंपिकची फिल्म मिळविण्यात 'पूना यूथक्लब' ला यश आले आहे. ही फिल्म वारवार पहाण्याची व त्याचबरोबर त्याचे विवेचन ऐकण्याची संधी शिबीरार्थींना मिळेल.

असो. या शिबिराचा लौकिकदृष्टया काय लाभ होईल त्याचा पुरावा येत्या जानेवारीत नेहरू स्टेडियमवरच मिळेल. पण प्रा. नाडकर्णींच्या भाषेत सांगायचे झाल्यास— 'लकी' समोर बिडया फुकून सध्याकाळ वरबाद करण्यापेक्षा पाचपन्नास तरुण इथ येऊन सध्याकाळ सार्थकी लावतात हाही लाभ खूप मोठा आहे!' ◻

## अपेक्षा

भारतातील अंतर्गत स्पर्धेत आपल्या राज्याची मान उचावण्याचा प्रयत्न अनेक राज्ये करतात. अर्थात महाराष्ट्र सोडून! इतर अनेक राज्यात स्पर्धेपूर्वी शिबीरे भरवून खेळाडू तयार केले जातात. महाराष्ट्राला जरी अशी शिबीरे भरविता येत नसली तरी इतर कोणी भरविल्यास त्याकडे आस्थेवाईकपणे का पाहिले जात नाही? 'पूना यूथ क्लब'चे हे शिबीर आर्थिक मदतीवाचून नाही म्हटले तरी लगडे पडलेच. शिबीरार्थींना रोज दूध देण्याची सयोजकाची योजना होती. अर्थात ती यशस्वी झाली नाहीच. शाळा-कॉलेज किंवा नोकरी-धंदा करून रोज सध्याकाळी दोन एक तास घाम काढणारी सक्त मेहनत केल्यावर त्यांना काही पौष्टीक पदार्थांची आवश्यकता वाटल्यास त्यात चुकले काय? एक साधी गोष्ट. भारतातील अनेक फार्मास्यूटिकल कपन्या आपल्या व्हिटॅमिन्सच्या गोळ्या डॉक्टरांबरोबर खेळाडूनाही वाटतात. पण ही सोय सरकारी किंवा एखाद्या वजनदार व्यक्तीने आयोजित केलेल्या शिबिरातील खेळाडूना मिळते. 'पूना यूथ क्लब'लाही अशा मदतीची आवश्यकता होती. पण त्यांना कोण मदत करणार?

महिनाभर चाललेल्या या शिबिरास क्रीडाखात्याच्या एकाही अधिकाऱ्याने भेट दिली नाही.

त्यानी भेट द्यावी अशी सयोजकाची इच्छा होती, त्याचबरोबर ते कोणी भेट देणार नाहीत याची शभर टक्के खात्रीही होती. नाहीतरी क्रीडाखात्याच्या या अनिच्छेतूनच या शिबिराची योजना झाली. ◻

---

## पाक्षिक भविष्य : पृ. ४९ वरून

पाडण्याची हिम्मत तुम्हाला लाभलेली असते. शिवाय कौशल्य हा एक दुर्मिळ गुण तुम्हालाच लाभलेला असतो. केवळ बोलण्याच्या जोरावर तुम्ही समोरच्या माणसावर वजन मारू शकता. त्याला भुलवू शकता. अशा तुमच्या स्वभाव गुणावर उपकारक ठरावे असेच तुमचे सध्याचे ग्रहमान आहे. वायफळ वडबड सोडल्यास, बुद्धीचा योग्य वापर केल्यास या पधरवड्यात तुम्हाला असामान्य यश मिळणार आहे. दि. १६ ऑगस्ट रोजी रवि-कर्क राशीत प्रवेश करीत आहे. सप्तम स्थानी येणारा हा रवि तसा ससारसुख मिळण्याच्या दृष्टीने फारसा चागला नव्हेच. पण हा रवि स्वगृही व तसेच उच्च असल्यामुळे तो तुम्हाला उपकारक ठरावा. तुमचे राजकीय स्थान उन्नत व्हावे. तुम्ही सत्तारूढ पक्षात असलात तर तुम्हाला एखादे महत्वाचे पद विभुषीत करण्याची सधी प्राप्त होईल. तुमचे राजकीय विरोधक अस्त पावतील. तुम्हाला मिळणारे यश एवढे मोठे असेल की ह्याचा कुणालाही हेवा वाटावा. तुम्ही शासनाचे विरोधी राजकीय नेते असाल तर तुमच्यावर मोहिनी अस्त्राचा प्रयोग होण्याची शक्यता दृष्टिआड करू नका. दि १६ ते २०, दि. २४ ते २७ हा काळ नोकरीच्या दृष्टीने अनुकूल आहे. आजवर प्रयत्न व कष्ट करून देखील उपेक्षणीय राहिलेले तुमचे स्थान या काळात 'प्रकाशमान' होईल. मालक वा वरिष्ठ याना तुमची महती पटेल वशिलाही उपयोगी पडेल. नोकरी नसलेल्यांना ती मिळेल. मात्र, ती कायम असणार नाही. शिवाय तुमच्या वास्तव्यापासून लांब असेल. प्रामुख्याने बांधकाम खाते, महसूल खाते व गुप्तचर खाते यात प्रयत्न करावा. कृषिपदवीधरानाही उद्योग मिळेल. सशोधकाना पधरवड्याच्या शेवटी कीर्ती मिळेल विज्ञानाचा विद्यार्थी कौतुकाचा विषय ठरेल. **महिलास** बारावा गुरु आहे. भाडकुदळपणा अगाशी येईल. शेजाऱ्याशी भाडण होईल. उद्योगधद्यात असलेल्या महिलाना अनुकूल.

### मीन : स्थावराचा लाभ

राशिस्वामी गुरु अकरावा हीच काय ती तुमच्याबाबतीत जमेची बाजू आहे. शनि चौथा आला आहे. तो काही प्रतिकूल फळे देईल तर काही अनुकूल देईल. दुसरा मगळ मेष राशीत सहा महिने ठाण माडून बसणार आहे हा मगळ फारसा प्रतिकूल नसलातरी तुमचे कौटुंबिक जीवन तो काही शात ठेवील अशी खात्री बाळगू नका. काळजी करण्यासारखे जरी फारसे घडणार नसले तरी घरात दवाखाना उघडावा लागेल. लहान मुलाना बारीक सारीक आजार, तुम्हाला स्वत:ला सर्दी, दम्याचा त्रास, मुलाचे मनाविरुद्ध वागणे, भावावंदाचे त्रासदायक वर्तन, मातृसुखात व्यत्यय अशा एक ना दोन कटकटी मधूनमधून चालूच राहातील. मात्र त्याचा तुमच्या नोकरी-व्यवसायात उद्योगधंद्यात कोणताही परिणाम जाणवणार नाही. प्रगतीत अडथळा येणार नाही. पैशाची चणचणदेखील जाणवणार नाही. पैसा शिल्लक राहणे कठीणच आहे. पण प्रतिष्ठेला बाध येणार नाही. नोकरीत सहाव्या रविमुळे विरोधकांचे उपद्व्याप तुम्ही मोडून काढू शकाल त्यांची कटकारस्थाने उधळण्यात यश लाभेल. वरिष्ठाना तुमच्या कलाने घ्यावे लागेल. यावेळी निकरावर आलेला स्थावराचा प्रश्न तुम्हाला अनुकूल अशा निर्णयाने निकाली निघावा. रेंगाळत पडलेला दावा मार्गी लागावा. जागेची अडचण दि. २४ ते २६ या मुदतीत दूर व्हावी. मूळच्या उच्च ग्रहाप्रमाणे एखादा भाग्यवत बगल्याचा मालकही होईल. चालू उद्योगात भागिदारी निर्माण होईल, चालू भागिदारी लाभदायक ठरेल दि. २६ ते ३१ नव्या उद्योगाच्या उभारणीला भाडवल व मदत मिळेल कर्जाचे काम होईल हाताखालची माणसे मात्र त्रास देणार नाहीत याची काळजी घ्या. **महिलास :** उपासना फळास येईल. साधूसतांचे दर्शन मनाला आनंद देईल. जवळपासची तीर्थयात्रादेखील घडावी. नोकरी करणाऱ्यांना त्रास होणार नाही.

# विद्युत विकासातील आमचे स्थान

भारतातील एकूण ९ टक्के क्षेत्र व्यापणारे व देशातील एकूण लोकसंख्येपैकी ९ टक्के लोकसंख्या असणारे महाराष्ट्र राज्य हे भारतातील तिसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. विद्युत विकासाच्या क्षेत्रात आमचे स्थान खालील प्रमाणे आहे.

■ अखिल भारतीय वीज वापराच्या मानाने महाराष्ट्रात विजेचा दरडोई वापर दुप्पट आहे.

■ संपूर्ण भारतातील विद्युतीकरणाची टक्केवारी २० असली, तरी या राज्यातील विद्युतीकरणाची टक्केवारी ४० आहे, व येथील ७० टक्के जनतेस वीजपुरवठयाचा लाभ मिळालेला आहे.

■ भारतातील औद्योगिक उत्पादनापैकी सुमारे एक चतुर्थांश माल या राज्यात तयार होतो व भारतीय औद्योगिक क्षेत्रांत होणाऱ्या वीज वापरापैकी सुमारे ६ वा हिस्सा महाराष्ट्रात वापरला जातो.

■ देशातील दुसऱ्या कोणत्याही राज्यापेक्षा महाराष्ट्र राज्याची स्थापित क्षमता, विद्युत उत्पादन आणि वीज विक्री अधिक आहे.

■ जूनअखेरपर्यंत राज्यातील १५७६२ शहरे व खेडी यांचे विद्युतीकरण करण्यात आले असून ३०२८७५ कृषी पंपांना वीज पुरवण्यात आलेली आहे.

■ भारतीय स्वातंत्र्याच्या रौप्य महोत्सवी वर्षात १०३१ हरिजन वस्त्यांचे विद्युतीकरण करण्यांत आलेले आहे. या काळात रोज जवळ जवळ ३ हरिजन वस्त्याचे विद्युतीकरण करण्यात आले.

अशा रितीने महाराष्ट्र राज्यातील औद्योगिक व ग्रामीण विकासात महाराष्ट्र राज्य वीज मंडळाचा सिंहाचा वाटा आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युतमंडळातर्फे प्रसृत



# मेरा रंग दे बसंती चोला

शरद गोखले

जलते भी गए कहते भी गए
आजादी के परवाने
जीना तो उसी का जीना है
जो मरना वतन पे जाने.
ए वतन ए वतन हमको तेरी कसम,
तेरी राहो मे जाँ तक लुटा जाएँगे,
फूल क्या चीज है तेरे कदमो पे हम,
भेट अपने सरो की चढा जाएँगे।

साल १९६५. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर तब्बल अठरा वर्षानंतर मनोजकुमारच्या 'शहीद' या, क्रांतिकारक भगतसिंग यांच्या जीवनावरील चित्रपटामध्ये वर नोंदवलेले गीत ऐकावयास मिळत होते. मनोजकुमारच्या या चित्रपटाने शहीद भगतसिंग यांच्या तेजःपुंज क्रांतीकारी जीवनाचे जळजळीत, अस्वस्थ करणारे आणि तरीही हवेहवेसे वाटणारे दर्शन रुपेरी–पडद्यावर प्रथमच घडत होते. हो! शहीद भगतसिंग यांचे जीवन चित्रबद्ध करण्याचा मोह अनेक मंडळींना झाला. भगतसिंगच्या जीवनाचे चार अवतार हिंदी रुपेरी पडद्याने पाहिले. तथापी या क्रांतिकारकाच्या कृतिमागील वैचारिक बैठक, भावनात्मक कौटुंबिक संघर्ष, सर्वस्व झोकून देऊन प्रत्यक्ष कृती करण्याची तारुण्यसुलभ वृत्ती, उत्कट देशप्रेम, व धीरोदत्त मृत्यु, या भोवती–केंद्रीत झालेला भगतसिंगच्या जीवनावरील चित्रपट १९६५ साली प्रथम पहावयास मिळाला. 'शहीद' या मनोजकुमारच्या चित्रपटासंबंधी दोन गोष्टी विशेष प्रकर्षाने जाणवतात. दिग्दर्शक व कलाकार यांचा विषयाबाबत असलेला प्रामाणिकपणा ही पहिली बाब. या चित्रपटामध्ये अव्वल ब्रिटीश अमदानीचे वातावरण–(व्यावसायिक मर्यादा लक्षात घेता) किती सुंदर निर्माण केले होते ते आठवा म्हणजे मी काय म्हणतो याची प्रचिती येईल. भगतसिंगच्या घरातील वातावरण, भगतसिंगचा व अन्य कलाकारांचा पोषाख, कोर्ट कामकाजाची पद्धत, लाला लजपतराय यांच्यावरील लाठीहल्ला, या संबंधीचा प्रत्येक तपशील 'शहीद' मागे उभ्या असलेल्या मंडळींच्या मनातील प्रामाणिकपणा नोंदवून जातो. शहीद बाबतचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे या चित्रपटातील गाणी चित्रपट विषयाशी इतके अप्रतिम सुसंवादित्व साधणारी गीतरचना सहसा हिंदी चित्रपटांच्या संदर्भामध्ये आढळत नाही. सुंदर गीतरचनेला सुडौल चालीची जोड गीतरचनाकार प्रेमधवन यांनी स्वतः दिली आहे. प्रत्येक गीताचे चित्रीकरणही विशेष काळजीपूर्वक करण्यात आले आहे.

मेरा रंग दे बसंती चोला
ओ मेरा रंग दे बसंती चोला
बडा ही दाग गहरा है यारो जिसका नाम गुलामी है,
उसका जीना भी क्या जीना
जिसका देश गुलाम है!

काव्य रचनेतील प्रत्येक शब्द साधा, सोपा अर्थवाही. लाजिरवाण्या गुलामगिरीची जाणीव रचनाकाराने करून दिली. शब्दाला सूर गवसला, आणि कलाकाराने जीव ओतून पडद्यावर गीत साकार केले. हा योग एखाद्या गीताच्या बाबतीत जुळून येता तर योग म्हटले असते. पण सर्वांच्या सर्व गीते जमून येतात, ती केवळ योगायोगाने नाही. प्रत्येक गीतामागे त्याच्या चित्रीकरणामागे योजना असते. आणि विशेषतः या चित्रपटाच्या संदर्भात बोलायचे तर करूच करू, अशी जिद्दही असते. म्हणूनच

सर फरोशी की तमन्ना अब हमारे दिल मे है,
देखना है जोर कितना बाजुए कातिल मे है–

या–सारखे प्रेरक गीत असो, अथवा भगतसिंगवरील प्रीती खुल्या दिलाने व्यक्त करणारे–

जोगी हम तो लूट गए तेरे प्यार मे
जाने तुझको खबर कब होगी,–

खाशा पंजाबी ढंगातील गीत असो;–



# बडा ही दाग गहरा है यारो जिसका नाम गुलामी है,
# उसका जीना भी क्या जीना जिसका देश गुलाम है !

परिणाम अगदी आपेक्षेप्रमाणे थेट गणिती पद्धतीने होतो.

' शहीद ' तुम्ही बघितलाय ?

बघितला नसलात तर बघा,–

आणखी एक गोष्ट तुमच्या लक्षात येईल या चित्रपटाचा नायक–

भगतसिंग आहे. तुम्ही म्हणाल काय मूर्खासारखे लिहितो आहे मी. भगतसिंग वरील चित्रपटाचा नायक भगतसिंग नसणार तर कोण असणार ? नाही मंडळी हिंदी चित्रपटाच्या बाबतीत हा अनुभवही अगदी क्वचित येतो. तुम्ही चित्रपटाला जाता, त्या चित्रपटाचा नायक कधी कामगार नेता असतो, कधी वकील असतो, कधी हिंदी स्टाईलचा जेम्स बाँड असतो. तर कित्येक वेळा काम धंदा न करता वासुगिरी करणारा पोरींची छेडछाड करणारा पण मनाचा निर्मळ असलेला बेकार तरुण चित्रपटाचा नायक असतो. पण चित्रपट संपल्यावर कधी तरी हा ' नायक ' तुमच्या डोक्यामध्ये असतो का ? प्रश्नाचे प्रामाणिक उत्तर आहे 'नाही.' कारण चित्रपट संपल्यावर तुमच्या लक्षामध्य राहतो तो नायकाच्या भूमिकेमध्ये वावरणारा कलाकार. कधी तो धर्मेंद्र असतो कधी जितेंद्र. कधी देव आनंद असेल कधी दिलीपकुमार. हे असे का होते, याचे अगदी साधे उत्तर असे आहे की या चित्रपटाचा नायक ही स्वत्व असणारी व्यक्तिरेखा अस्तित्वातच नसते. कलाकाराला त्याच्या सर्व लकबीसह तुमच्या समोर नाचवण्यात येते. कॅमेरा हलतो, तो या कलाकाराला जास्तीत जास्त चांगला ' प्रोजेक्ट ' करण्यासाठी. हे सर्व रामायण नोंदवण्याचे कारण इतकेच की ज्या चित्रपटाच्या संदर्भामध्ये मी लिहितो आहे तो ' शहीद ' पाहताना, किंवा पाहून–झाल्यावर तुमच्या मनावर, मेंदूवर ठसतो तो भगतसिंग. मनोजकुमार नामे कोणी ' कलाकार ही भूमिका साकार करतो आहे हे प्रयत्नपूर्वक लक्षात ठेवावे लागते. शहीद हा काही मनोजचा पहिला चित्रपट नव्हे. किंवा शहीद म्हणजे सत्यजितचा पाथेर पांचालीही नव्हे. तरीही देशाच्या स्वातंत्र्य युद्धाचे चित्रपटाच्या संदर्भातून स्मरण करीत असताना जे पाच सात (हो केवळ पाच–सातच) चित्रपट डोळ्यासमोर उभे राहातात त्यामध्ये शहीदचा समावेश होतो. शहीद पूर्वीही मनोजकुमार कलाकार म्हणून चांगलेच

नाव कमवून होता. तथापी राष्ट्रीय प्रवाहाचे, प्रश्नांचे–(कितीही बटबटीत व चोख व्यावसायिक असले तरीही ) प्रक्षेपण मनोजकुमारने लेखक, निर्माता, दिग्दर्शक या नात्याने उपकार, पूरब पश्चिम, यादगार आणि काही मर्यादित अर्थाने शोर या चित्रपटातून, घडवले आहे त्याचे मूळ या शहीद मध्ये पहावयास मिळते. निर्मिती अवस्थेमध्ये असलेल्या त्याच्या चित्रपटाचे नावही 'रोटी कपडा मकान'–(आहे की नाही ज्वलत प्रश्न? नाकारू शकाल ?) असे आहे. स्वातंत्र्यदिनासबंधी सपादकांशी चर्चा करीत असताना सहज मनोजकुमारचे नाव निघाले. आणि आज धर्मेन्द्र, जितेन्द्र– प्रमाणेच आघाडीवर असूनही या मंडळीपेक्षा वेगळ्या असणाऱ्या मनोजकुमारची सहज याद आली. सपादकानी इशारा दिला आगे बढो !

काम चालू असताना, ज्याला सहसा व्यत्यय आवडत नाही अशा मंडळीपैकी एक म्हणजे मनोजकुमार. रोटी कपडा मकान– या चित्रपटाचे चित्रीकरण सुरू असल्याने फारसा वेळ मिळणे शक्य नव्हते. तथापी कलाकाराना पकडण्याची उत्तम वेळ म्हणजे भोजनसुट्टी, हे माहित असल्यानें फोनाफोनी करून मनोजबरोबर एक भोजनसुट्टी तर मिळवली. स्टुडिओचा परिसर हा तसा 'रम्य' कधीच नसतो. पण स्वच्छ परिसर लाभलेल्या राजकमल मध्ये मनोजबरोबर निवांत ( अर्थात भोजन सुट्टीच्या मर्यादेमध्ये) बातचित साधून घेतली. इतका शांत माथ्याचा स्वतःच्या पत्निविषयी, पोराविषयी इतक्या जिव्हाळ्याने बोलणारा, आणि सितारा असल्याचा कोणताही नखरा नसलेला कलाकार मी प्रथमच पाहत होतो. दोन-पाच मिनिटे बोलल्यावर मी पहिली गोष्ट कोणती केली असेल, तर चोपडी बाजूला फेकून दिली. चोपडीतील संदर्भाच्या आधारे नोंदवावा असा खासा तपशील याच्याजवळून आपल्याला मिळू शकणार नाही हे माझ्या लक्षात आले होते.

हो आता तुम्हाला हवाच असला तर– ( म्हणजे अशा मुलाखतीचा अपरिहार्य भाग असल्याने-तुम्हाला चुकल्यासारखे होऊ नये म्हणून ) मनोज सबधीचा थोडा फार तपशील त्याची शहीद पासूनची वाटचाल नोंदवण्यापूर्वी तुमच्या समोर ठेवतो.

## हम फिल्म लाईनमे जाएंगे

फाळणीच्या बोचऱ्या स्मृती, घेऊन जो मडळी १९४७ मध्ये भारतामध्ये आली अशा मडळीमध्ये मनोजचे कुटुंबीय होते. लाहोरला जन्मलेल्या मनोजचे शिक्षण दिल्लीमध्ये झाले. महाविद्यालयीन शिक्षणही मार्गी लागले होते. बी. एस्. सी. चे शेवटचे वर्ष करीत असतानाच चित्रपट व्यवसायामध्य असलेले एक आप्त लेखराज भाखरी त्याच्या 'टांगावाली' नावाच्या चित्रपटाच्या प्रदर्शनाचे निमित्ताने दिल्लीमध्ये आले होते. त्यांनी मनोजला चित्रपटामध्ये प्रमुख भूमिका देण्याचे आश्वासन दिले. कोवळ्या वयातील मनोजच्या मन श्चक्षुसमोर रुपेरी पडद्यावरील स्वत.ची छबी तरगू लागली. आणि त्यानी घरच्या मंडळीना सांगून टाकले 'हम फिल्म लाइनमे जाएंगे !' आई वडिलाची प्रत्यक्ष मान्यता मिळाल्यावर ११ ऑक्टोबर १९५६ रोजी फिल्म लाइनमध्ये येणाऱ्या उद्देशाने मनोजकुमार गोस्वामी (गोस्वामी हे आडनाव फिल्म लाइनमध्ये आल्यावर अर्थातच ते गळून पडले. ) मुंबई मुक्कामी डेरे दाखल झाले. लबी चौडी अश्वासने देणाऱ्या लेखराजजींनी काय केले? दिल्लीहून पाठवलेले हे हाडामासाचे पार्सल त्यानी महिना ७५ रुपयावर ठेवून घेतले. पंचाहत्तर रुपये वेतन घेणाऱ्या सहाय्यकाला फिल्मलाईनमध्ये काय काम असते ? तो असतो दिग्दर्शन सहाय्यक. पण प्रत्यक्षात दिग्दर्शनाशी त्याचा काडी मात्र संबध नसतो. मुंबईतील बालू गडी जे काम घरात करतो, तेच काम या पातळीवरील सहाय्यक सेटवर करतो. मनोजला स्वाभाविकपणे या सर्व दिव्यातून जावेच लागले. पडद्यावर चमकण्याची पहिली सधी मिळाली १९५७ साली प्रदर्शित झालेल्या फॅशन या चित्रपटामध्ये. वाटयाला आले फक्त एक तीन मिनटाचे गीत. लेखराज भाखरी–यांच्याच–सहारा आणि पचायत, या चित्रपटातून छोटया भूमिका मिळाल्या. पण खरे नशिब उघडले ते एका चित्रपटाच्या खास खेळाच्यावेळी. 'देवर भाभी' या चित्रपटाच्या 'प्रिमीअर' चे वेळी एच. एस. रावळ यांच्या नजरेने या पंजाबी तरुणाला अचूक हेरले. कांच की गुडिया या चित्रपटाचा मनोज चक्क नायक झाला. फिल्म इनस्टिटयूटच्या कलाकारांची आयात सुरू होण्यापूर्वीचा तो जमाना असल्याने एखाद्या निर्मात्याने नवीन कलाकार आणला, तर अन्य मंडळी या कलाकाराला बघण्यास उत्सुक असत. काच की गुडिया सेटवर असतानाच मोहन सैगल यांनी शिकलेली बायको या मराठी चित्रपटावरून तयार केलेल्या डॉक्टर विद्या, या चित्रपटातील नायकाची भूमिका मनोजला दिली आणि कांच की गुडिया पडद्यावर येण्यापूर्वीच १९६० मध्ये–वैजयतीमालाचा नायक म्हणून मनोज पडद्यावर आला. डॉक्टर विद्या अपेक्षेइतका चालू शकला नाही. तर कांच की गुडिया, साफ कोसळले. वर्षे दोन वर्षे घद्याच्या आघाडीवर 'डल' गेली. शांतपणे दिल्लीमध्ये जाऊन मनोज शादी उरकून आला. आल्यावर हरियाली और रास्ता चित्रपूर्ण केले. विलक्षण यशस्वी ठरलेले हे त्याचे पहिले चित्र. छोकऱ्याच्या जन्म दिवशी–१८ ऑक्टोबर १९६२, रोजी वो कौन थी ? च्या करारावर सही केली. राज खोसला यांनी दिग्दर्शित केलेले हे चित्रही सुपर हिट ठरले आणि मग वाटचाल चालूच राहिली. यशापयशाचा पाठशिवणीचा खेळ हिमालय की गोदमे, दो बदन, गुमनाम, शहीद या चित्रपटांच्यावेळाही चालू राहिला.

स्वतः मनोज म्हणतो, जीव ओतून केलेले पहिले चित्र शहीद. याच चित्रपटाचेवेळी आणखी एक साक्षात्कार झाला. आपण केवळ चित्रपट कलावन्त नाही. आपल्याला स्वतःला कल्पना सुचू शकतात. कागद समोर ठेवला तर त्या कल्पना कागदावर उतरू शकतात आणि कॅमेऱ्यामागे उभे राहिलो, तर या कल्पनांना जिवन्त करण्याची शक्ती आपल्याजवळ आहे. शहीदच्या श्रेयनामावलीमध्ये मनोजची नोंद फक्त कलाकार म्हणून झाली असली तरी लेखन दिग्दर्शनामध्ये त्याचा मोठा वाटा होता. हे उघड गुपीत आहे.

शहीदने एक नवा आत्मविश्वास दिला. शहीदच्या वितरण व्यवस्थेसाठी दिल्ली मुक्कामी असताना मनोजने शहीदचा एक खास खेळ त्या वेळचे पंतप्रधान



## वतनकी राहमें वतन ...

वतनकी राहमें वतन के नौजवाँ शहीद हो
पुकारते है ये जमीनों आसमां शहीद हो
वतनकी राहमें वतन...

शहीद तेरी मौतही तेरे वतनकी जिंदगी ऽ
तेरे लहूसे जाग उठेगी इस चमनकी जिंदगी ऽ
खिलेंगे फूल उस जगहपे तू जहाँ शहीद हो
वतनकी राहमें वतन...

गुलाम उठ वतनके दुश्मनोंसे इन्तकाम ले ऽ
इन अपने दोनों बाजूओंसे खंजरोका काम ले ऽ
चमनके वास्ते चमनके बागबाँ शहीद हो
वतनकी राहमें वतन...

पहाड तक भी काँपने लगे तेरे झनुने से ऽ
है आस्मा पे इन्किलाब दिखा दे अपने खून से ऽ
जमी नही तेरा वतन है आस्माँ शहीद हो
वतनकी राहमें वतन...

वतनकी लाज जिनको थी अजीज अपनी जानसे ऽ
ये नौजवान जा रहा है आज कितनी शानसे ऽ
इस इक जवाकी हाकपर हर एक जवा शहीद हो
वतनकी राहमें वतन...


है कौन खुशनसीबी माँ के जिसका ये चिराग है ऽ
वो खुश नसीब है कहाँ ये जिसके सरका ताज है
अमर वह देश क्यों न हो तू जहाँ शहीद हो
वतनकी राहमें वतन...

शहीद तेरी मौतही तेरे वतनकी जिंदगी ऽ
तेरे लहूसे जाग उठेंगी इस चमनकी जिंदगी ऽ
खिलेंगे फूल उस जगहपे तू जहाँ शहीद हो ऽ
वतनकी राहमे वतन ..

हे गाणे ऐकताना आठवण येते ती खान मस्ताना आणि महंमद रफीची. फिल्मिस्तानच्या 'शहीद'मधले हे अजरामर गीत. गीतलेखक होता राजा मेहँदी अलिखान आणि संगीतकार होता गुलाम हैदर ! पैकी, गुलाम हैदरही आज नाही, फाळणीनंतर तो पाकिस्तानला गेला आणि तिकडेच पैगंबरवासी झाला. राजा मेहँदी अलिखानही ७–८ वर्षांपूर्वी जग सोडून गेला आणि २–३ वर्षापूर्वीच खान मस्तानाही अर्धांगवायूने गेला. परन्तु सारेजण जाताना आपापली आठवण ठेवून गेले.

या गाण्याबरोबर आठवतो तो स्वातंत्र्य सैनिकाच्या भूमिकेतील दिलीप कुमार आणि त्याच्या कृत्यांना प्रोत्साहन देणारी त्याची आई लीला चिटणीस. ◻





# मनोजचा चित्रपट प्रवास

## शहीद ते रोटी कपडा....

निरोप.......




बेईमान

लालबहाद्दूर शास्त्री यांच्यासाठी आयोजित केला. पंतप्रधानांनी शाबासकी दिली. मार्गदर्शन केले. जय जवान जय किसानची घोषणा त्यावेळी शास्त्रीजींनी नुकतीच केली होती. या घोषणेमध्ये—चित्रपटाच्या दृष्टिने सुयोग्य असे कथा बीज आहे असे मनोजच्य मनाने घेतले होते. याच सुमारास—मनोजची एका शालेय दोस्ताबरोबर गाठ पडली, घरची भरपूर शेतीवाडी असूनही हा प्राणी केवळ शहरी जीवनाच्या आकर्षणाने दिल्लीमध्ये एक मामुली नोकरी करीत होता. शहराचे हे आकर्षण खेड्यातील माणसाला शहरामध्ये ओढून आणते. शिकला सवरलेला मुलगा आपल्या गावी क्वचितच परत जातो. असे का व्हावे? छे! हे होता उपयोगी नाही. आपण काय करू शकतो?—आणि विचार केल्यावर मनोजने निर्णय घेतला आपण झकासपैकी चित्रपट तयार करू शकतो. दिल्ली-मुंबई परतीच्या प्रवासामध्येच उपकारचा सांगाडा निश्चित झाला. कोणताही गाजावाजा न करता मनोजने आपल्या चित्राला प्रारंभ केला—कोणी दखल घेतली नाही. कोण घेणार. कलाकार म्हणून पूर्ण किंमत देऊन निर्माते भूमिका देत असताना, त्या भूमिका नाकारून मनोज उपकारच्या चित्रीकरणासाठी खेडोपाडी हिंडत होता. ग्रामीण जीवनाचे अनेक बारकावे टिपत होता. मोटेतून पाणी ओढणाऱ्या बैलांचा एक वेगळ्या पद्धतीचा शॉट मिळावा म्हणून सात सात दिवस कॅमेरा लावून बसला होता. पहाटेचा चंद्र टिपता यावा म्हणून—उत्तरेकडील कडाक्याच्या थंडीतही कलाकारांना पहाटे शेत मैदानावर रुजू रहावयास लावीत होता. ज्या वेगाने उपकार सुरू झाले त्याच वेगाने प्रदर्शितही झाले. लेखक: दिग्दर्शक—म्हणून मनोजला मान्यता मिळाली. चित्रपटाने बेसुमार धंदा केला. या पहिल्याच चित्राने मनोजला फिल्मफेअरचे लेखनाचे व


‘ उपकार ’ पासून
खलनायक प्राण
उत्कृष्ट चरित्र अभिनेता झाला



जया बहादुरी
‘ शोर ’ मचावणारी



आगा, झीनत अमन
शशी कपूर–रोटी, कपडा और मकान



दिग्दर्शनाचे पारितोषीक मिळाले
मेरे देश की धरती, सोना उगले,
उगले हिरे मोती... हे या चित्रपटातील गीत, तबकडी क्षिजेपर्यंत वाजवले गेले. राजकपूर नतर मान्यता मिळवणारा कलाकार दिग्दर्शक म्हणून मनोजचा गौरव करण्यात आला. हिन्दी भाषेतील उत्कृष्ट चित्र म्हणून ६७ सालच्या राष्ट्रीय पुरस्कारामध्ये 'उपकारचा' चा गौरव करण्यात आला.

उपकारच्या पाठोपाठ पूरब पश्चिम आले. पश्चीमेच्या फाजील आकर्षणाने वाहवत जाणाऱ्या मडळीना आपल्या देशाचे आपल्या सस्कृतिचे महत्त्व पटावे या उद्देशाने मनोजने हे चित्र हाती घेतले लेखक, दिग्दर्शक, व प्रमुख कलाकार–इतक्या जबाबदाऱ्या त्याने अगावर घेतल्या. नायीकेच्या भूमिकेसाठी सायराबानूची निवड केली प्रत्यक्ष इग्लडमध्ये जाऊन चित्रपटाचे चित्रीकरण केले. निर्मितीसाठी पाण्यासारखा पैसा खर्च केला. चित्रपटाचा विषय त्याने एका प्रदीर्घ कथानकामध्ये गुफून घेतला. चित्रपटाचे सार :–

है प्रीत जहाँ की रीत सदा
मै गीत कहाँ के गाता हूँ ?
भारत का रहनेवाला हूँ।
भारत की बात सुनाता हूँ।

या स्वत.वर चित्रीत केलेल्या गीतामध्ये त्याने सागितले आहे
उपकारचे उसळते यश पूरब-पश्चिमच्या वाट्यास आले नाही हे खरे पण या चित्रपटाने त्याला समाधानकारक आर्थिक वाटाही मिळवून दिला.
'यादगार' नावाच्या साफ कोसळलेल्या एका फिल्मचे मनोजने लेखन केले. या चित्रपटातील त्याची भूमिका एका नेत्याची होती–नारे लगावून समाजवाद येत नाही. त्यासाठी समाजातील प्रत्येक घटक जागरूक व कृतिशील असावा लागतो–असा सदेश सांगणारा हा चित्रपट-हास्यास्पद वाटावा इतका फसला. शहीद, उपकार, पूरब-पश्चिम, यादगार–या चित्रपटानी मनोजचा चित्रपट म्हणजे काय याची प्रेक्षकाना कल्पना येऊन चुकली. कलाकार जसा टाईप होतो ना, तसा–मनोज निर्मितीच्या बाबतीत 'टाईप' झालेला होता. त्याच्याच शब्दामध्ये सागायचे तर हे लेबल त्रासदायक ठरणारे होते. आणि म्हणून ते तोडण्याच्या उद्देशाने त्याने राष्ट्रीय प्रश्नाभोवती फिरणारी आपली लेखणी या वेळी शहरी प्रश्नाभोवती केंद्रीत केली. मनोज म्हणतो– लेखकाच्या सवेदनाक्षम मनाला मुबई सारख्या शहरी जीवनाचे जे दर्शन घडते त्याचे कथाबद्ध दर्शन घडवणाच्या हेतूने त्याने 'शोर' कथानक लिहिले. जीवन सघर्ष प्रखर असला, तरी मनोजला पलायनवाद मजूर नाही. सघर्ष स्वीकारून त्यावर मात केली पाहिजे हा विचार त्याच्या मनामध्ये असल्याने...
जीवन चलने का नाम
चलते रहो सुबहो शाम...
हे प्रदीर्घ–प्रेरक गीत त्याने चित्रपटामध्ये खुबीने गुफून घेतले मनोजच्या शोरचे सर्वत्र उत्साहाने स्वागत झाले. चित्रपटाने उत्तम आर्थिक यश मिळविले.
बेइमान–या सामान्य चित्रपटातील भूमिकेबद्दल मनोजला अभिनयाचे फिल्म फेअर परितोषीक मिळाले.
निर्माता, दिग्दर्शक, कलाकार, लेखक– असे चौफेर यश मिळवलेला मनोज आता 'रोटी, कपडा, मकान' बनवण्यात कार्यमग्न आहे. शशीकपूर, झीनत अमान, मौसमी चॅटर्जी, अमिताभ बच्चन, (जया चें मनोज विषयी फारसे चागले मत नसूनही) या सारखी मंडळी मनोजने आपल्या या चित्रासाठी गोळा केली आहेत. कलाकाराची निवड हा मनोजची हुकमत असलेला प्रात आहे. उपकार मध्ये त्याने प्राणला एक अगदी वेगळी भूमिका देऊन खलनायकाचा चरित्र अभिनेता करून टाकले. पूरब पश्चिम मध्ये–अशोककुमार, ओम् प्रकाश, मदन पुरी–यासारख्या मुरब्बी चरित्र अभिनेत्याना उत्तम सधी उपलब्ध करून दिली. अलीकडे जवळजवळ विस्मृतीप्राय झालेल्या नदाकडून त्याने शोर मध्ये शकरच्या प्रथम पत्नीचे काम अप्रतिमपणे करवून घेतले. स्वाभाविकपणे मनोजच्या चित्रपटामध्ये काम करायला कलाकार उत्सुक असतात.
रोटी कपडा मकान–हे नाव तसे सूचक आहे. ज्याने मनोजचे पूर्वीचे चित्रपट पाहिले आहेत त्याना मनोज या चित्रपटातून काय देणार या विषयी निश्चित अडाखा बांधता येईल आणि-रोटी-कपडा मकान मध्ये त्या पेक्षा काही वेगळे पहावयास मिळणार नाही.


### लेखक - निर्माता दिग्दर्शक

केवळ व्यावसायिक दृष्टीने विचार केला तर आज लेखक–निर्माता व दिग्दर्शक म्हणून मनोजला प्रथम क्रमाक द्यावा लागेल. उपकार पासून शोर पर्यंतच्या त्याच्या प्रत्येक चित्रपटाने छान धदा केला आहे· रौप्य महोत्सवही साजरे केले आहेत.
साचेबद नायक–नायिका, हमखास मधे टपकणारा खलनायक, ठराविक कृत्रीम नाटय, थड हवेच्या ठिकाणी बळेच जाऊन केलेले चित्रीकरण हे हिंदी चित्रपटाचे सर्व–साधारण स्वरूप मनोजच्या चित्रपटामध्ये अद्यापी आढळलेले नाही त्याची तुलना करायचीच झाली तर ती राजकपूर किंवा त्याही पेक्षा शातारामबापूशी करणे सयुक्तिक ठरेल. व्यावसायिक मर्यादा किंचितही न सोडता, अत्यत सामान्य पातळीवरील प्रेक्षकाला पटेल इतक्या बटबटीतपणे त्याने आपले चित्रपट सादर केले आहेत. बुद्धी आणि वास्तवता या पेक्षाही मनोज भावनेला हात घालणे पसत करतो आणि म्हणूनच मनोज सत्यजित नव्हे. वास्तवतेचे अगार तो फुलवू शकणार नाही. त्याचा कोणताही चित्रपट तुम्हाला विचार करायला लावणार नाही· पण चित्रपट पहात असताना प्रेक्षकाच्या भावनाना तो अचूक स्पर्श करील आणि यासाठी चित्रपटातील गीताचा तो प्रभावीपणे वापर करील गीताचे असे अनेक दाखले मी वर नोदवले आहेतच.
उपकार हा भले यशस्वी चित्रपट असेल, तथापी कथा विषय असलेला अनुबोधपट या पेक्षा हा चित्रपट पुढे सरकू शकत नाही. पूरब पश्चिम मध्ये विषय इतक्या उथळ पातळीवर हालतो की, प्रसगी सर्व प्रकार हास्यास्पद होतो शोर मधील सर्व धर्मीयाचे मदीर हा असाच एक उथळ मामला. (गीत गाया पत्थरोने मध्ये शांताराम बापूनी असलाच प्रकार केला होता त्याची आठवण होते.) शांताराम बापू आणि मनोज हे



घरी पत्नीबरोबर

दोघेही आपले चित्रपट ' विषय प्रधान ' असल्याचा दावा करतात. पण सर्व साधारण प्रेक्षकाला (हा सर्व साधारण प्रेक्षक हाच हिंदी चित्रपटाचा आधार स्तंभ) रुचेल, मानवेल, अशी कथा हमखासपणे शांताराम बापूंच्या काय किंवा मनोजच्या काय चित्रपटामध्ये पहावयास मिळते. आपल्या प्रेक्षकाला ' कथा आवडते ' हे मनोज चांगले ओळखून आहे. हे सर्व असले तरी एस. मुखर्जी, आत्माराम, ओ. पी. राल्हन, टी. प्रकाशराव, यांच्यापेक्षा मनोजची जातकुळी वेगळी आहे. सत्यजितची बातच सोडा, हृषीकेष मुखर्जी यांच्या इतपतही त्याची झेप नसली तरी ज्याच्यावर जीव जडावा असा एखादा विचार मनोज आपल्या चित्रपटातून देण्याचा सातत्याने प्रयत्न करतो हे नाकारता येणार नाही. मनाचा प्रामाणिकपणा, तंत्रावरील हुकूमत, विचारांची सुस्पष्ट दिशा यामुळे शेकडो व्यावसायिक चित्रपट निर्मात्यांपेक्षा मनोजचे स्थान वेगळे आहे. महत्त्वाचे आहे.



स्टुडिओत पत्नीबरो



ही शामला–परिकथेतला राजकुमार
गवसलेला दिसतोय ! इंदुमति पैंगणकर

हसताय काय दादासाहेब....
पोरीचं लग्न काढलंय खरं
पण बाजारात फेरफटका
केलाय का ? ग. दि. मा.



# वऱ्हाडी आणि वाजंत्री

काय मराठी चित्रपट–छे ! नको बुवा ! –हं असं नका म्हणू. ज्यांच्या चित्रपटावर कोण्या एके काळी तुमचा जीव जडला होता त्या ' गजराज ' कंपनीला पुन्हा एकदा तुमच्या समोर सादर करण्यात येत आहे.

वि. गो. नमाडे म्हणजे मराठी चित्रपटातील मोठी असामी. त्यांच्या निधनानंतर दोन वर्षे उल्काच्या परिसरामध्ये सुनी सुनी गली. पण आता चिरंजीव सुभाष वयात आले आहेत आणि वऱ्हाडी वाजंत्री घेऊन उभे आहेत. खडसे–आणि नंदा यांची त्यांना अनुभवी साथ आहे.

कानडीने केला मराठी भ्रतार–केल्यावर काय व्हायचे असेल तो होवो पण भ्रतारच्या गळचात वरमाला पडण्यापूर्वीच एवढी बोंबाबोंब म्हणजे मात्र फारच हो.

पाच बहिणींच्या पाठीवर झालेला गोविंदा, (विक्रम गोखले) रावसाहेब गोखले (राजा परांजपे) यांचा एकुलता एक मुलगा. पोरगा देखणा. महाविद्यालयामध्ये प्राध्यापक बापाच्या अर्ध्या वचनात. आता असा बंदा रुपया पदरी असल्यावर पाच पोरींच्या पोटी खर्ची पडलेली ' माया ' परत मिळवण्याची स्वप्ने महा कंजूष रावसाहेबांनी पाहिली तर चुकले कुठे ?

स्त्री-लिंगी कर्ता आणि नपुसकलिंगी क्रियापद अशा खाशा ढंगामध्ये मराठी बोलणारी शामला–(इंदुमती पैंगणकर) प्राध्यापक महोदयांकडे नाटकाचे निमित्त घेऊन आली आणि आपले पिक्चर सुरू झाले.

दादासाहेब धारवाडकर (ग. दि. मा.) आणि राधाबाई (सुलोचना) यांची शामला ही एकुलती एक कन्या.

रावसाहेब हुंडा घेतल्याशिवाय पोराला बोहल्यावर चढू देणार नाहीत तर दादासाहेब ' तत्व ' म्हणून दिडकी सोडायला तयार नाहीत. शिवाय कानडी मराठीचे लफडे आहेच. मग हा तिढा सुटावा कसा ? छे: आपण नाही रे बाबा रिलीज पूर्वी अख्खी स्टोरी सांगणार.

राजदत्त – राजाभाऊंचे पट्टशिष्य. या चित्रपटाचे दिग्दर्शक. मनुष्य कमनशिबी आणि तसा नशिबवानही ! झेप, देवमाणूस, आणि भोळी भाबडी – तिन्ही चित्रपट वास्तविक पहाता सात-आठ आठवड्यांचे. पण राजदत्तचे नशिबच खराब. साफ कोसळले. नशिबवान अशासाठी की, इतके अपयश पदरी असूनही काम हातात असलेला हा एकमेव मराठी दिग्दर्शक – आता वाजंत्री जर वाजली नाहीत तर मात्र भवितव्य कठीण.

संगीत – राम कदम. काहीही वाजव बाबा ! सध्या दिवस तुझे आहेत. कौतुक होणारच.

रावसाहेब गोखले यांचे जावई बनून रुजू होत आहेत व्यंकटेश माडगूळकर, द. मा. मिरासदार आणि राजशेखर. काम थोडे पण मिरासदारांनी जाहिरात तर जबरदस्त करून ठेवली आहे.

[ विश्वनाथ चित्रचे प्रथम चित्र वऱ्हाडी आणि वाजंत्री – पुण्यात दिनांक सतरा पासून रुजू होत आहे. ] □

काय ?
जावयाच्या
शोधात वाटतं ?



जा सांग त्यांना, बाकी सगळं खपवून घेईन पण हुंड्यामध्ये दिडकी कमी करणार नाही–राजाभाऊ




ही सलगी जरा ' डिप्लोमॅटिक ' दिसतीय. विक्रम गोखले । राघवेंद्र कडकोळ



# रंगभूमी । मुक्काम मुंबई

## गार्बो

महेश एलकुंचवार यांचं नाव एक समर्थ एकांकिका लेखक या संदर्भात रसिकांना परिचित आहे. ज्याच्याकडे आशेनं पाहिलं जातं अशा या तरुण लेखकाचं 'गार्बो' हे पहिलं नाटक डॉक्टर लागू त्यांच्या नव्यानेच स्थापन केलेल्या 'रूपवेध' या संस्थेतर्फे या महिनाअखेरीस रंगभूमीवर आणतील. सामान्य माणूस काही क्रिएट करू शकत नाही, आणि तसं झालंच तर निराशेच्या आणि वैफल्याच्या भरात त्या क्रिएटीव्हिटीचा खून करून डुकरासारखा, जगत रहातो हा विषय 'गार्बो' या नाटकात प्रतिकात्मकरीत्या मांडण्यात आला आहे. या नाटकाचं दिग्दर्शन डॉक्टर लागू करतील आणि नेपथ्य बापू लिमये सांभाळतील. दीपा श्रीराम, दत्ता भट, अमोल पालेकर आणि स्वत: डॉक्टर लागू यांच्या यात भूमिका असतील. ज्यात आव्हान आहे आणि व्यावसायिक रंगभूमीवर यशस्वी होण्यासाठी तडजोड नाही, अशी नाटकं 'रूपवेध'तर्फे करण्याची डॉक्टर लागूंची इच्छा आहे. सेन्सॉरशिपला विरोध करून अशा नाटकांचे खाजगी प्रयोगही होतील. 'गार्बो'नंतर गोविंद देशपांडे यांचं 'उध्वस्त धर्मशाळा' हे नाटक करायचा 'रूपवेध'चा प्रयत्न आहे.



महेश एलकुंचवार ।

डॉ. लागू । अमोल पालेकर । दीपा श्रीराम । दत्ता भट ।






राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**